


# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०






# घरात दादागिरी करा आणि या दिवाळी आणि नवरात्रीत जास्त खरेदी करा - गृहमंत्री अमित शाह



## करसवलतीमुळे महिलांना मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचा सल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वातंत्र्य दनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरु न जीएसटीच्या दरात बदल करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर काही दिवसातच जीएसटीच्या दरात मोठे बदल करण्यात आले आणि अनेक वस्तूंवरील कर कमी करण्यात आला. त्यामुळे सामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक गोष्टींवरील कर शून्यावर आल्यामुळे नागरिकांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही या करसवलतीमुळे महिलांना मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचा सल्ला दिला आहे. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने भाजप आणि भाजपशासित राज्यांमध्ये देशभरात अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणीचे कार्यक्रम घेण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही दिल्लीत सेवा पंधरवडा अंतर्गत १६०० कोटी रु पयांच्या विविध विकास प्रकल्पांच्या उद्घाटन आणि पायाभरणी समारंभातही भाग घेतला.या दरम्यान, त्यांनी दिल्लीतील महिलांना दिवाळी आणि नवरात्रीत मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आवाहन केले. दिल्लीकरांनो, दिवाळी आणि नवरात्र लवकरच येत आहेत. आता, तुम्ही जे काही वापरता त्यावर २८ टक्के आणि १८ टक्के ऐवजी शून्य आणि ५ टक्के जीएसटी लागेल. मी दिल्लीतील माता आणि भगिनींना सांगू इच्छितो की २२ सप्टेंबरपासून घरी दादागिरी करा आणि शक्य तितके खरेदी करा. मुक्तपणे खरेदी करा, पण फक्त भारतात बनवलेले पदार्थ खरेदी करा, बाहेरचे नाही. आता भारतातील प्रत्येक नागरिकाने त्यांच्या देशात बनवलेले पदार्थ खरेदी करण्याची शपथ घेण्याची वेळ आली आहे. स्वदेशीचा प्रचार करणे हा आपला स्वभाव बनला पाहिजे. तरच समृद्ध भारताचा संकल्प पूर्ण होईल असे अमित शाह म्हणाले. यावेळी अमित शाह यांनी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी राम मंदिराच्या मुद्यावर खिल्ली उडवल्याबद्दल टीका केली. देशाच्या सीमा सुरक्षित करणे असो, सर्जिकल स्ट्राईक असो हवाई हल्ले असो किंवा ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला योग्य उत्तर देणे असो, पंतप्रधान मोदींनी हे सर्व केले आहे. वर्षानुवर्षे आपल्या सर्वांना अयोध्येत राम मंदिर बांधायचे होते. राहुल गांधी भाजपची खिल्ली उडवत म्हणायचे आम्ही तिथे मंदिर बांधू, पण तारीख सांगणार नाही.

मंदिर बांधले गेले आहे, राम लल्ला सिंहासनावर विराजमान झाले आहेत आणि आज जगभरातील लोक त्याचा आनंद घेत आहेत. काशी विश्वनाथ कारिडॉरचे बांधकाम असो किंवा सोन्याने सोमनाथ मंदिराचे पुनर्निर्माण सुरू करणे असो, पंतप्रधान मोदींनी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रत्येक मुद्दा क्षणार्धात सोडवला असेही अमित शाह म्हणाले.

# देशातील जेन-झी विद्यार्थी, युवक संविधान-लोकशाही वाचवतील ; मी सदैव पाठीशी राहीन : राहुल गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय निवडणूक आयुक्त मतचोरीला संरक्षण देत आहेत. विरोधकांची नावे मतदार यादीतून वगळली जातात. त्यात प्रामुख्याने दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदायाची नावे हटवण्यात आली. मतदारांची नावे जाणुनबुजून यादीतून काढण्यात आली. ज्यांच्या नावाने ही नावे काढली त्यांनाही याची कल्पना नाही. आळंदमध्ये याहून अधिक मते वगळली गेली असतील परंतु आम्ही ६ हजार मतदार काढले. इतर राज्यातील मोबाईल नंबर वापरून कर्नाटकातील मतदार यादीतून काढले गेले, असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला. केंद्रीय निवडणूक आयोगावर राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा हल्लाबोल केला.

आमच्या आळंद उमेदवाराने फसवणूक उघड केल्यानंतर, स्थानिक निवडणूक आयोगाच्या अधिका-याने एफआयआर दाखल केला, परंतु केंद्रीय निवडणूक आयोगाने सीआयडी तपास रोखला आहे. कर्नाटक सीआयडीने १८ महिन्यांत १८ पत्रे लिहून सर्व गुन्हेगारी पुरावे मागितले आहेत, हेही केंद्रीय निवडणूक आयोगाने ब्लॉक केले. कर्नाटक निवडणूक आयोगाने चौकशीचे पालन करण्यासाठी निवडणूक आयोगाला अनेक विनंत्या पाठवल्या आहेत. परंतु, त्याही मुख्य निवडणूक आयुक्तांनी रोखल्या आहेत. डेस्टिनेशन आयपी, डिव्हाइस पोर्ट आणि ओटीपी ट्रेल्सचे तपशील लपवण्यात आले आहेत, हेदेखील केंद्रीय निवडणूक आयोगाने ब्लॉक केले. जर ही मतचोरी




पकडली गेली नसती आणि ६,०१८ मते वगळली गेली असती तर आमचा उमेदवार निवडणूक हरला असता. मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार, सबबी देणे थांबवा. कर्नाटक सीआयडीला पुरावे द्या. आत्ताच, अशी पोस्ट राहुल गांधी यांनी केली. आता देशातील युवक, देशातील विद्यार्थी, देशातील Gen Z संविधान वाचवतील. लोकशाहीचे रक्षण करतील आणि मतचोरीही रोखतील. मी सदैव त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहीन, जय हिंद !, अशी एक पोस्ट राहुल गांधी यांनी एक्सवरून केली आहे. पत्रकार परिषदेत बोलताना, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार मतचोरांचे संरक्षण करत आहेत. प्रत्येक निवडणुकीत आमच्याकडे मतदार वगळले जात आहेत असा रिपोर्ट येत होता. काँग्रेसचे, विरोधकांचे मतदार यादीतून काढले जात होते. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक मतदार यादीतून काढले जातात. जी नावे यादीतून वगळली जातात ती विरोधकांची असतात असा आरोप करत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. दरम्यान, भारतीय निवडणूक आयोगाने तातडीने प्रत्युत्तर देत राहुल गांधींचे आरोप फेटाळून लावले. राहुल गांधी यांनी केलेले आरोप खोटे आणि बिनबुडाचे असल्याचा दावा निवडणूक आयोगाने केला. तसेच क?ल सेंटरच्या मदतीने मतदारांची नावे कापण्यात आल्याचा राहुल गांधी यांनी केलेला आरोपही निवडणूक आयोगाने फेटाळून लावला असून, असे करणे शक्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच राहुल गांधी यांनी केलेले आरोप चुकीचे आणि निराधार आहेत. राहुल गांधी यांनी जसा दावा केला आहे तशा पद्धतीने कुठल्याही मतदाराचं नाव कुठलीही सर्वसामान्य व्यक्ती ऑनलाइन पद्धतीने हटवू शकत नाही. कुठल्याही व्यक्तीचे नाव हटवण्यापूर्वी त्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतले जाते, असा दावाही त्यांनी केला.

## राहुल गांधी हे सिरियल लायर

### आजची पत्रकार परिषद फुसका बार

**मुंबई :**राहुल गांधी काहीतरी मोठा धमाका करणार असे वातावरण होते. मात्र साधा लवंगी फटाका देखील ते फोडू शकले नाहीत. सगळाच फुसका बार निघाला. राहुल गांधी हे सिरियल लायर आहेत. रोज खोटे बोलण्याचे गोबेल्स तंत्र ते वापरतात असे टीकास्त्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडले. राहुल गांधी यांचा एकच गुण वाखाणण्यासारखा आहे तो म्हणजे, ते रोज राष्ट्रीय मिडियासमोर येऊन कोणतेही पुरावे न देता धादांत खोटे बोलतात असा टोलाही त्यांनी लगावला.राहुल गांधी यांनी लोकसभा व त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकात भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने मोठा




घोळ केला असल्याचा आरोप केला आहे. आजही त्यांनी पत्रकार परिषद घेउन कर्नाटक आणि महाराष्ट्रातील राजुरा मतदारसंघाच्या मतदारयादीत घोटाळा झाल्याचा आरोप केला. राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले. निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस दिल्या, पण एकही पुरावा ते देऊ शकले नाहीत. न्यायालयातही ते जात नाहीत. केवळ खोटे बोलत राहायचे. त्यांना जनतेत जावेच लागेल. तरच कधीतरी त्यांना मिळालेच तर यश मिळेल, अन्यथा नाही. ते कायम संवैधानिक व्यवस्थेचा अपमान करत असतात. खोटे बोलून बिहार जिंकू असे त्यांना वाटते पण बिहार पंतप्रधान मोदींच्याच मागे जाणार. महाराष्ट्रातला पराभव त्यांना जिव्हारी लागला. त्यांना फार अपेक्षा होती महाराष्ट्रात. त्यांनी मंत्रिमंडळाची रचनाही केली होती. पण जनतेने त्यांना मोठा झटका दिला. त्यांनी आतापर्यंत महाराष्ट्राबाबत केलेली सगळी वक्तव्ये खोटी निघाली.

# दोन्ही मराठा आरक्षणविरोधी याचिका कोर्टाने फेटाळल्या

### हैदराबाद गॅझेटवर हायकोर्टाचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर व सातारा गॅझेटियरच्या आधारे २ सप्टेंबर रोजी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणा-या दोन जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे.



याचिका प्रलंबित असेपर्यंत या अधिसूचनेची अंमलबजावणी करू नये व त्याद्वारे कोणालाही कुणबी प्रमाणपत्र देउ नये, अशी अंतरिम मागणी याचिकांद्वारे करण्यात आली होती. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणा-या शासन निर्णविरोधातील याचिकेवर गुरु वारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरच मुंबई उच्च न्यायालयाने सवाल उपस्थित केले. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीला मान्यता देणा-या शासन निर्णयाविरोधातील पहिली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला याचिकाकर्ते सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले जात आहे. तसेच याचिकाकर्त्याला रीट याचिका म्हणून सक्षम न्यायालयासमोर दाद मागण्याची मुभा मुंबई उच्च न्यायालयाने दिली आहे. मराठा आणि कुणबी एकच नसल्याचे व मराठा समाज आर्थिक व सामाजिक मागास नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने (पान २ वर)

# बुलडाण्यात भीषण अपघात; 4 ठार, 5 जण जखमी

**बुलडाणा/प्रतिनिधी :**अज्ञात वाहनाने चारचाकीला जबर धडक दिल्याने भीषण अपघात घडला. यात तीन महिलांसह चार जणांचा मृत्यू झाला. तर पाच जण गंभीररीत्या जखमी आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर चिखली-रणथमनजिक दि. १७ च्या रात्री ११.४० वाजता ही घटना घडली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, चारचाकी क्र. एम.एच.४६/एक्स ३१२० या वाहनाने प्रवासी जळगावकडून नागपूरकडे येत होते. महामार्गावर मलकापूर तालुक्यातील चिखली-रणथमनजिक चारचाकीला अज्ञात वाहनाने जबर धडक दिली. त्यामुळे भीषण अपघात घडला.

या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस निरीक्षक हेमराज कोळी यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतक व गंभीर जखमींना येथील उपजिल्हा



रु ग्णालयात उपचारासाठी हलविले. त्यात गंभीर जखमींपैकी चार जणांना जळगाव खान्देश येथे हलविण्यात आले आहे तर एकाला (पान २ वर)

# बोलण्यात संयम राखायला हवा

### भगवान विष्णू यांच्यावरील वक्तव्यासंदर्भात सीजेआय बीआर गवई यांचे स्पष्टिकरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** खजुराहो येथील प्रसिद्ध जावरी मंदिरातील भगवान विष्णू यांच्या खंडित मूर्तीची दुरु स्ती करण्यासंदर्भातील याचिकेवर सुनावणी करताना, सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी एक टिप्पणी केली होती. यामुळे सोशल मीडियावर मोठा गदारोळ निर्माण झाला. एवढेच नाही, तर विश्व हिंदू परिषदेसारख्या संघटनेनेही सरन्यायाधीशांना वाणीवर संयम ठेवण्याचा सल्ला दिला होता. आता यासंपूर्ण प्रकरणावर खुद्द सरन्यायाधीश बी.आर. गवई या भाष्य केले आहे. माझे वक्तव्य सोशल मीडियावर चुकीच्या पद्धतीने सादर केले गेले. दुस-या दिवशी कुणीतरी मला सांगितले की, माझे वक्तव्य सोशल मीडियावर शेअर केली जात आहे. मी सर्व धर्मांचा आदर करतो



असे गवई म्हणाले.

सरन्यायाधीशांनी ही टिप्पणी एका प्रकरणात सुनावणी वेळी केली. यासंदर्भात बोलताना कपिल सिब्बल म्हणाले, आम्हाला अशा गोष्टींचा सामना रोजच करावा लागतो. अशा प्रकारे कुणालाही बदनाम करणे योग्य नाही. सरन्यायाधीश बी.आर. गवई म्हणाले, नेपाळमध्येही अशाच गोष्टी घडल्या होत्या. खरे तर, मूर्तीच्या दुरु स्तीच्या मागणीसंदर्भातील याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याला फटकारत तुमची याचिका जनहित याचिका नाही, तर प्रचार याचिका आहे. जर तुम्ही भगवान विष्णूंचे एवढे कट्टर भक्तअसाल तर मग त्यांच्याकडेच प्रार्थना करा, असे म्हटले होते. त्यांच्या टिप्पणीचा हा भाग सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता आणि लोक त्यांच्यावर टीकाही करत होते.

**विश्वहिंदू परिषदेची प्रतिक्रिया**

यासंदर्भात गुरु वारी विश्व हिंदू परिषदेचीही प्रतिक्रिया आली. संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष आलोक कुमार यांनी सरन्यायाधीशांच्या नावे एक पत्र लिहिले. या पत्रात म्हणण्यात आले आहे की परवा सर्वोच्च न्यायालयात खजुराहो येथील प्रसिद्ध जावरी मंदिरातील भगवान विष्णूंच्या खंडित मूर्तीच्या दुरु स्तीसंदर्भातील याचिकेवर सुनावणी होती. सुनावणी दरम्यान सरन्यायाधीशांनी मौखिक टिप्पणी केली, मूर्तीच्या दुरु स्तीसाठी भगवंतांकडेच प्रार्थना करा. आपण म्हणता की, आपण भगवान विष्णूचे कट्टर भक्तआहात, तर आता त्यांच्याकडेच प्रार्थना करा. न्यायालय हे (पान २ वर)

# लाडक्या बहिणीची ई-केवायसीतून आधार पडताळणी होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी आता ई केवायसीच्या माध्यमातून आधारकार्डची पडताळणी करण्यात येणार आहे. राज्याच्या महिला व बाल विकास विभागाने या संदर्भात आदेश जारी केले आहेत. पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात १८ सप्टेंबरपासून दोन महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक केले. दोन महिन्यात आधार प्रमाणीकरण करण्यात आले नाही तर पुढील कारवाई करण्यात येणार आहे. राज्याच्या महिला व बालविकास विभागाने याबाबतचे परिपत्रक काढले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असलेल्या




लाभार्थीपैकी २६ लाख लाभार्थी निकषानुसार पात्र नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कागदपत्रांची सूक्ष्म छाननी सुरु केली आहे त्याचाच एक भाग ई केवायसीच्या माध्यमातून प्रमाणीकरण करण्यात येणार आहे.या योजनेत अनेक (पान २ वर)

# एन्काउंटरनंतर गोल्डी ब्रार टोळी संतप्त

### वेळ लागेल पण माफी मिळणार नाही गोल्डी ब्रार टोळीचा इशारा

**गाझीयाबाद/वृत्तसंस्था :** बॉलिवूड अभिनेत्री दिशा पाटनीच्या वडिलोपार्जित घरावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी गाझियाबादच्या टेक्नो सिटी परिसरात दोन्ही गोळीबार करणा-यांना एन्काउंटरमध्ये ठार केले आहे. दोघेही रोहित गोदरा-गोल्डी ब्रार टोळीचे सदस्य होते. मात्र यानंतरही रोहित गोदराकडून धमक्या येणे सुरु च आहे. या एन्काउंटरनंतर गोदराने पुन्हा एकदा माफी मिळणार नाही म्हणत इशारा दिला आहे. बरेली येथे अभिनेत्री दिशा पाटनी हिच्या घरी झालेल्या गोळीबार घटनेतील दोन्ही



आरोपींना उत्तर प्रदेश स्पेशल टास्क फोर्सने गाझियाबाद येथे झालेल्या चकमकीत ठार मारले. या कारवाईनंतर, गँगस्टर गोल्डी ब्रार टोळीचा सदस्य रोहित गोदारा याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत दोन्ही आरोपींच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केले. रोहित गोदराने एन्काउंटर करण्याचा सूड घेणार असल्याचे म्हटले आहे. यासाठी वेळ लागेल, पण माफी मिळणार नाही, असाही इशारा रोहित गोदराने दिला. गोदाराने एन्काउंटरमध्ये मारल्या गेलेल्या आरोपींना शहीद म्हणत हे खूप मोठे नुकसान (पान २ वर)

# राहुल गांधींच्या आरोपांवर निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी गुरु वारी पत्रकार परिषद घेतली आणि निवडणूक आयोगावर पुन्हा एकदा मतचोरीचा आरोप केला. निवडणूक आयोगाने राहुल यांचे आरोप फेटाळले आहेत आणि आज रात्री १० वाजता या प्रकरणी पत्रकार परिषद घेणार आहे.गुरु वारी ३१ मिनिटांच्या सादरीकरणात राहुल गांधी यांनी मत चोरीचा आरोप केला आणि त्यांच्याकडे पुरावे असल्याचा दावा केला. निवडणूक आयोग जाणूनबुजून काँग्रेसच्या मतांना लक्ष्य करत आहे आणि त्यांची नावे वगळत आहे, असे ते म्हणाले. यावेळी राहुल गांधी यांनी कर्नाटकातील मतदारांनाही सोबत आणले ज्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती. त्यांनी आरोप केला की भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे भारतीय लोकशाही नष्ट करणा-यांना संरक्षण देत आहेत. महाराष्ट्र, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये हे घडत आहे.

तथापि, निवडणूक आयोगाने राहुल यांचे आरोप खोटे आणि निराधार असल्याचे फेटाळून लावले. कोणताही नागरिक कोणाचेही मत ऑनलाइन डिलीट करू शकत नाही. मत डिलीट करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीला त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाते.राहुल यांनी कर्नाटकातील आलंद विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण दिले. ते म्हणाले की, २०२३ च्या निवडणुकीत कोणीतरी ६,०१८ मते वगळण्याचा प्रयत्न (पान २ वर)




# राज्याला अतिवृष्टीचा फटका; 17 लाख हेक्टरवरील पिकांची माती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात गेल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी व पुरामुळे शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये तब्बल १७ लाख ८५ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत.गेल्या काही दिवसांपासून अनेक जिल्ह्यांत परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. यामुळे अतिवृष्टी झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले आहे. जळगाव, जालना, सोलापूर आणि नाशिक जिल्ह्यांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे.



ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये राज्यात १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर (४२ लाख ८४ हजार ८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. त्यात प्रामुख्याने खरीप शेतपिकांचे नुकसान झाले असून सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग, भाजीपाला, फळपिके, बाजरी, उस, कांदा, ज्वारी आणि हळद या पिकांना मोठा फटका बसला आहे. ऑगस्टमधील अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यांतले पंचनामे पूर्ण होउन शेतक-यांना भरपाई देण्यात आली आहे.

अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका हिंगोली, परभणी, अमरावती, जळगाव, वर्धा, सांगली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धुळे, जळगाव, रत्नागिरी, चंद्रपूर, सातारा, नाशिक, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गडचिरोली, रायगड, नागपूर आणि पुणे या जिल्ह्यांना झाला असून पिकांचे नुकसान झाले आहे. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यात पावसाने कहर केला असून, सुमारे ७ हजार हेक्टरपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे केळी, कापूस, सोयाबीन आणि मका यांसारखी पिके पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे शेतक-यांच्या तोंडचा घास पळवल्याचे चित्र निर्माण झाले आहे. मुक्ताईनगर तालुक्यात सरासरी ६७ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. यामुळे ३५ गावे बाधित झाली आहेत. आमदार चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री आणि महसूलमंत्र्यांना या नुकसानीची माहिती दिली असून, तातडीने पंचनामे (पान २ वर)

## नेपाळ पंतप्रधान कार्कीना मोदींचा फोनकॉल

**नवी दिल्ली-** नेपाळमधील जेन झी तरु णाई तत्कालीन ओली सरकारच्या भ्रष्ट कारभाराविरोधात रस्त्यावर उतरली आणि आंदोलनाचा भडका उडाला. समाज माध्यमांवर घातलेली बंदी या आंदोलनासाठी तत्कालीक कारण ठरली. आंदोलकांनी पंतप्रधानांसह मंत्र्यांच्या निवासस्थानांचं नुकसान केलं. तसेच, अनेक ठिकाणी हिंसक घटनादेखील घडल्या. आता नेपाळमध्ये अंतरिम सरकार स्थापन झाले असून नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की नेपाळच्या हंगामी पंतप्रधान झाल्या आहेत. त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्याशी फोनवर संवाद साधला.

# शेतकरी आंदोलनाचा धगधगता स्वर

## -विदर्भातून नागपूरकडे सातबारा कोऱ्यासाठी हाक

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** विदर्भातील बळीराजा पुन्हा एकदा आंदोलनाच्या उंबरठ्यावर उभा ठाकला आहे. बेलोरा येथे पार पडलेल्या भव्य शेतकरी-शेतमजूर महिला सभेत देशभरातील दिग्गज शेतकरी नेत्यांनी एकमुखाने हाक दिली – 'आता आत्महत्येची नाही, तर हक्कासाठी लढाईची तयारी ठेवा!'

राष्ट्रीय किसान मोर्चाचे अध्यक्ष राकेश टिकेत यांनी यावेळी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'विदर्भातील जनतेत आंदोलनाचा करंट आहे. हा करंट शासन आणि प्रशासनाला जाणवला नाही, तर शेतकरी हक्काच्या लढाईसाठी उग्र आंदोलन करावे लागेल.' त्यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या मागील सात महिन्यांच्या आक्रमक आंदोलनात्मक भूमिकेचे कौतुक करत, 'शेतमालाला हमीभावासाठी महाराष्ट्रात होणाऱ्या प्रत्येक लढ्यात आम्ही



खांद्याला खांदा लावून उभे राहू' अशी ग्वाही दिली.

यावेळी व्यासपीठावर डॉ. अशोक ढवळे, महादेव जानकर, ज्येष्ठ पत्रकार पी.साईनाथ, डॉ. अजित नवले, विजू कृष्णन, युद्धवीर सिंग, तेजिंदरसिंग विर्क यांच्यासह देशभरातील शेतकरी संघटनांचे नेते उपस्थित होते.

**बच्चू कडूंसह शेतकरी नेत्यांचा सरकारवर घणाघात-**

सभेत बोलताना आ. बच्चू कडू यांनी सत्ताधाऱ्यांना जाहीर आव्हान दिले. 'जातीपातीसाठी नागरिक एकत्र येतात, मग शेतकऱ्यांसाठी का नाही? राज्यात शेतकरीहिताचे सरकार नाही, म्हणूनच तेरा शेतकऱ्यांनी एका

### संयुक्त किसान मोर्चा चा सरकारसाठी इशारा

राकेश टिकेत यांचा लढाऊ सूर आणि बच्चू कडूंचे रोखठोक भाषण यातून हे स्पष्ट झाले की, आता शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे. जर सरसकट कर्जमुक्ती व शेतमालाला हमीभावाच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर २८ ऑक्टोबरचे नागपूर आंदोलन हे महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून सोडणारे ठरेल.

दिवसात आत्महत्या केल्या. आत्महत्यांच्या आकड्यांनी हादरलेल्या या महाराष्ट्रात आता एकच मार्ग उरला आहे – संघर्ष!' अशा शब्दांत त्यांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदवली.

बच्चू कडू यांनी पुढे सांगितले की, 'बळीराजाच्या जिवाशी खेळणाऱ्या सरकारला जागं करण्यासाठी २८ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे भव्य आंदोलन होणार आहे. या लढाईत पुरुष शेतकऱ्यांबरोबरच महिला शेतकरी व शेतमजुरांनी आघाडी घेणे गरजेचे आहे.'

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती साठी आणि शेतकऱ्यांच्या हमीभावासाठी प्रहार महिला शेतकरी आघाडीवर

या सभेत सुनीता झिंगरे,

### सभे करिता हजारो महिलांची उपस्थिती

स्टेला मॅडम, अलका शहाणे, प्रीती गाडगे, लीना गुडदे यांच्यासह हजारो महिला शेतकरी उपस्थित राहिल्या. आंदोलनाच्या पुढील टप्प्यात महिलांची निर्णायक भूमिका राहणार असल्याचे स्पष्ट झाले.

**आठ महिन्यांची सातत्यपूर्ण लढाई-**

आ. बच्चू कडू यांनी मागील सात महिन्यांत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सलग आंदोलने केली आहेत. अमरावतीत वाडा आंदोलन,रायगड येथे तीन दिवसांचे अन्नत्याग आंदोलन, लोकप्रतिनिधींच्या घरासमोर टेंबा आंदोलन, मोझरी येथे ७ दिवस अन्नत्याग आंदोलन 'सातबारा कोरा यात्रा' – भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्मगावापासून चीलगव्हाणपर्यंत, या सातत्यपूर्ण लढाईमुळे सरकारवर दबाव वाढला असला तरी, अद्याप ठोस निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष आहे.

सोबत डॉ अशोक ढवले, राजन क्षीरसागर, डॉ अजित नवले, कृषीतज्ञ पी. साईनाथ, विजू कृष्णन, युद्धवीर सिंह, तजिंदरसिंह बिर्के, राम मंदिरसिंह पटियाला आदि उपस्थित होते.

### मनी लॉन्ड्रींगच्या गुन्हयामध्ये

बाहेर जाऊ नये आणि पोलिसांच्या सर्व सूचनांचे पालन करावे. तोतयाने त्यांच्यावर सतत नजर ठेवून, त्यांची सर्व बँक खाती गोठवण्याची धमकी दिली. आपल्या विरुद्ध खरोखरच गंभीर गुन्हे दाखल झाल्याचा विश्वास बसल्यामुळे संजय मेश्राम पूर्णपणे भयभीत झाले. यातून वाचण्यासाठी आरोपीने सांगितलेली प्रत्येक गोष्ट त्यांनी ऐकली. तोतयाने 'या प्रकरणी निर्दोष सिद्ध करण्यासाठी आणि बँक खाती सुरळीत ठेवण्यासाठी' पैशांची मागणी केली. आरोपीच्या सूचनांनुसार, संजय मेश्राम यांनी आरटीजीएस आणि आयएमपीएस या प्रणालींद्वारे टप्प्याटप्प्याने आरोपीने दिलेल्या बँक खात्यांमध्ये ३१ लाख ५० हजार रुपये जमा केले. लाखो रुपये दिल्यानंतरही आरोपीची पैशांची मागणी थांबत नव्हती. तेव्हा मेश्राम यांना आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. या प्रकरणात पोलिसांनी कलम ३१८(४), ३१९(२), सहकलम ६६(क),६६(ड) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

झाला. या प्रकरणात महत्त्वाचे पुरावे न्यायालयासमोर मांडले गेले. एकूण आठ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता रमेश डी. मोरे यांनी ठोस बाजू मांडली. शेवटी सत्र न्यायाधीश अभिजित देशमुख यांनी भा.दं.वि. कलम ३७६(२)(फ), ३७६(२)(एन), ३२३ व ५०६ अंतर्गत आरोपीस प्रत्येकी जन्मठेप, दंड व अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली.या प्रकरणातील पैरवी पो.हे.कॉ. संतोष मडावी यांनी केली तर आरोपीसाठी ॲड. सिद्धार्थ लोढा यांनी बाजू मांडली. मात्र, मानवी मूल्यांना तिलांजली देणाऱ्या या घृणास्पद कृत्यास न्यायालयाने दिलेली शिक्षा समाजासाठी धडे देणारी ठरली आहे.

### दोन्ही मराठा आरक्षणविरोधी

स्पष्ट करूनही राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सरकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करणारा आहे. अशाप्रकारे मराठा समाजाला ओबीसींमध्ये समाविष्ट करून सरकार ओबीसींची संधी हिरावून घेत आहे.

### बुलडाण्यात भीषण अपघात;

बुलडाणा येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

अपघात घडल्यानंतर पोलिसांनी महामार्गावर ठप्प पडलेली वाहतूक सुरळीत केली. उशिरा रात्री जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे व अप्पर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, नायब तहसीलदार श्रीकृष्ण उाले आदींनी घटनास्थळी व उपजिल्हा रुग्णालयात भेट दिली आहे. पोलिसांनी त्या अज्ञात वाहनाच्या शोधार्थ रात्रीच हालचाली सुरू केल्या आहेत.

### बोलण्यात संयम राखायला

न्यायाचे मंदिर आहे. भारतीय समाजाची न्यायालयांवर श्रद्धा आणि विश्वास आहे. आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे की, हा विश्वास केवळ कायमच राहू नये, तर तो अधिक दृढ व्हावा.

### लाडक्या बहिणीची ई-केवायसीतून

पुरूषांनी तसेच सरकारी कर्मचारी-अधिकारी तसेच त्यांच्या कुटुंबियांनीही लाभ घेतल्याचे उघड झाले होते. त्यावर आता पात्र महिला लाभार्थ्यांनाच या योजनेचा लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

जूनपासून दोन महिन्यात ई-केवायसी बंधनकारक

या योजनेअंतर्गत दरवर्षी जून महिन्यापासून २ महिन्यांच्या कालावधीत या योजनेतील लाभार्थीना ई-केवायसी करणे बंधनकारक राहील असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### एन्काउंटरनंतर गोल्डी ब्रार

अअसल्याचे म्हटले. भावांनो, आजची ही चकमक आपल्यासाठी खूप मोठी जीवितहानी आहे. मी तुम्हाला सांगतो की चॅनेल त्यांना मारल्याच्या बातम्या देत आहेत. पण ते मारले गेले नाहीत तर शहीद झाले आहेत. या भावांनी त्यांच्या धर्मासाठी आपले प्राण अर्पण केले. थोडी लाज बाळगा. तुम्ही एका बाजूने सनातन-सनातन ओरडता आणि जो सनातनसाठी लढतो तो मारला जातो. हा न्याय नाही. हा एन्काउंटर नाही, सनातन हरले आहे. धर्मासाठी लढणारे मारले जातात. आपल्या शहीद बांधवांना न्याय मिळवून द्या. जर आपण धर्मासाठी लढू शकतो, तर आपण शहीद बांधवांसाठी असे काम करू शकतो ज्याची ते कल्पनाही करू शकत नाहीत. यात कोणीही सहभागी असो, तो कितीही श्रीमंत असो किंवा शक्तिशाली असो. याला वेळ लागू शकतो, पण कोणतीही माफी मिळणार नाही असे या पोस्टमध्ये म्हटले आहे.दरम्यान १२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी अभिनेत्री दिशा पाटनीच्या बरेली येथील वडिलोपार्जित घरावर गोळीबार केला होता. हल्ल्येखोरांनी अभिनेत्री दिशा पाटनीची मोठी बहीण, निवृत्त लष्करी अधिकारी खुशबू पाटनी तिच्या माजी पोलिस अधिकारी वडील जगदीश पाटनी आणि इतर कुटुंबातील सदस्यांसह राहत असलेल्या कुटुंबाला लक्ष्य केले गेले. या घटनेपूर्वी ११ सप्टेंबरच्या रात्री त्याच घरात गोळीबार झाला होता. ११ सप्टेंबरचा हल्ला गोल्डी ब्रार टोळीचे सदस्य असलेल्या बागपत येथील रहिवासी नकुल आणि विजय यांनी केल्याचे पोलिसांनी सांगितले.

### राहुल गांधींच्या आरोपांवर

केला होता. ही संख्या जास्त असू शकते. एकूण किती मते वगळण्यात आली हे आम्हाला माहिती नाही. ही बाब चुकून उघड झाली.

ते म्हणाले, 'असं झालं की एका बूथ-लेव्हल अधिका-याला त्याच्या काकांचे मत डिलीट झाल्याचे लक्षात आले. त्याने चौकशी केली आणि त्याला कळले की ते एका शेजा-याने डिलीट केले आहे. बीएलओ त्याच्याशी बोलला. त्याने त्याच्या शेजा-याला विचारले तेव्हा तो म्हणाला, 'मी कोणतेही मत डिलीट केले नाही." याचा अर्थ असा की ज्या व्यक्तीने मत डिलीट केले आहे किंवा ज्या व्यक्तीचे मत डिलीट केले आहे त्यांना याबद्दल काहीही माहिती नव्हती. प्रत्यक्षात, दुस-याच कोणत्यातरी शक्तीने सिस्टम हायजॅक केली होती आणि ही मते डिलीट केली होती.

### राज्याला अतिवृष्टीचा फटका;

करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातही पावसाने हाहाकार माजवला आहे. बार्शी तालुक्याच्या उत्तर भागातून वाहणा-या चांदनी नदीला महापूर आला आहे, ज्यामुळे मांडेगाव, कांदलगाव, देवगावसह ८ गावांतील हजारो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. तर, दक्षिण सोलापूर तालुक्यातही झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतक-यांची दैना झाली आहे. येथील शेतांना तळ्याचे स्वरूप आले आहे. हातातोंडाशी आलेले खरीप पीक पूर्णतः पाण्याखाली गेल्याने शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे उडीद, तूर, सोयाबीन आणि मूग ही पिके गुडघाभर पाण्यात असल्याने सडू लागली आहेत. मंद्रूप, निंबर्गी, कंदलगाव, ति-हे, पाथरी, पाकणी आणि तेरामैल परिसरातील शेतक-यांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## १ व १० वरिल उर्वरित

### नवरात्र उत्सव ः शहरातील वाहतुकीत

, MIDC, दस्तूरनगर चौक, बियाणी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, ईरविन चौक, मालवीय चौक, दीपक चौक या मार्गांचा वापर करावा. -बडनेरा मार्गे जाणाऱ्या एसटी बसेस राजापेठ इरविन चौक येथील उड्डाणपुल वापरून पर्यायी मार्गाने बसस्थानक गाठतील. -नागपुरी गेटमार्गे बाहेरगावी जाणाऱ्या एसटी बसेस रेल्वे स्टेशन चौक – इरविन चौक – चित्रा चौक मार्गे धावतील. -हलकी चारचाकी वाहने (कार/जीप) आवश्यक नसल्यास राजापेठ–इरविन उड्डाणपुलाचा वापर करावा.

**भाविकांसाठी पार्किंगची व्यवस्था-** -नेहरू मैदान -ओसवाल भवन मैदान -मुधोळकर पेठ मैदान -ओसवाल भवन ते गद्रे चौक मार्गावरील एक बाजू -HVPM वळणापासून रवी नगरकडे जाणाऱ्या मार्गाची एक बाजू -सावनपुरा चौक – जवाहर गेट मार्गाची एक बाजू **या ठिकाणी वाहन पार्किंग पूर्णतः बंदी-**विशेष म्हणजे, गांधी चौक येथील देवस्थान पार्किंग स्थळ बंद राहील तसेच अंबादेवी व एकविरा देवी मंदिराच्या २०० मीटर परिसरात वाहन पार्किंग पूर्णतः बंदी असेल. २१ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान वाहतुकीत बदल व निर्बंध लागू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार कारवाई होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### शहरात ४९२ दुर्गादेवी, १०२ शारदादेवी

सीसीटीव्ही कॅमेरे व महिला स्वयंसेवक ठेवणे या बाबींवर विशेष भर देण्यात आला. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, उत्सव काळात सायबर पोलीस सोशल मीडियावर लक्ष ठेवणार, तर मिरवणुक मार्गावर सीसीटीव्ही व व्हिडिओग्राफीद्वारे नियंत्रण ठेवले जाणार आहे. मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, शस्त्र, काठ्या, आक्षेपार्ह गाणी किंवा देखावे यांवर सक्त मनाई असेल.

**असा राहिल पोलिसांचा तगडा बंदोबस्त-**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. यात ३ पोलीस उपायुक्त, ३ सहाय्यक पोलीस आयुक्त, ३० पोलीस निरीक्षक, ७० सपोनि/पोउपनि, १३५० पोलीस अंमलदार, आरसीपी व क्युआरटी प्लाटून, १ एसआरपीएफ कंपनी, ४०० पुरुष व १०० महिला होमगार्ड्स यांचा समावेश आहे. तसेच शहरात १४ सीआर मोबाईल, महिला सुरक्षेसाठी १० दामिनी पथके, बीट मार्शल, डायल ११२ वाहने पेट्रोलिंगवर असतील. पोलिस आयुक्तालयाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दक्षता घेण्याचे निर्देश दिले असून, नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी केले. तसेच दुर्गा-शारदा उत्सव, दसरा व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त त्यांनी अमरावतीकरांना शुभेच्छा दिल्या.

### युवक काँग्रेसच्या ठिय्या आंदोलनामुळे

प्राप्त झाला. त्यामुळे संतप्त होत युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तातडीने मनपा आयुक्त यांच्या दालनात धडक दिली. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीसंदर्भात असलेल्या बैठकीमुळे कुठलाही अधिकारी आज महापालिकेत उपस्थित नव्हता. त्यामुळे संतप्त युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांच्या दालनात ठिय्या मांडला. शिवरायांचा हा अपमान युवक काँग्रेस कदापि सहन करणार नसून यापुढे अशा प्रकारांमुळे शहरात कुठलीही अनुचित घटना घडल्यास त्याला सर्वस्वी मनपा प्रशासन व पोलीस प्रशासन जबाबदार राहील अशी भूमिका यावेळी युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी घेतली. तब्बल तीन तास ठिय्या देत यावेळी मनपा प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अखेर युवक काँग्रेसच्या या आक्रमक भूमिकेपुढे मनपा प्रशासनाने नमते घेत शहरातील हे सर्व आक्षेपार्ह पोस्टर्स रंगवण्याची युवक काँग्रेसची मागणी मान्य केली. मनपा प्रशासनाने युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांना सोबत घेत या प्रकारचे पोस्टर्स रंगविण्यास सुरुवात केली असून येत्या दोन दिवसात अशा पद्धतीचे सगळे पोस्टर्स रंगविण्यात येणार असल्याचे आश्वासन यावेळी मनपा प्रशासनाने युवक काँग्रेसला दिले. अमरावतीकर नागरिकांनी सुद्धा शिवछत्रपतींचा सन्मान जपत अशा पद्धतीचे पोस्टर्स कुठेही आढळून आल्यास मनपा प्रशासन अथवा युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्याची माहिती द्यावी असे आवाहन सुद्धा यावेळी करण्यात आले. या ठिय्या आंदोलनात अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, शहरजिल्हा उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश सचिव सागर कलाने, बडनेरा विधानसभा उपाध्यक्ष आशिष यादव, जिल्हा महासचिव निखिल बिजवे, एनएसयुआय शहराध्यक्ष संकेत साहू, धनंजय बोबडे, मोहित भेंडे, आकाश धुराटकर, शुभम बांबल, आकाश गेडाम, चैतन्य गायकवाड, कौस्तुभ देशमुख हे युवक काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

### टीईटी निर्णयाविरुद्ध शिक्षक महासंघाची

नियुक्त झालेल्या शिक्षकांवर हा निर्णय अन्यायकारक आहे. त्यांना सवलत देणे गरजेचे आहे. शिक्षकांच्या दीर्घ सेवाकाळाचा सन्मान राखला जावा व त्यांच्या अनुभवाला मान्यता मिळावी. टीईटी परीक्षा वेळेवर, पारदर्शक व सुटसुटीत अभ्यासक्रमासह घेण्यात यावी, जेणेकरून शिक्षकांना संधी मिळेल.

राज्य व केंद्र सरकारने शिक्षक संघटनांशी चर्चा करून, मानवी व सामाजिक परिणामांचा विचार करून धोरणात्मक पावले उचलावीत. न्यायालयीन पुनर्विचार याचिकेद्वारे या निर्णयावर पुनरावलोकन व्हावे. शिक्षक महासंघ हे शिक्षकांच्या हक्कांचे, सन्मानाचे व भविष्याचे रक्षण करण्यास कटिबद्ध आहे. हा निर्णय केवळ गुणवत्तेचा प्रश्न नसून शिक्षकांच्या जीवनावर व कुटुंबांवर होणारा परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे 'शिक्षकांच्या हक्कांचे रक्षण व न्याय मिळवण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देऊ.' असे शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी ठामपणे सांगितले. या सर्व घडामोडी प्रसंगी दिल्ली येथे श्री चंद्रशेखर भोयर यांच्या सोबत छाया दंडाळे माजी उपाध्यक्ष अमरावती जिल्हा भाजपा देखील उपस्थित होत्या.

### बनावट जन्म दाखला प्रकरणी

यांनी सांगितले. विलंबाने जन्म प्रमाणपत्रे देण्याच्या कार्यपद्धतीनुसार अंजनगावातून सुमारे पाचशे काही जणांनी बनावट जन्म प्रमाणपत्रे प्राप्त केली असून ते रद्द करण्यात आली असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले आहे. गुरवारी यासंदर्भात पुन्हा त्यांनी अंजनगाव सुर्जीला भेट दिली. नगरपालिका मुख्याधिकारी विजय लोहकरे, उपमुख्याधिकारी गोविंद त्रिपुरारी आरोग्य अधिकारी मिलिंद वानखडे, तहसीलदार पुष्पा सोळखे यांच्याशी चर्चा करुन नंतर पोलीस ठाण्यात उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे, पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांची भेट घेतली. त्यानंतर सोमय्या यांनी पत्रकार परिषदेत पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी आपण पुरावे दिले असून जन्म प्रमाणपत्र मिळविणाऱ्या सर्व लाभार्थ्यांवर अटकेची कारवाई करावी, अशी मागणी केल्याचे त्यांनी सांगितले.

### अट्टल दुचाकी चोरटा जेरबंद

उडवली गेली. १८ सप्टेंबर रोजी माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने कॅम्प परिसरातील झिरो डिग्रीजवळ सापळा रचला. त्याठिकाणी चोरीची बुलेट विकण्यासाठी आलेला इसम पोलिसांच्या हाती सापडला.

**मॅकेनिक कामातून चोरीचा धंदा-**मुदत्सीर अहमद मो. फिरोज (वय २०, रा. कसाबपूरा, वलगाव) असे आरोपीचे नाव असून, मेकॅनिकच्या नावाखाली हा इसम चोरट्यांचे धडे शिकवत होता. चौकशीत त्याने २३ दुचाक्या चोरल्याची कबुली देत पोलिसांचे डोळेच विस्फारले. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी ११ दुचाक्या जप्त केल्या तर उर्वरित १२ दुचाक्या तोडून स्क्रॅपला विकल्या असल्याचे उघड झाले. जप्त वाहनांमध्ये बुलेट, ॲक्टीवा, पल्सर, स्प्लेंडर, यूनिकॉर्नसारख्या लोकप्रिय गाड्यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे व रमेश धुमाळ यांच्या देखरेखीखाली पार पडली. निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील अमोल कडू व त्यांच्या पथकाने अट्टल चोराच्या मुसक्या आवळल्या.

### शेतकऱ्यांनो आत्महत्येचा मार्ग सोडून

असल्यचा इशारा टिकैत यांनी दिला.

त्यांनी सांगितले की शेतकरी संघटनांचे पदाधिकारी तीन दिवसीय विदर्भ दौऱ्यावर आले आहे. वर्धा मध्ये आत्महत्याग्रस्त किसान कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर त्यांनी जनसभेला संबोधित केले. मोझरी व तिवसा मध्ये झालेल्या सभेनंतर आज पदाधिकारी अमरावती मध्ये आले. जिल्हा बँकेच्या सभागृहामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद करून त्यांनी संमेलन मध्ये मार्गदर्शन केले. टिकैत यांनी आरोप केला की शासन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दबावाखाली शेतकऱ्यांची जमीन हडपण्याचे षडयंत्र करत आहे. परीयोजना आणि रस्त्यांच्या नावावर शेतकऱ्यांची जमीन हडपली जात आहे. शेतकऱ्यांना मजूर बनविण्याचा प्रयत्न शासनाद्वारे करण्यात येत असल्याचा आरोप टिकैत यांनी केला. केंद्र सरकारने कापूस आयतावरील ११% शुल्क आणि कृषी व पायाभूत सुविधांचा विकास कर रद्द केला आहे तसेच अमेरिकेने दादागिरी करीत भारताचे कापड निर्यातीवरील ५% कर लादला आहे. या साऱ्याचा वाईट परिणाम कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर होणार आहे. शेतकरी आत्महत्यामध्ये यामुळे वाढ होणार आहे. केंद्र व राज्य सरकार शेतकरी आत्महत्या व आत्महत्याग्रस्त परिवाराला मदत, शेतकरी कर्जमुक्ती या बाबीकडे दुर्लक्ष करीत आहे. अशा पार्श्वभूमीवर आत्महत्याग्रस्त कुटुंबांना व कापूस उत्पादकांना भेटून लढ्याची दिशा निश्चित करण्यासाठी संयुक्त किसान मोर्चेने विदर्भ दौरा नियोजित केला आहे. दिल्लीच्या सीमांवर झालेल्या ऐतिहासिक आंदोलनाचे दिग्गज नेते पहिल्यांदा दौऱ्यावर आले आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारिश लागू करू असे आश्वासन राज्यकर्त्यांनी दिले होते. किसान आंदोलनाला एम एस पी चा कायदा करण्याचे लिहून दिले होते ,तेही वचन सरकारने अजून पर्यंत पाळले नाही. शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांची फसून केली. यामुळे आता शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. विविध शेतकरी संघटना एकत्र येऊन या प्रश्नावर आंदोलन करण्याचा प्रयत्न करत आहे. आंदोलनाची पुढील रूपरेखा यामध्ये ठरविण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेमध्ये राकेश टिकैत यांच्या

### गोठ्यातील वासरांवर

बिबट्याने चौधरी यांच्या शेतात धाव घेऊन गोठ्यातील वासरांवर हल्ला चढविला.त्यातील एका वासरांवर ताव मारून फडशा पाडला तर याच झटापटीत गोठ्यातील एक वासरू गंभीर जखमी झाले.आज गुरुवारी सकाळी शेतकरी संतोष चौधरी हे शेतात गेले असता झालेला प्रकार त्यांच्या लक्षात आला. गोठ्यातील एका वासराचे पूर्ण पोटाचा भाग बाहेर निघाला होता तर दुसरे वासरू गंभीरवस्थेत आढळले.घटनेची माहिती चौधरी यांनी चांदूर रेल्वे वनविभागाला दिली असता त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.घटनास्थळी बिबट्याचे ठसे देखील आढळून आले.या घटनेत शेतकऱ्याच्या पशुधनाचे मोठे नुकसान झाले असून त्याची भरपाई मिळण्याची मागणी संतोष चौधरी यांनी वनविभागाकडे केली आहे.तसेच बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी देखील होत आहे.

तीन महिन्यांपूर्वी कुत्र्यावर मारला होता ताव-

गेल्या तीन महिन्यांपूर्वी बिबट्याने कवाडगव्हाण येथील मोकाट श्वानावर देखील ताव मारला असल्याची माहिती येथील नागरिक संदीप चौधरी यांनी दिली.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बिबट्याचा बंदोबस्त करावा ,जेणेकरून पशुधन व नागरिक दोन्ही वाचतील, अशी मागणी होत आहे.

### राजकमलचा रेल्वे पूल

सकाळी ४ ते सकाळी ९ वाजेपर्यंत सदर पूल भाविकांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन आज हिंदु हुँकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुधीर बोपुलकर यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आले आहे. अमरावती शहरातील ऐतिहासिक व पौराणिक असलेल्या आई अंबादेवी व आई एकवीरा देवी मंदिरामध्ये नवरात्रौत्सव काळात दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपूल बंद असल्या कारणाने या नवरात्रौत्सव काळात पुलाच्या पलिकडील भाविकांना आई अंबा व आई एकवीरा मातेच्या दर्शनापासून वंचित रहावे लागेल असे दिसते.या भागातील भाविक भक्त दररोज सकाळी ५ ते ९ च्या दरम्यान दर्शनासाठी वर्षानुवर्षापासून याच पुलावरुन पायदळ येत असतात. आता पुल बंद असल्याने दर्शनासाठी जवळचा असा कुठलाच मार्ग नाही. विशेष म्हणजे ९ दिवस उपवास करणारे भाविक भक्त यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी असतात. प्रशासनाने सदर राजकमल चौकातील रेल्वे उड्डान पूल नवरात्रौत्सव काळात सकाळी ५ ते सकाळी ९ वाजेपर्यंत म्हणजे फक्त चार तास सदर पूल पायदळ दर्शन करणा-या भाविकांसाठी उपलब्ध करुन दिला तर पुलाच्या पलिकडे राहणा-या भाविक बंधू, भगिणी आई अंबादेवी व आई एकविरादेवीच्या दर्शनापासून वंचित राहणार नाहीत. यासाठी हिंदू हुँकार संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.निवेदन देतेवेळी गणेश गौड, सुमित अनासाने, पंकज गायकवाड, शेखर अजमिरे, अमित खेडकर, योगेश किरी, ॲड. प्रथमेश गणेशकर, आशिर्वाद गौड, अभिनव हिरुळकर, मंगेश जोशी, अंकेश साहू यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर निवेदनाच्या प्रतिलिपी राज्याचे मुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार डॉ. अनिल बोन्डे, अमरावती मनपा आयुक्त, पोलिस आयुक्त यांना पाठविण्यात आल्या आहे.

### न्यायालयाने दिली जन्मठेपेची शिक्षा

कृत्यानंतर मानसिकदृष्ट्या खचलेल्या आईने आत्महत्येचाही प्रयत्न केला होता.पीडितेच्या तक्रारीवरून पोलीस तपास सुरू

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१९३४/२०२५
हुस्ना विरुध्द निरंक
पुढील तारीख ३०.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-** **हुस्ना बानो शेख साजीद,**
वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.शहापुरा नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** **निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत शेख साजिद शेख करीम हे दि.२७.०८.२०२४** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार हुस्ना बानो शेख साजीद** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हुस्ना बानो शेख साजीद** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक** २९.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

### गणेश डहाके यांचे निधन



**तिवसा/प्रतिनिधीः-** येथील सानवी ज्वेलर्स चे संचालक गणेश मनोहरराव डाहाके यांचे बुधवारी सायंकाळच्या सुमारास अकस्मात निधन झाले.मृत्युसमयी ते ३९ वर्षाचे होते.त्यांच्या या अकस्माती निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

**जाहीर सुचना**

शाह अंजुमन सोशल वेलफेअर सोसायटी, अकोट, ता.अकोट, जि.अकोला, नोदणी क्र.एफ-६१०२/अकोलाच्या मालकीची व ताब्यात असलेली खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत विकणे आहे, तरी गरजूंनी आपली निविदा खालील दिलेल्या पत्यावर पाठवावी.

मिळकतीचे वर्णन :- मौजा लोणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील शेत गट नं.४६,स.नं.२२६/३ पोट खराब ०.०२ एकुण क्षेत्रफळ ०.४७ ज्याची चर्तुसिमा पुढील प्रमाणे : पुर्वेस- सरकारी रस्ता, पश्चिमेस- श्री रामहरी गोदे यांचे शेत, उत्तरेस- संजय नारायण बोबडे यांचे शेत, दक्षिणेस- नाला व विलास कुरळकर यांचे शेत

**अटी व शर्ती**

१) जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २० दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर निविदा बंद लिफाफ्यात रजिस्टर पोस्ट व्दारे पाठवावी. अथवा संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्वतः आणून द्यावी. जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २० दिवसच्या नंतरच्या दुस-या दिवशी सकाळी ११.०० वा. सर्व निविदा धारकांनी उपस्थित राहावे, त्यांच्या या विश्वस्तांसमोर निविदा उघडल्या जातील. सर्वात जास्त बोली धारकाला मालमत्ता विक्री करार केल्या जाईल.

२) निविदा मंजुर झालेल्या धारकाला खरेदी खर्च व कोर्ट खर्च द्यावा लागेल.

३) खरेदी ही मा. धर्मदाय सह आयुक्त अमरावती यांची परवानगी मिळाल्यानंतर करुन देण्यात येईल.

४) ज्याची निविदा मंजुरी झाली असेल त्याला इसारापोटी २५ टक्के रक्कम बिनव्याजी द्यावी लागेल. काही कारणास्तव मा. धर्मदाय सहआयुक्त अमरावती यांनी परवानगी नाकारल्यास इसारापोटी घेतलेली रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

दिनांक -

आपला
सही/-
**सचिव**
**शाह अंजुमन सोशल वेलफेअर सोसायटी अकोट, ता.अकोट. जि.अकोला, नोंदणी क्र.एफ-६१०२/अकोला**

**कार्यालयाचा पत्ताः-**
शाह अंजुमन सोशल वेलफेअर सोसायटी
शाहसबुरपुरा, अकोट,ता.अकोट,जि.अकोला
व्दारा ॲड.युसुफ शाह नजीर शाह

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## महाबोधी विहार मुक्तीसाठी वाशिम जिल्ह्यात जनआक्रोश मोर्चा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**बिहार येथील महाबोधी विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मस्थान भारतीय बौद्ध महासभेला मिळावे आणि नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमी डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांच्या अखत्यारीत द्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.**



या मोर्चाचे नेतृत्व भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दलाचे जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ भगत यांनी केले. मोर्चाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून हाती फलक व बॅनर घेऊन हजारोच्या संख्येने कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

या मोर्चात वाशिम जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने बौद्ध बांधव, महिला-पुरुष कार्यकर्ते तसेच आंबेडकरी चळवळीतील असंख्य पदाधिकारी सहभागी झाले होते. प्रचंड गर्दीमुळे वाशिम शहरात ऐतिहासिक उत्साह व जनआक्रोशाचे वातावरण निर्माण झाले होते. या मोर्चाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी तीव्र भावना व्यक्त करताना म्हटले की, 'आम्ही काही पैसे मागत नाही, अन्न मागत नाही. आम्हाला आमची श्रद्धास्थाने हवीत. सर्व समुदायांचे धार्मिक स्थळे त्यांच्या ताब्यात असताना बौद्धांचे जागतिक तीर्थक्षेत्र महाबोधी विहार हिंदूंच्या ताब्यात आहे, हे अन्यायकारक असून आमच्या श्रद्धा-भावनांना ठेच पोहोचवणारे आहे. बुद्धगया मुक्तीसाठी सरकार टाळाटाळ करीत आहे, त्यामुळे आज आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत.'

### बौद्ध बांधवांचा प्रचंड सहभाग

मोर्चात जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ भगत यांच्यासह देवानंद वाकोडे, प्रा. मुकुंद वानखेडे, हरिश्चंद्र पोफळे, संध्याताई पंडित, प्रमिला शेवाळे, अनिल तायडे, आकाश इंगळे, हर्षल इंगोले, अश्विन खिल्लारे, शालिग्राम पठाडे, गोपाल लबडे, प्रा. रंगनाथ धांडे, सोनाजी इंगळे, ज्योती इंगळे, डी. एस. कांबळे, नागोराव उचित, माधव हिवाळे, एन. यू. वानखेडे, प्रमोद बेलखेड, संजय सोनोने, प्रा. मुकुंद खडसे, संजय खाडे, रणपाल सावळे, वासुदेवराव भगत, धम्माल कांबळे, अभिमन्यू पंडित, माधव खडसे, संजय भगत, बाळू पोफळे, कैलाश इंगळे, विकास खिल्लारे, विनोद भगत, सूर्यकांत गायकवाड, स्वप्निल खडसे, सत्यप्रकाश भगत, विजय सोनुने आदींसह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हा मोर्चा डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत एकाच दिवशी काढण्यात आला. बौद्ध समाजावरील अन्यायाविरोधात दाखवलेल्या आक्रोशामुळे प्रशासनासह जनतेचेही लक्ष वेधले गेले. कार्यक्रमाचे संचालन अनिल तायडे यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार प्रदर्शन करण्यात आले.

## 'सेवा पंधरवडा उपक्रमा'चा नागरिकांनी लाभ घ्यावा

### तहसीलदार डॉ. येवलीकर यांचे नागरिकांना आवाहन

■ प्रतिनिधी | मानोरा ■



सेवा पंधरवाडा उपक्रमात शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व सेवा थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने यात सहभाग नोंदवून उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मानोरा तहसीलदार डॉ. संतोष येवलीकर यांनी केले आहे.

या सेवा पंधरवड्यात शासनाच्या अनेक महत्त्वाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न होणार आहेत. जनजागृती मोहीम, माहितीपर कार्यक्रम आणि शासकीय सेवा घरपोच उपलब्ध करून देण्यावर यावेळी विशेष लक्ष जात आहे.ग्रामीण भागातील नागरिकांनाही या योजना सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी मंडळ स्तरावर स्वतंत्र शिबिरे आणि जनसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.गावोगावच्या पांदन रस्त्यांची पाहणी व दुरुस्तीची कार्यवाही, सर्वांसाठी घरे योजनेस पूरक कार्यक्रम, जिल्हाधिकारी पातळीवर स्थानिक परिस्थितीनुसार नाविन्यपूर्ण उपक्रम, ३० सप्टेंबर रोजी आदिसेतू आणि जनसंवाद शिबिर, याचे मंडळ स्तरावर विशेष आयोजन करण्यात येईल. तसेच महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रशासकीय कामांना गती मिळणार आहे.

## ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत मध्ये दि. १७ रोजी शुभारंभ करण्यात आला.



यानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील फुलंब्री या गावातील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामविकासाच्या योजनांमध्ये कोणतेही गाव मागे राहू नये यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानातून राज्यातील २८ हजार ग्रामपंचायती व ४० हजार गावे मॉडेल म्हणून विकसित करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**सीईओ अर्पित चौहान यांची उपस्थिती :** जिल्ह्यातील कोंडाळा झांबरे (ता. वाशिम) या गावात झालेल्या ग्रामसभेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने यांची उपस्थिती होती.तसेच इतर गावांमध्ये पंचायत समिती स्तरावरून नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

या अभियानांतर्गत कोट्यावधी रुपयांची बक्षीस गावांना मिळणार आहेत. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या या अभियानातील स्पर्धेत यशस्वी ग्रामपंचायतींना तब्बल २५० कोटींची पारितोषिके दिली जाणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात पारितोषिके देणारी ही पहिलीच योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## केनवड येथे ताडपत्री वाटप कार्यक्रम



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिवसेना नेत्या आमदार भावनाताई गवळी यांच्या पुढाकारातून तसेच युवासेना जिल्हाप्रमुख प्रदिप पाटील मोरे यांच्या सहकार्याने रिसोड तालुक्यातील केनवड सर्कल येथे ताडपत्री वाटपाचा भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

केनवड येथील अकोला जिल्हा बँकेसमोर झालेल्या या उपक्रमात शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला. अलीकडच्या सततच्या पावसामुळे शेतमाल सुरक्षित ठेवण्याची चिंता शेतकऱ्यांसमोर निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत उपलब्ध करून दिलेल्या ताडपत्र्यांमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. सवलतीच्या दरात वाटप झालेल्या या ताडपत्र्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. मात्र दुसरीकडे, पावसाने थैमान घातल्यामुळे शेतकऱ्यांना तोंडचा घास हिरावल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. आगामी हंगामात पीक कमी प्रमाणात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर युवासेना जिल्हाप्रमुख प्रदिप पाटील मोरे यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या हा विषय घेवून सवलतीच्या दरात ताडपत्री उपलब्ध करून दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमाला शिवसेना व युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

## दोनच वर्षांत 'दुरुस्तीची दुरुस्ती' भ्रष्ट यंत्रणेचे उघडे पडलेले रस्ते!

### तर नागरिकांच्या संयमाचा बांध फुटणार

■ विशेष प्रतिनिधी ■

***अकोला : शहरातील सध्या सुरू असलेले काँक्रिट रस्त्यांचे दुरुस्ती काम केवळ गाडीखालचा रस्ता नव्हे, तर नागरिकांच्या विश्वासाखालचा पाया उखडण्याचे भयंकर उदाहरण आहे. काही वर्षांपूर्वी कोट्यवधी रुपये खर्चून सिमेंट काँक्रिट रस्ते बनवले गेले. त्यावेळी 'हे रस्ते दहा-पंधरा वर्षे टिकतील' असा गाजावाजा करण्यात आला. पण वास्तविकता अशी की, अवघ्या दोन-तीन वर्षांतच हेच रस्ते पुन्हा-पुन्हा फोडले जात आहेत, आणि पुन्हा नव्याने काँक्रिट टाकले जात आहे. हे काम म्हणजे अपयशी नियोजन, निकृष्ट दर्जा आणि भ्रष्ट यंत्रणेचे ठळक उदाहरण असल्याची संतप्त प्रतिक्रिया सुज्ञ नागरिक देत आहे.***



याबाबत सविस्तर वृत्त असे की, सन २०१७ मध्ये अकोला मनपावर भाजपाने एक हाती सत्ता काबीज केली होती. शहराचा विकास होणार. सुंदर, स्वच्छ आणि दर्जेदार रस्त्यांची निर्मिती होणार अशी तोंडी आश्वासन दिली होती. यावेळी सत्ता प्राप्तीनंतर कोट्यवधी रुपयांच्या निधीतून शहरात तब्बल आठ प्रमुख सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. त्याचवेळी रस्त्याचे काम सुरू असताना अनेक ठिकाणी भेगा पडल्या होत्या.

त्या वेळी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सोशल ऑडिट करून या रस्त्यांचा दर्जा उघडकीस आणला होता. मात्र, त्यानंतर काय झाले? काहीच नाही! उलट, कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी आपली तोंडे आपापसात 'सेट' केली आणि एका तांत्रिक ऑडिटद्वारे या रस्त्यांना आणि कंत्राटदाराला 'योग्य' ठरवीत रस्त्यांच्या दर्जाला मजुरवर्गाला कारणीभूत ठरविले होतें. हे म्हणजे चोरानेच पंच व्हावे, अशी अवस्था त्यावेळी शहरात अनेकांना बघायला मिळाली.


आता रतनलाल प्लॉट चौक ते टॉवर चौक, दुर्गा चौक ते अग्रसेन चौक, आणि सिव्हिल लाईन चौक ते मुख्य पोस्ट ऑफिस चौक – या मुख्य मार्गांवर पुन्हा खोदकाम सुरू आहे. मागे एकदा पॅचेस काढून नव्याने काँक्रीटीकरण केले गेले होते, आणि आता पुन्हा त्याच रस्त्यावर 'दुरुस्ती' चालू आहे. ज्यांनी हे काम मंजूर केलं, त्याच अधिकाऱ्यांनी आणि अभियंत्यांनी कामाच्या गुणवत्तेची तपासणी केली की नाही? केली असेल, तर त्यात दोष का सापडले नाहीत? आणि दोष सापडलेच, तर त्या कंत्राटदारावर कारवाई का झाली नाही? याहून गंभीर बाब म्हणजे – लोकप्रतिनिधींचं या भ्रष्ट कारभारावर मौन का? जनतेच्या पैशाचा असा खेळ चालू असताना, या लुटीत सहभागी ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी का केली जात नाही? असे नानाविध यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तर यावर आवाज उचलला जात नाही कारण एवढंच की, सगळ्यांचे हात या गोंधळात रंगलेले आहेत की काय? अशी जहरी टीका यानिमित्ताने पुन्हा एकदा शहरातील अनेक सुज्ञ नागरिक करीत आहे.

अकोल्याची जनता संयमी आहे, पण मुकी नाही. रोजचा प्रवास, वाहतूक कोंडी, धुळीमुळे होणारे आजार, इंधनाचा अपव्यय, अपघातांचे वाढते प्रमाण – या सगळ्याचा भर पडतो आहे नागरिकांच्या जीवनावर. मग एवढं सगळं सहन करूनही, जबाबदार व्यक्तींवर कुठलीही कारवाई होत नाही, ही बाब केवळ लाजीरवाणी नाही, तर धोकादायक आहे.

ही परिस्थिती थांबवायची असेल, तर आता वेळ आली आहे या कामांची स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी करण्याची, दोषी ठेकेदार कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्याची, आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची अन्यथा, पुढच्या काही वर्षांत आपण 'दुरुस्तीच्या दुरुस्तीची' देखील दुरुस्ती करीत बसू. या शहराचे भविष्य रचणं हे केवळ सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांवर नाही, तर प्रशासनाच्या नैतिक बांधिलकीवर आणि जनतेच्या जागरूकतेवर अवलंबून आहे. आता तरी डोळे उघडले पाहिजेत आणि या भ्रष्ट प्रवृत्तींचा नायनाट करायला पाहिजे अशी मागणी केल्या जात आहे.

## नवरात्रौत्सवात अद्भुत श्रीललितासहस्त्रनाम अर्चना

### भक्तांसाठी दिव्य आध्यात्मिक पर्व



■ प्रतिनिधी | वाशिम ■

२२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान दुर्गाचौक येथील देवी-गणपती मंदिरात सकाळी ६ ते ७ धार्मिक वातावरणात सामूहिक अर्चना. नवरात्रौत्सवानिमित्त शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती, वाशिम यांच्या वतीने विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

अश्विन शु. प्रतिपदा घटस्थापना तदनुसार सोमवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ पासून ते अश्विन शु. नवमी महानवमी तदनुसार बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सामूहिक अद्भुत श्रीललितासहस्त्रनाम अर्चना होणार आहे.

हा दिव्य धार्मिक सोहळा श्री देवी-गणपती मंदिर, दुर्गाचौक येथे दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत पार पडणार आहे. या अर्चनेदरम्यान श्रीललितांबिका परमेश्वरीचे सहस्त्रनामाने पूजन होईल. श्रीललितांबिका ही आद्याशक्ती असून, तिच्या सहस्त्रनामाचा जप केल्याने श्रीमहाकाली, श्रीमहासरस्वती व श्रीमहालक्ष्मी या त्रिगुणात्मिका जगदंबेच्या कृपेचा वर्षाव होतो, असा अनुभव भक्तांना लाभत असल्याचे समितीचे पदाधिकारी सांगतात.

नवरात्रौत्सव काळात भाविकांना आध्यात्मिक उन्नती, मनःशांती व भक्तिभावाचा अनुभव घेण्यासाठी ही अर्चना अत्यंत उपयुक्त ठरेल. यासाठी शहरातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि दिव्य अनुभूती घ्यावी, असे आवाहन श्रीमाता अमृतानंदमयी सत्संग समिती, वाशिम तर्फे करण्यात आले आहे.

## देगाव तांडा येथे पेट्रोलनेही नाही पेटली चिता; पावसाने केली दुर्दशा

### पावसात शव पेटत नसल्यामुळे गावकरी संतप्त; जिवंतपणीच्या यातना मृत्यूनंतरही संपेनात

■ प्रतिनिधी | वाशिम ■



तालुक्यातील देगाव तांडा येथे दि. १७ सप्टेंबर रोजी एका वृद्ध महिलेचे निधन झाले. त्यांना अंत्यसंस्काराला नेल्यानंतर स्मशानभूमीत अंत्यसंस्काराचे शेड नसल्यामुळे उघड्यावरच अंत्यसंस्कार करावे लागले. पावसामुळे शव पेटत नसल्यामुळे अनंत अडचणींचा सामना गावकऱ्यांना करावा लागला. या प्रकारामुळे गावकऱ्यांनी शासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त केला.

आजही जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्मशानभूमीसाठी स्वतंत्र जागा नाही. तर ज्या गावांमध्ये स्वतंत्र जागा आहे तिथे अंत्यसंस्काराचे शेड बांधलेले नाहीत. अनेक गावांमधील ही परिस्थिती आहे. देगाव तांडा येथील येथील स्मशानभूमीत तीन शेड बांधलेले नाही. अशातच दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता गावातील वृद्ध महिला स्व. धरमीबाई किसन राठोड ८५ यांचे निधन झाले. दरम्यान मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्यामुळे पाऊस थांबेल या अपेक्षेवर सायंकाळी ६ वाजेपर्यंत गावकऱ्यांनी प्रतीक्षा केली. मात्र तरीही पाऊस न थांबल्यामुळे गावकऱ्यांनी अंत्यसंस्काराची तयारी केली. मृतात्म्यास चिताग्नी दिल्यानंतर पावसाने जोर पकडल्यामुळे प्रचंड अडथळा निर्माण झाला. यावेळी सरनावर पेट्रोलचा मारा करण्यात आला. तरीसुद्धा सरन पेटण्यास अडथळा येत होता. यावेळी उपस्थित नागरिकांनी शासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त केला. जोपर्यंत गावात स्मशानभूमीचे शेड व इतर व्यवस्था निर्माण होत नाहीत तोपर्यंत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय गावकरी घेणार असल्याचे बोलले जात आहे.

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार भारतीय स्टेट बँक यांच्या कडून श्री नकुल अशोकराव उपाध्ये हे त्याच्या मालकीचे मौजे भिलखेडा, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथील शेत सर्व्हे /गट नंबर ७/१ तिरुपती नगर मधील प्लॉट क्र. ७४/ए याचे एकंदर क्षेत्रफळ ११२.५० चौ. मी. जागेवर कर्ज घेत आहे, परंतु सदर प्लॉटचा जुना मूळ खरेदीखताचा दस्त (दस्त क्र. ४१५५/२०१०) हा दिनांक ३०/०८/२०२५ रोजी मौजे काजलेश्वर, ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथून गहाळ झाले असुन त्या स्वरूपाची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशन कारंजा (ग्रामीण), ता. कारंजा (लाड), जि. वाशीम येथे दिनांक १७/०९/२०२५ रोजी दिली असुन त्याचा साना क्र. ३४/२५ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदीता बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर १५ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

**सही**
**ॲड. व्ही. व्ही. ठाकरे**
शॉप नं. एल १०, वर्धमान प्लाझा,
स्टेट बँक समोर, कारंजा (लाड), जि. वाशीम
मो. नं. ९७६६८८०७६४, ९१४६०४८३१४

## खिर्डा येथे विशेष ग्रामसभा उत्साहात पार

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील खिर्डा येथे दि.१७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच/उपसरपंच विद्या शेषराव शिंदे होत्या.



ग्रामसभेच्या प्रारंभी सरपंच विद्या शिंदे यांनी ग्रामपंचायतीचा मागील वर्षातील उत्पन्न-खर्चाचा सविस्तर अहवाल ग्रामस्थांसमोर ठेवला. त्यानंतर चालू असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन पुढील काळात राबविण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण विकासकामांचा ऊहापोह करण्यात आला.आपल्या अध्यक्षीय भाषणात सरपंच विद्या शिंदे म्हणाल्या की, 'गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य सुविधा, ग्रामविकास निधीचा योग्य वापर आणि महिला-बालकल्याण यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी यासाठी लघु सिंचन प्रकल्प आणि विहिरीवर भर दिला जाईल. गावातील रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण, गटारींची स्वच्छता, कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र योजना हाती घेतली जाणार आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, ग्रंथालयासाठी नवीन पुस्तके व डिजिटल साधनसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.' त्यांनी पुढे सांगितले की, 'गावातील महिलांसाठी स्व-सहायता गटांना प्रशिक्षण, लघुउद्योग प्रोत्साहन तसेच बेरोजगार तरुणांसाठी रोजगार हमी योजना, प्रशिक्षण शिबिरे व उद्योजकता विकास कार्यक्रम राबविण्यात येतील.

> गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शासकीय योजना पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने राबविणे हेच आमचे प्रमुख ध्येय आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून 'खिर्डा' हा तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत ठरावा, हीच आमची इच्छा आहे.'
>
> \- **प्रतिमा जमधाडे,** ग्राम सचिव खिर्डा

गावाने एकत्र येऊन सहकार्य दिल्यास खिर्डा हा तालुक्यातील आदर्श ग्रामविकासाचा नमुना ठरेल.' सभेमध्ये ग्रामपंचायत सचिव प्रतिमा जमधाडे, अंगणवाडी सेविका उज्ज्वला चव्हाण, आशा सेविका पूजा खिल्लारे, ग्रामपंचायत सदस्या मालताबाई वैद्य, कविता पिराणे, कांचन वैद्य, मनीषा इंगळे तसेच ग्रामपंचायत सदस्य संदीप काळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक किर्तनकार, रोजगार सेवक परमेश्वर कव्हर, तलाठी पांडे साहेब, संगणक चालक केशव गिद, कोतवाल दीपक जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी सरपंच अभिमान मुळे, माजी ग्रामपंचायत सदस्य कमलसिंग जाधव, वाचनालय अध्यक्ष सुभाष जाधव, माझी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अरुण गिद, ग्रामपंचायत कर्मचारी सिद्धार्थ वैद्य , निरंजन जाधव, शेषराव मुळे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष संदेश सरकटे, अनिकेत चव्हाण आदींनीही ग्रामसभेत सहभाग नोंदवला. यावेळी गावातील महिला, पुरुष तसेच तरुणवर्गानेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून गावच्या विकासासाठी आपले मत व्यक्त केले. संपूर्ण ग्रामसभा शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव गिद यांनी केले तर आभारप्रदर्शन ग्राम सचीव प्रतिमा जमधाडे यांनी मानले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २९२ ■ शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आशा वर्कर व गटप्रवर्तिकांना वेतनश्रेणी द्या-कॉ.यशवंत झाडे



**आष्टी जनमाध्यम :** आशा वर्कर आणि गटप्रवर्तिका यांचे काम पाहता त्यांना त्वरित वेतनश्रेणी लागू करावी आणि सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, अशी मागणी शीटू कामगार संघटनेचे नेते कॉ. यशवंत झाडे यांनी केली. ते येथे नुकत्याच संपन्न झालेल्या मेळाव्यात बोलत होते.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थान रोशनी राऊत यांनी भूषवले तर उद्घाटन शेतमजूर युनियनचे राज्य नेते कॉ. दिलीप शापामोहन यांच्या हस्ते झाले. झाडे म्हणाले, 'आशा वर्करवर सरकारने प्रचंड कामाचा व्याप टाकला असून त्याऐवजी मिळणारे मानधन अत्यल्प आहे. वाढत्या महागाईत कामगार जगणे कठीण झाले आहे. यासाठी जोरदार संघर्ष उभारणे गरजेचे आहे.'उद्घाटक शापामोहन यांनी शासनाच्या कामगारविरोधी धोरणांवर टीका करत अधिकारांच्या लढ्यासाठी आंदोलन तीव्र करण्याचे आवाहन केले. सिटूचे जिल्हाध्यक्ष कॉ. भैय्याजी देशकर यांनी तालुक्यात संघटन अधिक मजबूत करण्यावर भर दिला. आशा युनियनच्या अर्चना घुगरे, वैशाली टिपले, अल्का जराते यांनीही मनोगत मांडले.

पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल जेष्ठ पत्रकार ढोकेसर यांचा यशवंत झाडे व भैय्याजी देशकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच गटप्रवर्तिका सुवर्णा इंगोले व रोशनी राऊत यांचाही विशेष गौरव झाला. मेळाव्यात पुढील तीन वर्षासाठी नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्षपदी दिपाली बालपांडे, कार्याध्यक्षपदी रोशनी राऊत, तर सचिवपदी आशा डेहनकर यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सिमा काळे व मंगला मनहोरे, तर कोषाध्यक्षपदी स्वाती जाचक यांची निवड एकमुखाने झाली.

सुत्रसंचालन आशा डेहनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनिल घिमे यांनी केले. संजय भगत यांचे 'सिटू जिंदाबाद' या घोषणांनी मेळाव्याची सांगता झाली. या मेळाव्यात तालुक्यातील शेकडो आशा वर्कर व गटप्रवर्तिका सहभागी झाल्या होत्या.

## जिल्हाधिकारी मॅडम... काळ्या रेतीवर अंकुश नसेल तर घरमालकांवर गुन्हे दाखल करा!

### रेतीमाफियाचा धुमाकूळ, प्रशासन बधिर?

**वर्धा रवींद्र लाखे :** शहरातील रेतीमाफियाचा गाजावाजा इतका बोकाळला आहे की 'कायद्याचा धाक' हा शब्दच आता मख्ख झालाय. गल्लोगल्ली रेतीचे ढीग उभे आहेत, मुख्य रस्त्यांवर कोट्यवधींची काळी रेती खुलेपणाने विक्रीला आहे आणि जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक मात्र हातावर हात ठेवून झोपले आहेत. जनता विचारतेय ही निष्क्रियता आहे का, की थेट रेतीमाफियांशी हातमिळवणी?

**जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक डोळस की डोळसामोर आंधळे?**

रेतीघाट बंद असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात काळी रेती बाजारात उभी आहे, म्हणजे 'थेट वरच्या गाठी' नसतील तर हे शक्यच नाही. माफियांचे ट्रक धडाड धडाड शहरभर फिरतात, ढीग उभे राहतात, आणि तरीही कारवाईचा पत्ता लागत नाही. मग प्रशासकीय यंत्रणा लोकांच्या पैशावर पोसू नका, थेट माफियांच्या घशाला गोंजारताय का असा सवाल नागरिक कडाडून करत आहेत.

**कायद्याला झुगारून चालणारा माफिया**

आज ही रेती फक्त शहरातील बांधकामांच्या गल्लोगल्ली नाही, तर कायद्याच्या छाताडावर पाय ठेवून विकली जाते आहे. काही पोलीस ठाण्यांचे, काही कार्यालयांचे संरक्षण नसते तर माफियाची एवढी दादागिरी शक्यच नव्हती. स्पष्टपणे सांगायचं तर माफिया 'कायद्यालाच ठेचून' स्वतःचा कायदा चालवत आहेत.

**रेतीच्या ढिगांसमोर लोकही बधिर!**

तज्ज्ञ म्हणतात, 'मागणी संपली तर पुरवठा आपोआप थांबेल.' पण खरेदीदार आंधळे करून माफियाचं पोषण करतायत. आज जनतेनं ठरवायचं आहे, घरासमोर रेतीचा ढीग दिसला तर फक्त प्रशासनाला दोष द्यायचा, की स्वतःही गुन्हेगार समजून शिक्षा भोगायला तयार रहायचं?

**प्रशासन झोपेत नाही, तर 'गाढ झोपेत'!**

हे चित्र बघून स्पष्ट होतं प्रशासन आंधळं-बधिर नाही, तर जाणीवपूर्वक गाढ झोपेचं नाटक करतंय. कारण जेव्हा रात्रीच्या अंधारात माफियाचे ट्रक भरधाव धावतात, त्यांचा थांबा कुठेच लागत नाही, तेव्हा एखाद्या नागरिकाला वाटतं पोलीस आणि अधिकारी खरेच जिवंत आहेत का, की फक्त खुर्चीवर बसलेली पोकळी?

काळ्या रेतीचा एक ढीग जरी रस्त्यावर सापडला, तर संबंधित ठेकेदार, घरमालक, दलाल सगळ्यांवर थेट गुन्हा दाखल करा.

सालोड परिसरातील रेती चोरी प्रकरणात प्रशासनाच्या निष्क्रियतेवर गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. महसूल विभाग, खनिज विभाग आणि पोलिस प्रशासन या सर्वांनी मिळून रेत माफियांच्या वाढत्या कारवाया आयोग्य प्रमाणात थांबवण्यात अपयश अनुभवले आहे.

अनेक ठिकाणी प्रशासनाचे दुर्लक्ष व गफलत असल्याने चोरटे बिनधास्तपणे अवैध रेत उपसा व वाहतूक करीत आहेत. यामुळे स्थानिकांमध्ये तणाव निर्माण झाला असून ते प्रशासनाच्या कारवाईची मागणी करत आहेत.

**काळी रेतीचा गोंधळ; रामनगर परिसरात खळबळ-**

रामनगर व पोद्दार बगीचा परिसरात पाच-सहा ठिकाणी काळी रेती साठवलेली आढळली आहे. घरबांधणीदरम्यान ही रेती कोणी आणली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रशासनाने चौकशी करून घरमालक व रेती आणणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**वर्धा जनमाध्यम :** 'एचआयव्ही-एड्स विषयक योग्य माहिती मिळवणे व जागरूक राहणे हेच आपले संरक्षण आहे,' असे प्रतिपादन जिल्हा सामान्य रुग्णालयाचे समन्वयक अमित छल्लानी यांनी केले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी संत महाविद्यालय, वर्धा येथे आयोजित एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रमाला सुरुवात झाली.



या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई व जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभाग, सामान्य रुग्णालय, वर्धा यांच्या वतीने करण्यात आले. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना (ँण्ध) यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत एड्ससंबंधी जागरूकता पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या दोन महिन्यांच्या जिल्हास्तरीय मोहिमेचा तो एक भाग होता.

कार्यक्रमाला प्रा. नरहरी राऊत, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण कडू, कार्यकारी अधिकारी प्रशांत कडू, प्रा. संतोष कानोजे, प्रा. निखिल अंबुलकर, प्रा. राहुल काळबांडे, प्रा. संतोषी कुणघटकर, प्रा. ममता मरसकोल्हे, प्रा. तृप्ती ठावरे, प्रा. मायुरी भालेराव आदी मान्यवरांसह कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## BHMS-CCMP नोंदणीविरोधात IMA वर्ध्याचा टोकन संप; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

**वर्धा जनमाध्यम :** राज्य सरकारने ँप्शए पदवीधरांना ण्ण्श्इ (क्रॅश कोर्स इन मॉडर्न फार्मसी) पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये (श्शण) नोंदणी देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याची मागणी भारतीय वैद्यक संघटनेने (घ्ट्टँ) केली आहे. या मागणीसाठी घ्ट्टँ वर्धा शाखेच्या पुढाकाराने गुरुवार १८ सप्टेंबर रोजी शहरातील सर्व वैद्यकीय सेवा बंद ठेवून एक दिवसीय टोकन संप आयोजित करण्यात आला.



सकाळपासून वर्धा शहरातील खासगी दवाखाने, रुग्णालये पूर्णपणे बंद राहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शांततेत मोर्चा काढण्यात आला. मोर्चात मोठ्या संख्येने मान्यवर डॉक्टर्स सहभागी झाले. जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी शिष्टमंडळामार्फत मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

कार्यक्रमात घ्ट्टँ वर्धा शाखेच्या अध्यक्षा डॉ. राजसबाला ढांडे, सचिव डॉ. शिरीष वैद्य, डॉ. अरुण पावडे, डॉ. जयंत मकरंदे यांच्यासह शहरातील अनेक वरिष्ठ डॉक्टरांचा सहभाग होता. यात डॉ. विनोद अदलखिया, डॉ. किरण खेर, डॉ. प्रवीणा खेर, डॉ. राजेंद्र डागा, डॉ. सचिन पावडे, डॉ. स्मिता पावडे, डॉ. धमत, डॉ. प्रदीप सुने, डॉ. सुनील महाजन, डॉ. नहुष घाटे, डॉ. मोना सुने, डॉ. संजय मोगरे, डॉ. उज्वला मोगरे, डॉ. शशांक बनाईत, डॉ. प्रतापसिंह परिहार, डॉ. अमित पुजारी, डॉ. शांतनू चव्हाण, डॉ. वैशाली चव्हाण, डॉ. अंजली पुजारी, डॉ. शिल्पा राऊत, डॉ. स्वप्निल तळवेकर, डॉ. विलास धगे, डॉ. अनुज जैन यांचा समावेश होता. पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. अरुण पावडे, डॉ. जयंत मकरंदे आणि डॉ. शिरीष वैद्य यांनी घ्ट्टँ च्या भूमिका स्पष्ट केल्या. ँप्शए-ण्ण्श्इ धारकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देणे हा निर्णय अन्यायकारक व वैद्यकीय व्यवसायाला तडा देणारा आहे. हा निर्णय सरकारने तातडीने मागे घ्यावा. अन्यथा घ्ट्टँ कडून राज्यभरात अनिश्चित मुदतीचा तीव्र संप पुकारला जाईल,' असा इशारा या प्रसंगी देण्यात आला.

या संपामुळे वर्धा शहरात रुग्णसेवा प्रभावित झाली असली तरी आपत्कालीन सेवा सुरू ठेवण्यात आल्याने तातडीच्या उपचारांची सुविधा उपलब्ध होती.

## चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीची हत्या; पतीस आजीवन कारावास

**वर्धा जनमाध्यम :** पत्नीच्या चारीत्र्यावर संशय घेऊन तिची निर्घृण हत्या करणारा पती इम्रान खान जिलानी खान रा. रहेमत नगर, नांदेड, ह.मु. खंडाला गाव, कल्हान, नागपूर या नराधम पतीस वर्धा येथील जिल्हा न्यायालयाने आजीवन कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे.

मृतक व आरोपी दोघेही २०१९ मध्ये विवाहबद्ध झाले होते. लग्नानंतर नांदेड येथे राहण्यासाठी गेले.त्या ठिकाणी गेल्यानंतर आरोपी पती इम्रान हा सतत पत्नीवर संशय घेत वाद घालत असल्याने आरोपीच्या भावाकडे राहण्यासाठी आली होती. आरोपी हा सतत वाद घालत होता.मृतक पत्नीला घेऊन जाण्यासाठी आरोपीने मृतकाच्या आईला बोलावून घेतले.दिनांक ११ एप्रिल २०२२ रोजी आरोपीने दोघांना वर्धा बस स्थानक येथे भेट घेण्यासाठी बोलाविले.मला तिच्या सोबत संसार करायचा नाही असे पीडितेच्या आईला सांगण्यात आले. दिनांक १२ एप्रिल २०२२ रोजी वर्धा येथे माहेरी आलेल्या पत्नीवर आरोपीने बॅटने मारहाण करून अंगणात ओढत नेले आणि २० किलो वजनाच्या दगडाने डोक्यावर वार करून तिचा जागीच खून केला. हल्ल्यात बचाव करण्यास गेलेल्या मृतकाच्या आईलाही आरोपीने मारहाण केली.

घटना पानठेला व चहाच्या टपरीधारकांनी प्रत्यक्ष पाहिली. तत्काळ पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेत गुन्हा दाखल केला.सावंगी येथील तपास पोलीस उपनिरीक्षक मल्हारी ताळीकोटे यांनी केला. सरकारी पक्षाचे अतिरिक्त अभियोक्ता विनय आर घुडे यांनी युक्तिवाद करत ११ साक्षीदारांची साक्ष नोंदवून घेतली. त्यात मृतकाची आई, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी आदींच्या साक्षींसह आरोपीच्या कपड्यांवरील रक्ताचे डाग, वापरलेली बॅट व दगडावरील रक्ताचे पुरावे व दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून

जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति. सत्र न्यायाधीश सय्यद अमीर सय्यद मोहम्मद अली यांनी आरोपीस दोषी ठरवित कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली.

## माहेश्वरी भवन येथे अमृत मेळावा संपन्न

**वर्धा जनमाध्यम :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवती तसेच व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी राज्य शासनाच्यावतीने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही स्वायत्त संस्था सुरु करण्यात आली आहे. या संस्थेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची व योजनांची माहिती देण्यासाठी माहेश्वरी भवन येथे अमृत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



मेळाव्याचे उद्घाटन अमृतपेठचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय व्यवस्थापक देवदत्त पंडीत, उपव्यवस्थापक विक्रम पांडे, ब्राम्हण सभेचे अध्यक्ष विलास कुलकर्णी, सचिव महेश देशपांडे, माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष विजय राठी, सचिव धर्मेंद्र मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी -अमृत या संस्थेच्यावतीने युवक युवती व नवीन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्यांसाठी विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक व सर्वांगीण विकासाचे दरवाजे खुले आहेत. त्यामुळे सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमोल चव्हाण यांनी केले. तसेच तसेच अमृपेठ या नव्या उपक्रमाची माहिती सांगून हे एक अत्याधुनिक खरेदी विक्री दालन असून स्थानिक उत्पादक व उद्योजकांना त्यांच्या उत्पादनाला थेट बाजारपेठ उपलब्ध करुन देत आहे, असे सांगितले

देवदत्त पंडीत यांनी अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजना, कौशल्य विकास उपक्रम व उद्योग उभारणीसाठीच्या विविध प्रकल्पाबाबत माहिती उपस्थितांना सांगितली.

मेळाव्यास ब्राम्हण, माहेश्वरी, अग्रवाल, गुजराती, कामटी, राजपूत, ठाकूर, पाटीदार, राजपुरोहित, सिंधी आदि खुल्याप्रवर्गातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन मनोज मोहता यांनी केले तर आभार जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेष खराटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नागपूर विभागातील जिल्हा व्यवस्थापक, उपव्यवस्थापक, अमृत मित्र व सखी यांनी परिश्रम घेतले.

## मिनिमली इनवेसिव्ह स्टेंटिंग पद्धतीचा केला यशस्वी वापर

### बारा वर्षीय रुग्णावर शस्त्रक्रियेविना हृदयोपचार

**वर्धा जनमाध्यम -** पारंपरिक पद्धतीने होणारी ओपन हार्ट शस्त्रक्रिया टाळत केवळ बारा वर्षे वय असलेल्या रुग्णाच्या दुर्मिळ जन्मजात हृदयविकारावर मिनिमली इनवेसिव्ह स्टेंटिंग प्रक्रियेद्वारे सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात यशस्वी उपचार करण्यात आले.

जन्मतःच हृदयविकाराने त्रस्त असलेल्या या बालरुग्णात उजवे कर्णिक (राइट एट्रियम) आणि ऊर्ध्व महाशीर म्हणजे हृदय व रक्तवाहिन्यांची कार्यप्रणाली सुरळीत करणारी झडप नसलेली रक्तवाहिनी (सुपीरियर व्हेना कावा) यांच्या जोडणीच्या ठिकाणी अलिंद पटल दोष (एट्रियल सेप्टल डिफेक्ट) या अत्यंत दुर्मिळ प्रकाराच्या आजाराचे निदान झाले होते. अशा प्रकारचा दोष बालरुग्णांमध्ये क्वचितच आढळतो. कमी वयाच्या रुग्णाची ओपन हार्ट शस्त्रक्रिया करणे टाळले जाते.



त्यामुळे सावंगी रुग्णालयातील हृदयरोग विभागप्रमुख डॉ. गजेन्द्र अग्रवाल यांनी मिनिमली इनवेसिव्ह स्टेंटिंग पद्धतीद्वारे उपचार करण्याचा निर्णय घेतला आणि कार्डि?क कॅथेटरायझेशन प्रयोगशाळेत ही दुर्मिळ प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्णत्वास नेण्यात आली. कॅथ लॅबमधील या उपचार प्रक्रियेत डॉ. अग्रवाल यांना हृदयरोगतज्ज्ञ डॉ. आकाश लोखंडे, डॉ. हर्षल पावडे, डॉ. चेतन राठी, डॉ. वैभव राऊत आणि डॉ. वैभव महाले यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

विसंगत फुफ्फुसीय शिरासंबंधीचा निचरा किंवा परतावा हा फुफ्फुसीय नसांचा जन्मजात हृदय दोष आहे. मुलांमधील अशा जटिल जन्मजात हृदयविकारांवर मात करणे मिनिमली इनवेसिव्ह स्टेंटिंग प्रक्रियेमुळे आणि उपचार करणाऱ्या अनुभवी डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे शक्य झाले. प्रगत तंत्रज्ञानामुळे आता अधिक सुरक्षित आणि कमी त्रासाचा हा पर्याय उपलब्ध असून रुग्णांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा करणारी ही परिणामकारक उपचारपद्धती आहे. सध्या सदर बालरुग्णात हृदयरोगाची कोणतीही लक्षणे शिल्लक नसून तो निरोगी व आनंदी जीवन जगतो आहे, असे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गजेन्द्र अग्रवाल यांनी सांगितले.

## भाजपाकडून स्मशानभूमीत स्वच्छता अभियान

### -पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पुलगाव जनमाध्यम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता पंधरवड्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीकडून करण्यात आले असून त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्मशानभूमी परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.



या उपक्रमात भाजपाचे जिल्हा अध्यक्ष संजय गाते, शहर अध्यक्ष प्रशांत इंगोले, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, शहर महामंत्री रिचर्ड क्रॉस, रुपेश जोशी, भारत नागपाल, ज्ञानेश्वर कुंभारे तसेच महिला मोर्चा अध्यक्षा सानिका बढिये, माधुरी इंगोले, शिल्पा ठाकूर, दुर्गा व्यास, शैलजा जांभुळकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले.

हिंदू स्मशानभूमी परिसरात कचरा गोळा करणे, स्वच्छता राखणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे अशी कामे या उपक्रमांतर्गत पार पडली. स्वच्छ भारत अभियानाला चालना देत मोदींचा वाढदिवस केवळ साजरा न करता सामाजिक कार्याशी जोडण्याचा प्रयत्न पुलगाव भाजप परिवाराने केला. या उपक्रमातून परिसर स्वच्छ होण्याबरोबरच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबतची जाणीव अधिक घट्ट झाली. समाजातील प्रत्येकाने अशा मोहिमेत सहभागी होऊन स्वच्छता हीच सेवा मानावी, हा संदेशही देण्यात आला.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर दिवे यांच्यावर मतदार नोंदणीची जबाबदारी

**वर्धा जनमाध्यम :** आगामी विधान परिषद पदवीधर नागपूर विभाग निवडणुकीसाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर दिवे यांची मतदार सह नोंदणी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केली.



मागील निवडणुकीत या विभागात भाजपाला पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यामुळे या निवडणुकीसाठी पक्षाने विशेष तयारी सुरू केली असून यावेळी विजय मिळवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

या संदर्भात बोलताना सुधीर दिवे म्हणाले, 'आपल्यावर दिलेली जबाबदारी पूर्ण ताकदीने पेलू. भाजपाचा उमेदवार विजयी होण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणार आहोत.'


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार आशिष विनोदराव भांदक्कर यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा सिंदी मेघे, मौजा नं. १४३, त. स. कं. १९, ता. जि. वर्धा येथील ग्राम पंचायत सिंदी मेघे च्या ह?द्दीतील शेत सर्वे कं. ४८, १५५ जुना व १५५/२ नविन मधील प्लॉट नं. ३५ चा उत्तरेकडील भाग ज्याची एकूण आराजी ८३३.९० चौ. फुट म्हणजेच ७७.५० चौ. मी. इतकी असुन त्याची

चतुःर्सिमा :-

पुर्वेसः रोड,

पश्चिमेसः प्लॉट नं. ३८ व ३९,

उत्तरेसः प्लॉट नं. ३४,

दक्षिणेसः याच प्लॉट चा उर्वरीत भाग,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. १३,२५,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री. प्रकाश हरी गिरी आणि श्री. उद्धव कमलाकर पुरी हे मौजा- वर्धा मौजा क्रमांक ८५, प ह क्रमांक क्रमांक १ ब, पश्चिम बाजूच्या ूँ भुकंड क्रमांक १३६२ सुदामपुरी वॉर्ड क्रमांक ६ तह येथे १०२.५० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेले हे घरत चे मालक आहेत.. या घराच्या चतुरसीमा आहेत. पूर्व- श्री. उद्धव कामकाकर पुरी यांचे घर, पश्चिम- वझुरकर यांचे भूखंड उत्तर- महाकाळकर यांचे घर, दक्षिण- रोड श्री. कमलाकर महादेव पुरी यांनी दिनांक १६-०६-१९९९ रोजी सुदामपुरी वॉर्ड क्रमांक ६ ५३.१५९ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली मालमत्ता श्री. शंकरराव शिवराम भारती यांना दस्त क्रमांक १५२० अन्वय विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे. त्यानंतर श्री. शंकरराव शिवराम भारती यांनी ५३.१५९ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली मालमत्ता श्री. प्रकाश हरी गिरी ह्यांना दिनांक १७-०३-२००६ रोजी यांनी दस्त क्रमांक १७२२/२००६ अन्वय विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे .

श्री. कमलाकर महादेव पुरी यांनी २२-०६- १९९५ रोजी हिंदू दत्तक कायद्याच्या अनुपालन प्रक्रियेनुसार श्री. अमोल प्रकाश गिरी या मुलाला दत्तक घेतले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या दत्तक मुलाचे नाव श्री. उद्धव कमलाकर पुरी असे बदलले. त्यानंतर श्री. उद्धव कमलाकर पुरी हे कमलाकर पुरी यांचे कायदेशीर पुत्र झाले. दरम्यान, श्री. उद्धव कमलाकर पुरी यांनी श्री. शंकरराव शिवराम भारती यांच्याविरुद्ध सीजेएसडी वर्धा येथे दिवाणी खटला क्रमांक ४३१/१९९९ मध्ये प्रकरण दाखल केले. त्या प्रकरणात दोन्ही पक्षकारांनी आपसी समझौता करून माननीय न्यायालयासमोर हा खटला निकाली काढला आणि सदर प्रकरण मागे घेतले. त्यानुसार न्यायालयाने हा खटला निकाली काढला आणि शंकरराव शिवराम भारती यांना पश्चिम बाजूच्या भुखंडाचा त्यांचा भाग मिळाला जो म्युटेशन क्रमांक २२५ द्वारे प्रॉपर्टी कार्डवर स्वतंत्रपणे नोंदविण्यात करण्यात आला. या दिवाणी खटल्यात श्री. प्रकाश हरी गिरी यांनी शंकरराव शिवराम भारती यांच्याकडून ५३.१५९ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या मालमत्तेचा भाग आधीच खरेदी केला आहे. म्हणून, वरील मालमत्तेच्या अर्ध्या वाट्यासह श्री. प्रकाश हरी गिरी यांच्या नावावर नोंद क्रमांक ६२२५ द्वारे नोंदवले आहे. श्री. प्रकाश हरी गिरी यांनी श्री. गुरुस्वामी महिला नागरी बँकेकडून कर्ज घेतले आहे आणि संपूर्ण भूखंड तेथे दिनांक २०-११-२०१३ रोजीच्या दस्तऐवज क्रमांक ८३२३/२०१३ द्वारे आरएम डीडद्वारे गहाण ठेवले आहे. तो प्रॉपर्टी कार्डवर नोंदवला आहे. श्री. प्रकाश हरी गिरी यांनी २८-०८-२०२५ रोजी भूमी अभिलेख कार्यालय विभाग वर्धा येथे सदर सोसायटीचा बोझा काढून टाकण्यासाठी अर्ज केला. त्या अर्जानुसार त्यांनी कर्जाची परतफेड केल्याचे दिसून येते आणि सोसायटी बंद (बंद) आहे आणि त्यामुळे त्यांना कोणतेही देय प्रमाणपत्र मिळू शकले नाही परंतु सर्व मूळ दस्तावेज त्यांना सुपूर्द केले गेले आहेत. या प्रकरणामुळे श्री. गुरुस्वामी महिला नागरी बँकेकडून रिलीज डीड करता येत नाही. १६-०६-१९९९ रोजीच्या मूळ लिंक सेल डीड क्रमांक १५२० श्री. प्रकाश हरी गिरी यांनी गमावला आहे.माझ्या क्लायंटने द टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, आर्वी रोड, वर्धा येथे कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व सार्वजनिक, सरकारी, निमशासकीय आणि जमीन महसूल तलाठी विभाग आणि सहकारी सोसायटी/बँकेला कळविण्यात येते की जर कोणाला वरील व्यवहारांबद्दल काही आक्षेप असतील आणि जर कोणाला मूळ विक्री करार किंवा कोणतेही शुल्क आढळले तर कृपया सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड.आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा, मो.९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# मीनाताई ठाकरे पुतळा विटंबना प्रकरणी विकृत आरोपीला अटक

**मुंबई:** शिवाजी पार्क मैदानावरील मीनाताई ठाकरे याच्या पुतळ्याच्या विटंबने प्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी गुरूवारी रात्री उशीरा दादर येथून उपेंद्र पावस्कर (३५) याला अटक केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या आधारे ओळख पटवून ही कारवाई करण्यात आली आहे. त्याची कसून चौकशी सुरू आहे. त्याने यापूर्वी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या पोस्टरचीही विटंबना केल्याचा संशय आहे.

दादरच्या शिवाजी पार्क मैदानाच्या प्रवेशद्वारावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी दिवंगत मीनाताई ठाकरे यांचा पुतळा आहे. या पुतळ्याची विटंबना झाल्याचा प्रकार बुधवारी सकाळी उघडकीस आला. अज्ञात इसमाने पुतळ्यावर लाल रंग (ऑईल पेंट) फेकला होता. या प्रकारामुळे खळबळ उडाली होती. शिवाजी पार्क पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २९८ अन्वये गुन्हा दाखल केला. आरोपीचा शोध घेण्यासाठी तीन विशेष पथके तैनात करण्यात आली होती.



**सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे अटक**

या प्रकणाचे राज्यभर पडसाद उमटले होते. संतप्त शिवसैनिकांनी शिवाजी पार्क परिसरात गर्दी केली होती. कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील घटनास्थळी भेट दिली होती आणि आरोपीला २४ तासांत अटक करण्याची मागणी केली होती. गृहराज्य मंत्री योगेश कदम हेही पोलिसांकडून तपास कामाचा आढावा घेत होते. शिवाजी पार्क पोलिसांनी घटनास्थळावरील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाच्या आधारे रात्री उशीरा उपेंद्र पावस्कर (३५) याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी सुरू आहे. तो दादर येथे वास्तव्यास आहे. त्याने हा प्रकार का केला त्याचा तपास पोलीस करत आहेत.

वाकोला नाल्याच्या स्वच्छतेसाठी महापालिकेचा पुढाकारष्ठ मिठी नदी कचरा-मुक्त करण्यासह विविध बाबींवर कार्यशाळेत चर्चा

**उध्दव ठाकरेंच्या बॅनरचीही विटंबना ?**

आरोपी दादर खेड गल्ली येथे वास्तव्यास असून त्याच्या या कृतीमागील हेतूबाबत तपास सुरू असल्याचे पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

दरम्यान, याआधीही अटक आरोपीने शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पोस्टरची विटंबना केली होती, अशी माहिती पोलिसांना मिळाल्याचे समजते. त्यादृष्टीने तपास सुरू आहे.

**तणाव निवळला, पोलीस बंदोस्त कायम**

आरोपीच्या अटकेमुळे तणाव निवळला आहे. उध्दव ठाकरे यांनी सर्वांना संयम राखण्याचे आवाहन केले आहे. परंतु खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजी पार्क परिसरात पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे.

# 'आम्ही केलेल्या घोषणा कागदावर राहणार नाहीत'- मुख्यमंत्री फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर :** दोन वर्षापूर्वी मंत्रिमंडळ बैठकीत आम्ही घेतलेले निर्णय कागदावर राहिलेले नाहीत. गेल्या काही दिवसात सात प्रकल्पाची घळभरणी होऊन सिंचन क्षमता वाढली आहे. कृष्णा खोऱ्यातील पाणी आता लवकरच पोहचेल. त्याच बरोबर सांगली पुरात वाहून जाणारे पाणीही मराठवाड्यात आणले जाईल. उल्हास नदीचे ५४ अब्ज घनफूट पाणी दिले जाईल. पश्चिम नद्यांचे पाणी आणण्यासाठी डिसेंबरपर्यंत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार होतील आणि त्यानंतर जानेवारी – फेब्रुवारीपर्यंत निविदा प्रसिद्ध होतील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी ध्वजारोहणानंतर ते बोलत होते.





दोन वर्षापूर्वी घेतलेल्या बैठकीचा सर्व लेखाजोखा मांडता येईल.

या बैठकीत वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिर, तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिर यांना निधी दिला असून औंढा येथील मंदिराचा विकास आराखडा पूर्ण करण्यात आला आहे. मानव विकास मीशन अंतर्गत ९४ बस देण्यात आले असून ९१६ अंगणवाड्याही बांधून तयार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हायब्रीड अन्युटीमधून ७११५ कोटींची रस्त्याची काम सुरू असून एक लाख १४ हजार सिंचन विहिरी पूर्ण केल्या आहेत. त्यामुळे आम्ही घेतलेली मराठवाड्यातील बैठक केवळ औपचारिकता नव्हती, असा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

केवळ एवढे नाही तर छत्रपती संभाजीनगर शहरासाठी पाणी पुरवठा योजनेस निधी देण्यात आला असून महापालिकेचा ८०० कोटी रुपयांचा स्वहिस्सा भरण्याचा प्रश्नही आता सुटला आहे. समृद्धी महामार्गामुळे अन्य राज्यातील गुंतवणूकही वाढत असून संभाजीनगर हे शहर आता इव्ही वाहन उत्पादनचे प्रमुख केंद्र बनले आहे. लातूरच्या रेल्वे कोच फॅक्टरीचे काम आता पूर्ण होत असून त्यात १४ हजार जणांना नोकऱ्या मिळतील.

त्याच बरोबर अहिल्यानगर ते बीड असे रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले आहे. आम्ही मराठवाड्याच्या विकासासाठी काम करत राहू, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# बेकायदा बांधकामांवरील कारवाईचा मुद्दा



**मुंबई :** नवी मुंबई महापालिकेने बेकायदा बांधकामांना कायद्याप्रमाणे नोटीस बजावून कारवाईची प्रक्रिया सुरू केलेली असताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोणत्या अधिकारात या नोटिशींना स्थगिती दिली ? नियोजन प्राधिकरणांच्या अशा कारवायांना अशी स्थगिती देण्याचा अधिकार नगरविकासमंत्री म्हणून उपमुख्यमंत्र्यांना आहे का ? असा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला. तसेच, कोणत्या अधिकारा खाली उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या नोटिशींना स्थगिती दिली हे माहिती घेऊन स्पष्ट करा, असे आदेशही न्यायालयाने सरकारी वकिलांना दिले.

उपमुख्यमंत्र्यांच्या निर्णयाला कॉन्शस सिटीझन्स फोरम या स्वयंसेवी संस्थेने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच, उपमुख्यमंत्र्यांचा आदेश बेकायदा ठरवून तो रद्द करण्याची आणि महापालिकेने बजावलेल्या पाडकाम नोटिशीच्या अंमलबजावणीची मागणी केली आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने सुनावणीच्या वेळी प्रकरणाच्या सर्व बाबी तपासल्यानंतर या प्रकाराची गंभीर दखल घेतली.

# राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचा गौण खनिज आराखडा

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश



**पुणे :** राज्यातील अनेक जिल्ह्यात गौण खनिज क्षेत्र जाहीर झालेले नसल्यामुळे कृत्रिम वाळू उत्पादकांना वेगवेगळ्या विभागांची परवानगी घ्यावी लागत आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील महिन्याभरात गौण खनिज क्षेत्राचा आराखडा करून तो राज्य शासनाला सादर करावा, असा आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

राज्य शासनाच्या सेवा पंधरवडा उपक्रमाअंतर्गत नव्याने लागू केलेल्या 'एम सँड' धोरणासंदर्भात बावनकुळे यांनी खाण चालक क्रशर मालक बांधकाम व्यावसायिक आणि अधिका-यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यावेळी गौण खनिज क्षेत्राचा आराखडा जाहीर झालेला नसल्याचे स्पष्ट झाले.

'एम सँड धोरण चांगले आहे. ग्रामपंचायतींच्या ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची आवश्यकता नाही ही बाब स्तुत्य आहे.

मात्र दीर्घ मुदतीचा खाणपट्टा घेण्यासाठी त्रास सहन करावा लागतो. दीर्घमुदतीचे खाणपट्टे घेताना ग्रामपंचायतींचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले आहे. त्या मुळे ती अट रद्द करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्यावर ग्रामपंचायतींनी तीस दिवसांच्या कालावधीत परवानगी न तिल्यास त्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर राहिल अशी सुधारणा शासन निर्णयात केली जाईल. सरसकट खाण उद्योगांना सवलती मिळणार नाहीत. खाणचालकांनी एम सँड प्रकल्प तीन वर्षांच्या आत टाकणे बंधनकारक आहे. त्यानंतरच त्यांना सर्व सवलती मिळतील असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# गणेशोत्सवात तब्बल सहा लाख कोकणवासियांनी केला एसटीतून प्रवास

## एसटीला मिळाले २३ कोटी ७७ लाख रुपये उत्पन्न

**मुंबई :** गणेशोत्सवात मुंबई, ठाणे आणि पालघर क्षेत्रातून सुमारे ५ लाख ९६ हजारांहून अधिक कोकणवासीयांनी एसटीने सुखरूप प्रवास केला. यातून एसटी महामंडळाला सुमारे २३ कोटी ७७ लाख रुपये उत्पन्न मिळाले. तथापि, आपआपल्या गावी, वाड्या-वस्त्यांवर या लाखो कोकणवासीयांना सुखरूप घेऊन जाणारे चालक-वाहक, त्यांना मदत करणारे यांत्रिक कर्मचारी व मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक -अधिकारी अभिनंदनास पात्र आहेत, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.



यावर्षी गणेशोत्सवात एसटीतर्फे कोकणवासियांसाठी ५ हजार जादा एसटी बसची सोय करण्यात आली होती. या बसच्या १५ हजार ३८८ फेऱ्यांमधून ५ लाख ९६ हजार प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला. एसटी महामंडळाने प्रवाशांची सुरक्षित आणि अपघातविरहित वाहतूक करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळामध्ये चालवलेल्या या वाहतुकीमध्ये एसटी प्रशासनाने योग्य नियोजनाच्या आधारे गेल्या अनेक वर्षातील सर्व विक्रम मोडून काढत यावर्षी तब्बल ५ हजार बसद्वारे ५ लाख ९६ हजाराहून अधिक प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली.

# पाऊण तासाची पत्रकार परिषद निवडणूक आयोगाला ७ दिवसांचा अल्टिमेटम

**मुंबई-** केंद्रीय निवडणूक आयोग व देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर आज लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गंभीर आरोप केले.

२०२३ मध्ये कर्नाटकमध्ये झालेल्या निवडणुकीत वोट चोरी झाल्याचा दावा राहुल गांधींनी केला असून त्यासंदर्भातले काही पुरावेदेखील त्यांनी पत्रकार परिषदेत सादर केले. मतदार यादीतून काही व्यक्तींची नावं वगळण्यासाठी त्यांच्या ओळखीचा वापर भलत्याच व्यक्तींनी केल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, यासाठी राज्याबाहेरचे मोबाईल क्रमांक ओटीपीसाठी वापरले गेल्याचंही ते म्हणाले. जवळपास पाऊण तास चाललेल्या सादरीकरणानंतर राहुल गांधींनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे एक महत्त्वपूर्ण मागणी केली.

**राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल**

यावेळी पुरावे सादर करताना राहुल गांधींनी केंद्रीय निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर परखड शब्दांमध्ये टीका केली. 'देशात चालू असलेली मतचोरी कोण करतंय हे निवडणूक आयुक्तांना माहिती आहे. पण ते या सगळ्या घोटाळेबाजांना पाठिशी घालत आहेत, त्यांचा बचाव करत आहेत', असा आरोप राहुल गांधींनी केला.



शेवटी राहुल गांधींनी केली 'ही' मागणी!

'कर्नाटकमध्ये फेब्रुवारी २०२३ मध्ये गुन्हा दाखल झाला. राज्य सीआयडीनं निवडणूक आयोगाकडे यासंदर्भातली माहिती मार्च २०२३ मध्ये मागितली. ऑगस्टमध्ये निवडणूक आयोगानं उत्तर दिले, पण त्यात माहिती दिलेली नव्हती. जानेवारी २०२४ मध्ये सीआयडीने पुन्हा निवडणूक आयोगाला पत्र लिहून पूर्ण माहितीची मागणी केली.

पण त्यावर उत्तर आले नाही. सप्टेंबर २०२५ मध्ये सीआयडीनं निवडणूक आयोगाला शेवटचं पत्र लिहिले. हे सगळे होत असताना कर्नाटक निवडणूक आयोगाने केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आणि या माहितीची मागणी केली. अनेकदा ही मागणी केली गेली.

पण त्यावर काहीही उत्तर देण्यात आले नाही. त्यामुळे हा स्पष्ट पुरावा आहे की जे लोक हे करत आहेत, त्यांना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार वाचवत आहेत', असा थेट आरोप राहुल गांधींनी केला.

# संक्षिप्त

## रेल्वे प्रवास आणखी सुकर

**पुणे :** भारतीय रेल्वेने स्वदेशी तंत्रज्ञानाने विकसित केलेली 'कवच' ही स्वयंचलित रेल्वे सुरक्षा प्रणाली मध्य रेल्वेच्या ७५० हून अधिक रेल्वे चालकांच्या इंजिनमध्ये (लोकोमोटिव्ह) बसविण्यास रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली आहे.रेल्वे प्रवाशांचा प्रवास यामुळे अधिक सुरक्षित होणार आहे. सोलापूर विभागातील धवळस ते भाळवणी या २६ किलोमीटर रेल्वे मार्गिकेवर 'कवच' या स्वयंचलित प्रणालीची चाचणी नुकतीच घेण्यात आली. त्यामध्ये थांब्यावर लोकल रेल्वे धोकादायकपणे सिग्नल ओलांडण्याबाबत (सिग्नल पास डेंजर), अचानक थांबा निर्माण करणे (ब्लॉक सेक्शन एसओएस), स्थानक प्रमुखाद्वारे थांबा निर्माण करणे (स्टेशन मास्टर एसओएस) आणि रुळ बदलताना रेल्वेची गती सुनिश्चित करणे (टर्नआउट्स ओव्हरस्पीड) या प्रकारच्या चार आधारांवरील चाचण्या यशस्वी पार पडल्या. त्यामुळे रेल्वे सुरक्षिततेत वाढ होऊन, सुरक्षित गाडीसंचलनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.त्याचबरोबर भविष्यातील तंत्रज्ञानासाठी संपूर्ण परिसंस्था तयार करून प्रगत सुरक्षा नियमांची काटेकोर प्रशिक्षण व अंमलबजावणी यासाठीची बांधिलकी निश्चित केल्याची माहिती रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांनी दिली.



## महाराष्ट्रातील पावणेदोन लाख डॉक्टर संपावर

**मुंबई :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी करण्यास परवानगी देण्याच्या निषेधार्थ, इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) या डॉक्टरांच्या सर्वात मोठ्या संघटनेशी संलग्न राज्यभरातील सुमारे एक लाख ८० हजार डॉक्टर आज, गुरुवारी संपावर जाणार आहेत.राज्य सरकारने ५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी करण्याचे निर्देश दिले आहे. आतापर्यंत परिषदेमध्ये केवळ आधुनिक वैद्यकशास्त्राचा अभ्यास पूर्ण केलेल्या ॲलोपॅथी डॉक्टरांची नोंदणी होत होती. मात्र नव्या निर्णयामुळे रुग्णहिताला बाधा निर्माण होण्याची भूमिका घेत, इंडियन मेडिकल असोसिएशनने या निर्णयाविरोधात एक दिवसाचा संप पुकारला आहे. राज्यातील एक लाख ८० हजार डॉक्टर यामध्ये सहभागी होणार आहेत.



## शेतकरी कवटाळतोय मृत्यूला

**छत्रपती संभाजीनगर :** शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारस्तरावर विविध प्रयत्न सुरू आहेत. मात्र, असे असतानाही शेतकरी आत्महत्यासत्र कायम असल्याचे विदारक चित्र आहे. नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आदी कारणांमुळे गेल्या आठ महिन्यात मराठवाड्यातील ७०७ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली.मराठवाड्यात सर्वदूर सिंचनाची सोय नाही. कोरडवाहू क्षेत्र अधिक असल्याने निसर्गावरच अवलंबून आहेत. मागील काही वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा सामना या शेतकऱ्यांना करावा लागत आहे. कधी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान तर कधी मालाला भाव नाही. त्यामुळे बिघडलेले आर्थिक गणिते, अशा या चक्रात शेतकरी सापडला आहे. या व इतर कारणांमुळे मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येच्या घटनेत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे.



## नागपुरात पावसाच्या दमदार सरी, वाहतुकीला फटका

**नागपूर :** नागपूर शहरात सोमवारी हवामानाने अचानक बदल घेतला आणि जोरदार पावसाने हजेरी लावली. सकाळी अकरा वाजता हलक्या सरींनी सुरुवात झाली आणि काही वेळातच काळ्या ढगांनी आकाश व्यापले. दुपारपर्यंत झमाझम पावसामुळे शहर पाण्यात भिजले. या अवकाळी सरींमुळे शहरात काही ठिकाणी जलभराव निर्माण झाला असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक मार्गांवर वाहतूक संथ झाली, तर काही ठिकाणी वाहतूक कोंडीची स्थिती उद्भवली. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे दुचाकीस्वारांचे हाल झाले. याशिवाय सतत गडगडणाऱ्या ढगांच्या आवाजामुळे शहराचे वातावरण आणखी नाट्यमय झाले.



## भारतात लग्न करण्यासाठी आलेल्या अमेरिकन महिलेला संपवले

**चंदिगढ:** अमेरिकन महिलेला लग्नाच्या आमिषानं भारतात बोलावून तिची हत्या करण्यात आल्याची भयंकर घटना उघडकीस आली आहे. महिलेला बेसबॉलनंच्या बॅटनं बेदम मारहाण करण्यात आली. त्यात तिचा मृत्यू झाला. यानंतर महिलेचा मृतदेह पेटत्या कोळशांवर ठेवण्यात आला. मृतदेहाची विल्हेवाट लावल्यावर शिल्लक राहिलेली हाडं नाल्यात फेकून देण्यात आली. या भयंकर घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.अमेरिकेहून भारतात आलेल्या ७१ वर्षीय रुपिंदर कौर पंधेर नावाच्या महिलेची १२ जुलैला डेहलोतील रायपूर परिसरात हत्या करण्यात आली. पोलिसांनी हत्या प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. त्याला हत्येची सुपारी ब्रिटनहून देण्यात आली होती. खुनाची सुपारी देणाऱ्या सूत्रधाराविरोधातही हत्येचा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रपिंदर कौर यांचा दोनदा घटस्फोट झालेला होता.



## ग्राहकांच्या चेहऱ्यावर उमटले समाधान

**मुंबई-**सराफा बाजारात सोन्याचे भाव गेल्या काही दिवसांपासून गगनाला भिडलेत. सोन्यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ लागत आहे. अशातच आज, १८ सप्टेंबर २०२५ रोजी, गुरुवारी भारतीय बाजारात सोन्याच्या दरात बदल झाल्याचे पाहायला मिळाले आहे. किमतीत किंचिंत घसरण झाली आहे. तर चांदीच्या दरातही बदल झाल्याचं पाहायला मिळालं आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## आत्महत्या आणि असंतोष

**म**हाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबता थांबण्याचे नावा घेत नाही. या आत्महत्या थांबविण्याकरीता केंद्र आणि राज्य सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी मदतीचे पॅकेज जाहीर केले. गेल्या २५ वर्षांत कमीअधिक परिणामकारक अशा वेगवेगळ्या कर्जमाफीही दिल्या गेल्या. पण, त्याने प्रश्न मिटला नाही. मिटणारही नाही. तात्पुरत्या मलमपट्ट्यांनी रुग्ण आणि डॉक्टर अशा दोघाचंही समाधान होईल कदाचित. पण, त्याने दुखणे बरे होणार नाही; रुग्ण आजारातून बाहेर येणार नाही.वेदना कमी व्हाव्यात यासाठी जसा बधिरीकरणाचा उपचार केला जातो आणि त्यातून रुग्णाला दुखणं बरं झाल्याचा भास होतो, तसे आजवरच्या उपाययोजनांचे झाले आहे. आत्महत्यांच्या संख्या त्यामुळेच अचानक वाढतात आणि वातावरणात अस्वस्थता पसरते. राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारकडून या संदर्भातली जी आकडेवारी मांडली गेली, त्यामुळे या दुखण्याकडे पुन्हा एकदा सगळ्यांचे लक्ष गेले. या वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विधिमंडळाच्या सभागृहात सांगितले गेले. म्हणजे, दर तीन तासामागे एका शेतकऱ्याची आत्महत्या होत होती!! यावर्षीच्या आत्महत्यांत सर्वाधिक आत्महत्या विदर्भातल्या असून त्यातही यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांतील आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. आत्महत्यांपैकी २५७, म्हणजे सुमारे ३३% आत्महत्या या पाच जिल्ह्यांतच झाल्या आहेत. मराठवाड्यात याच काळात १९२ आत्महत्या झाल्या असून त्यानंतरच्या तीन महिन्यांत, जून अखेरीपर्यंत आणखी ५५ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. १९९५ नंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या अनेक योजना राबवल्या गेल्या. देशभर राबवली जात असलेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, पीक विमा योजना, सवलतीच्या दरात खते-बियाणे देऊनही या दुखण्याला उतार पडायला तयार नाही. उलट, ते अधिकाधिक गंभीर होत असून त्याचा रोष आता मोर्चे-आंदोलनांतून बाहेर पडू लागला आहे.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे महाराष्ट्रातील प्रदेश आणि संख्या यात गेल्या अनेक वर्षांत फारसा फरक पडला नसला, तरी त्याची कारणे मात्र वेगवेगळी आहेत. अनेक वेळा तर ती परस्परविरोधी पाहायला मिळतात. त्यामुळे, या दुखण्याला एकच एक उपाय नाही. पण, सर्व आत्महत्यांची कारणे पाहून त्यावर उपाययोजना करण्यासाठी व्यापक आराखडा तयार केला आणि त्यातील उपायांची प्रदेशनिहाय प्राधान्याने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित त्याचे सकारात्मक परिणाम मिळतीलही. सरकारने वेळोवेळी अनेक उपाययोजना लागू केल्या. त्याची यशस्वी अंमलबजावणी झाल्याचे अहवाल सरकारदप्तरी जमा आहेत.तरीही आत्महत्या थांबत नसतील, तर औषधातच काहीतरी गडबड आहे,त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही हे सरकारने स्वीकारण्याची गरज आहे.अनेक स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या परीने या प्रश्नाला भिडायचा प्रयत्न केला आहे.शेतकऱ्याने; घरातल्या कर्त्या पुरुषाने आत्महत्या केल्यानंतर मागे राहिलेल्या त्याच्या पत्नीला, मुलाबाळांना धीर देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय करण्याचा प्रयत्न या संस्थांकडून सुरू आहे. त्याला यशही येत आहे. पण, स्वयंसेवी संस्थांचे हे प्रयत्न एकूण गरज पाहता तोकडे पडताहेत. दुर्घटना घडल्यानंतर उर्वरित कुटुंबीयांची काळजी घेण्याची गरज असतेच; पण त्याहीपेक्षा दुर्घटना घडणारच नाही यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. अशी उपाययोजना केवळ सरकारच करू शकते. केंद्र आणि राज्यातील सरकारांनी केवळ या एकाच प्रश्नासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करून, त्यात तज्ज्ञांचा समावेश करून महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखायला हवा. शेतकऱ्याला दोरीच्या फासापर्यंत जावेच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी.खरंतर,हे सगळ्यांनाच मान्य आहे. याबाबत कोणाचेच दुमत नाही.पण, तरीही जे प्रयत्न व्हायला हवेत, ते होताना दिसत नाहीत. उलट, या आत्महत्यांबद्दल संशय निर्माण करणाऱ्या कथा चर्चिल्या जातात हे दुर्दैव आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमालाला रास्त भाव न मिळणे, शेतमालाचा बहुतांश असंघटित बाजार-यानंतर आता वातावरणीय बदलाचाही समावेश या संकटांमध्ये होतो आहे. अन्य सामाजिक, सांस्कृतिक कारणे त्यानंतर आहेतच. यातल्या कोणत्या प्रश्नांना सरकारकडे उत्तर असेल आणि कोणते प्रश्न स्वयंसेवी संस्थांच्या हाती सोपवायचे याचा विचार करून दोन्ही पातळ्यांवर त्यासाठी काम करावे लागेल. महाराष्ट्रात आरक्षणासाठी जसे मराठ्यांचे आंदोलन सुरू आहे, तसेच अन्य राज्यात तिथले धारक; शेतकरी समाजही याच कारणासाठी रस्त्यावर आले आहेत. आपल्या दु:स्थितीला आरक्षण हे उत्तर नाही, हे त्यांनाही माहीत आहे. पण, जखमेवर फुंकर घालणे ही त्यांची गरज आहे. शेतीच्या प्रश्नाकडे प्राधान्याने, गांभीर्याने पाहिल्याखेरीज, मक्तेदारी अर्थव्यवस्थेकडे चाललेली वाटचाल बदलल्याखेरीज फासाला लटकावून घेणाऱ्या बळीराजाला दिलासा मिळणार नाही. शेतीसंबंधी असा मूलभूत विचार केला नाही, तर आत्महत्यांची संख्या आणि त्यातून असंतोष वाढतच जाईल. त्यातला धोका सगळेच जाणतात.

# संशोधन-विकासाशिवाय गत्यंतर नाही

**अमेरिकेचा गेल्या दीड-दोन दशकांत घनिष्ठ मित्र बनलेल्या भारतावर अखेर ट्रम्प यांनी अखेर ५० टक्के टेरिफचा बडगा उगारला आहे. याला प्रत्युत्तर म्हणून पंतप्रधान मोदी यांनी स्वदेशीचा नारा दिला आहे. दुसरीकडे, ''विकसित भारत' बनण्याचे उद्दिष्ट भारताला २०४७ पर्यंत साध्य करायचे आहे. मात्र, त्या अनुषंगाने एक महत्त्वाचा आणि काहीसा दुर्लक्षित राहिलेला घटक म्हणजे रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट म्हणजेच संशोधन आणि विकास. जपान, दक्षिण कोरिया, युरोपियन देश यांनी जीडीपीपैकी अधिकाधिक निधी यावर खर्च केल्याचे दिसून येते. भारतालाही याबाबत भरीव पावले उचलावीच लागतील.**

**जा**गतिक राजकारणाची समीकरणे सध्या झपाट्याने बदलत चालली आहेत. मुळातच गेल्या काही वर्षांमध्ये राष्ट्रे सामर्थ्यशाली बनत चालली असून आंतरराष्ट्रीय संस्था-संघटना कमकुवत बनताना दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत आर्थिक राष्ट्रवाद प्रभावी बनत चालला आहे. सामूहिक हितसंबंधांना बगल देत प्रत्येक राष्ट्र आपल्या आर्थिक हितसंबंधांचा विचार करताना दिसत आहे. त्यामुळे जागतिक पटलावर बहुपक्षतावाद ही संकल्पना जणू कालबाह्य ठरते की काय, अशी सध्याची स्थिती आहे. कोरोनोत्तर काळात आर्थिक राष्ट्रवाद अधिक प्रभावी बनला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगातील ६० देशांविरुद्ध लागू केलेले टेरिफ शुल्क म्हणजे 'वेपनायजेशन ऑफ टेरिफ' म्हणावे लागेल. टेरिफचा हत्यार म्हणून वापर केला गेल्याने जागतिक पटलावर व्यापार युद्धाला नवे वळण लागले आहे.

वस्तुतः ज्या देशांनी विकसनशील देशाकडून विकसित देश बनण्याकडे आर्थिक स्थित्यंतर केले आहे, त्यांनी संशोधन आणि विकासावर प्रचंड प्रमाणात काम केले आहे. जपान, दक्षिण कोरिया, युरोपियन देश यांनी आर्थिक विकास साधताना जीडीपीपैकी अधिकाधिक निधी संशोधन आणि विकासावर खर्च केल्याचे दिसून येते. मुख्य म्हणजे मानव संसाधन विकासावर या राष्ट्रांनी लक्ष केंद्रीत केले. युरोपचे उदाहरण घेतल्यास युरोपचा ७० टक्के आर्थिक विकास हा रिसर्च अँड डेव्हलपमेंटमधून झालेला आहे. त्यांनी यासाठीची एक परिसंस्था म्हणजेच इकोसिस्टीम तयार केली आहे. आर अँड डीचे महत्त्व ओळखून त्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करतानाच अतिशय सुनियोजितपणाने विकासाला चालना दिली. अमेरिकेचे उदाहरण घेतल्यास जागतिक महासत्ता असणारा हा देश आपल्या जीडीपीच्या ३.५ टक्के खर्च संशोधन आणि विकासावर करतो. भारताने जीडीपीच्या आकाराच्या दृष्टिकोनातून ज्या जपानला मागे टाकले, तो जपानही जीडीपीच्या ३.५ टक्के खर्च संशोधन आणि विकासावर करतो. ज्या जर्मनीला आपण मागे टाकण्यासाठी प्रयत्नशील आहोत, तेथेही सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ ते ३ टक्के खर्च संशोधन व विकासासाठी केला जातो. इस्रायलसारख्या वाळवंटी प्रदेशातील आकारमानाच्या दृष्टीने अत्यंत लहान असणाऱ्या देशातून आजघडीला २ अब्ज डॉलरची कृषी निर्यात केली जाते. कॉटन टेक्नॉलॉजीमध्ये आज जगात कुणीही इस्रायलचा हात धरू शकणार नाही. समुद्राचे खारे पाणी शुद्ध करण्यामध्ये इस्रायलच्या तंत्रज्ञानाचे जगभरात लोकप्रिय आहे. इस्रायलही संशोधन आणि विकासावर आपल्या जीडीपीच्या साडेतीन टक्क्यांहून अधिक खर्च करतो.

या तुलनेत भारताचा विचार केल्यास आपला ग्रोथ एक्सपेंडेचर ऑन रिसर्च अँड डेव्हलपमेंट (जीईआरडी) एक टक्क्यापेक्षा कमी म्हणजे ०.७ टक्के इतका असून तो वाढवणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे भारतात बुद्धिमत्तेची कमी नाही. बुद्धिवंतांची, प्रतिभावंतांची खाण असणारी ही भूमी आहे. जगभरात रिसर्च पब्लिकेशन, पीएचडी, पदवीधर, उच्च पदवीधर, डॉक्टर यांची संख्या भारतात प्रचंड प्रमाणात आहे. पीएचडीबाबत तर भारत जगात अव्वल स्थानी आहे. त्याचप्रमाणे पेटंटच्या क्षेत्रातही भारताने मोठी भरारी घेतलेली आहे. जगभरात पेटंटसाठी दाखल होणाऱ्या अर्जांमध्ये भारताचे प्रमाण ५३ टक्क्यांहून अधिक आहे. वैयक्तिक पातळीवर पेटंटसाठी अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. असे असताना संशोधन आणि विकासासाठी जी इकोसिस्टीम तयार होणे गरजेचे होते, ती आपल्याकडे विकसित झाली नाही.



लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान-जय किसान' असा नारा दिला होता. पंतप्रधान मोदींनी तो पुढे नेत 'जय अनुसंधान' म्हणजेच संशोधन असा नारा देण्यात आला आहे. याचा अर्थ संशोधन आणि विकासावर खर्च वाढविण्याची गरज आहे ही बाब सरकारलाही ज्ञात आहे, पण आपण एकाएकी ०.७ टक्क्यांवरून जीडीपीच्या तीन टक्के खर्च करू शकतो का? याचे उत्तर नाही. मग उपाय काय? याचे उत्तर देशातील खासगी क्षेत्राची भूमिका यामध्ये वाढावी लागेल. दुर्दैवाने, भारतात संशोधन विकासामध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग अत्यंत कमी आहे. दक्षिण कोरियाच्या जीडीपी मध्ये मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीचा हिस्सा ५० टक्क्यांहून अधिक आहे, पण या देशातील आर अँड डीची ८०टक्के इकोसिस्टीम खासगी क्षेत्राने तयार केलेली आहे. अमेरिकेतही हे प्रमाण ६० ते ६५ टक्के आहे. विकसित देशातील खासगी क्षेत्राच्या सहभागाचा विचार करता भारत यामध्ये खूपच मागे आहे. देशात ०.३ टक्के इतका खासगी क्षेत्राचा सहभाग आहे.

जगभरात संशोधन आणि विकासावर खर्च करणाऱ्या २५०० मोठया़ पंपन्या आहेत. यामध्ये भारतीय पंपन्यांची संख्या केवळ २६ इतकी आहे. यातील निम्म्या कंपन्या औषध निर्मितीवर खर्च करतात. उर्वरित पंपन्यांपैकी बहुतांश कंपन्या ऑटोमोबाईल क्षेत्रात खर्च करतात. यामध्ये विविध क्षेत्रांचा समावेश होणे गरजेचे आहे. खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक म्हणजे संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीची मर्यादा १०० टक्के करणे आवश्यक आहे. दुसरा मार्ग म्हणजे शैक्षणिक संस्थांना यामध्ये सहभागी करून घेणे. भारतात १५०० हून अधिक विद्यापीठे असून ६० हजारांहून अधिक महाविद्यालये आहेत. या शैक्षणिक संस्थांना खासगी क्षेत्राच्या बरोबरीने संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या प्रक्रियेत सामावून घेतल्यास त्यातून एक मोठी परिसंस्था आकाराला येऊ शकते.

यासाठी खासगी क्षेत्राला ज्या गोष्टींमध्ये संशोधन किंवा पेटंट हवे आहे, त्याला विद्यापीठांनी प्राधान्य दिले पाहिजे. अलीकडील काळात या अनुषंगाने ॲप्रेंटिसशिप डिग्री प्रोग्राम (एईडीसी) सर्वत्र सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातही प्रत्येक विद्यापीठाने खासगी उद्योगासोबत सामंजस्य करार करणे आणि त्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना इंडस्ट्री ओरिएंटेड प्रोग्राम घेण्यासाठी प्रवृत्त करणे यासाठी शासनही प्रयत्नशील आहे. जोपर्यंत आपले संशोधन उद्योगानुकूल नसेल तोपर्यंत त्याला अर्थ प्राप्त होणार नाही. संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रातील गुंतवणूक फलद्रूप होण्यास बराच कालावधी जावा लागतो आणि हेदेखील या क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत उदासीनता असण्याचे एक कारण असते. भारत हा सातत्याने तंत्रज्ञानाच्या आयातीवर भर देतो. हे टाळण्यासाठी शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग उद्योगांना आकर्षित करण्यासाठी गरजेचा आहे. उद्योगांना जोपर्यंत यातील गुंतवणुकीचे महत्त्व लक्षात येणार नाही तोपर्यंत हे शक्य होणार नाही. उद्योग जगतालाही या गुंतवणुकीची फळे तत्काळ मिळणार नाहीत; पण दहा-पंधरा वर्षांनंतर ती मोठया़ प्रमाणावर मिळतील हे निश्चित. दक्षिण कोरियाचे उदाहरण यासाठी बोलके आहे.

भारतात संशोधन आणि विकासात केंद्र सरकारकडून सर्वाधिक म्हणजे ५० टक्के निधी खर्च केला जातो, पण हा निधी केंद्र सरकारकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या संस्थांमध्ये जातो. त्यातून परिणामही दिसून येताहेत. हा निधी खासगी क्षेत्राकडे वळवता येणार नाही. त्यामुळे शैक्षणिक संस्था उद्योगांना कसे आकर्षित करून घेतात यावर पुढील वाटचाल अवलंबून आहे. उद्योगांना आवश्यक असणारे संशोधन विद्यापीठांनी उत्तम रीत्या केले तर शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यातील बंध घट्ट होण्यास मदत होईल. यातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी विकसित होतील. तसेच संशोधन-विकासाबाबतची संवेदनशीलता समाजात वाढीस लागेल. त्यातूनच आपल्याला आर्थिक विकासाची पुढील उद्दिष्टे गाठण्याबरोबरच आत्मनिर्भर बनता येईल.

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

## प्राप्तिकर कायद्यातील सुधारणा

**व**स्तू आणि सेवा करात सुधारणा आणि कपात करण्याच्या काही दिवस आधी केंद्र सरकारने नवीन प्राप्तिकर कायद्याला मूर्त रूप दिले. तो जुन्या कायद्यातील बहुतांश मुद्दे सुलभ करणारा आहे. १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारा हा कायदा करदात्यांची संख्या वाढविणे, करातील गुंतागुंत कमी करणे, खटल्यात घट करणे आणि कर संकलन वाढविण्यासाठी मोलाचे योगदान देणारा राहील.जीएसटी सुधारणांचा ओनामा करण्याआधी म्हणजे केंद्र सरकारने प्राप्तिकर कायद्याचे आधीचे विधेयक मागे घेऊन नव्या कायद्याचे प्रारूप मांडले. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे (सीबीडीटी) सदस्य आर. एन. परबत यांनी नवीन प्राप्तिकर कायदा लागू करण्यासंदर्भात डिसेंबरपर्यंत नव्या नियमांच्या अनुरूप नवीन कर विवरणाची तयारी पूर्ण होईल, असा आशावाद व्यक्त केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झालेल्या प्राप्तिकर विधेयक २०२५ ला मंजुरी दिल्यानंतर त्यास कायद्याचे स्वरूप देण्यासाठी अधिसूचना काढली असून पुढील आर्थिक वर्षापासून नवीन प्राप्तिकर कायदा १९६१ लागू होईल.

नवीन प्राप्तिकर कायदा हा केवळ किरकोळ स्वरूपातील बदल नसून तो सर्वकष प्राप्तिकर व्यवस्थेचा कायापालट करणारा आहे. त्यामुळे देशात प्राप्तिकर व्यवस्थेच्या डिजिटल आणि नव्या युगाचा प्रारंभ होत आहे. नवीन करदाते उत्पन्नानुसार कर देण्यासाठी बांधील राहतील आणि नवीन कायद्याच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाला चालना देईल. विशेष म्हणजे, सध्याच्या प्राप्तिकराच्या स्लॅबमध्ये कोणताही बदल केलेला नाही. नवीन प्राप्तिकर कायदा नवीन गरजांचे आकलन करत तयार केला आहे. १९६१ मध्ये प्राप्तिकर कायदा लागू केल्यानंतर आतापर्यंत प्राप्तिकर कायद्यातील विविध उणिवा दूर करण्यासाठी सतत प्रयत्न केले गेले आहेत. परिणामी, १९६१ च्या प्राप्तिकर कायद्यात २०२४ पर्यंत चार हजारांपेक्षा दुरुस्ती आणि सुधारणा झाल्या आहेत. अशा प्रकारच्या किचकट प्राप्तिकर कायद्याला सुलभ आणि व्यावहारिक करण्यासाठी तयार केलेला नवीन प्राप्तिकर कायदा २०२५ हा स्तुत्य उपक्रम म्हणावा लागेल.नवीन कायदा घर भाड्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर नियमाप्रमाणे कपात करणारा आहे, तसेच गृह कर्जावरील बांधकामपूर्व व्याजाच्या नियमांना स्पष्ट करणारा आहे. म्हणजेच त्याबाबतची अस्पष्टता दूर करणारा आहे. नवीन कायद्याच्या माध्यमातून कर कायदा सुलभ करताना त्यांच्या पानाची संख्या निम्मीच केली आहे आणि कालबाह्य तरतुदी काढून टाकल्या आहेत. सध्या प्राप्तिकर विवरण भरण्याच्या काळात मूल्यांकन वर्ष आणि आर्थिक वर्ष याचा उल्लेख करावा लागतो; मात्र नवीन कायद्यात केवळ कर वर्षाचा उल्लेख करावा लागेल. त्याचवेळी ज्या आर्थिक वर्षात कर भरला जाईल, त्यास 'टॅक्स इयर' असे म्हटले जाईल.

नवीन प्राप्तिकर कायद्यात नोकरदारांसाठी लाभदायी तरतुदींचा समावेश केला आहे. कोणत्याही भरणापोटी शून्य टीडीएस प्रमाणपत्राची सुविधा मिळणार आहे. खासगी पेन्शन योजनांत एकरकमी पैसे काढल्यानंतर कर सवलतीचा लाभ मिळेल. सरकारच्या यूपीएस पेन्शन योजनेनुसार कर सवलतीचा लाभ मिळणार आहे. टीडीएस दाव्यात सुधारित विवरण दाखल करण्याची कालमर्यादा कमी केली आहे. नवीन प्राप्तिकर कायद्यानुसार लहान करदात्यांना काही विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. नवीन कर कायद्यात एमएसएमईसाठी नवीन व्याख्या करत त्यास तरतुदीशी जोडले आहे.

**डॉ. जयंतीलाल भंडारी,**

# कांद्याच्या दरासाठी आणखी किती काळ संघर्ष?

**स्थिर निर्यात धोरण स्वीकारण्याची सध्या गरज आहे. निर्यात धोरण धरसोड वृत्तीचे असल्यामुळे देखील कांदा भाव खाली येत आहे. नाशिकच्या कांद्याला आखाती देशात चांगली मागणी आहे; परंतु केंद्राच्या धोरणाचा मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे पुढील काळात देखील सरकारने आता स्थिर निर्यात धोरण स्वीकारण्याची गरज आहे. त्याचबरोबर लागवड क्षेत्र नियंत्रित करण्यासाठी देखील शासकीय स्तरावर काम होण्याची गरज निर्माण झाली आहे. कृषी मूल्य आयोग, नाफेड आणि एनसीसीएफने देखील अधिक पारदर्शक पद्धतीने कार्य करण्याची मागणी पुढे येत आहे.**

**म**हाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांद्याला बाजार समित्यांमध्ये काही दिवसांपासून कवडीमोल बाजारभाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा घाम आणि मेहनत वाया जात आहे. अशा गंभीर परिस्थितीत राज्यातील सत्ताधाऱ्यांनी दिल्लीत जाऊन कांदा प्रश्नावर ठोस निर्णय घ्यावा अशी अपेक्षा आहे. त्यानुसार मंत्रालयात राज्याच्या पणन, कृषी मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यात केंद्राकडे पाठपुरावा करत सरकार लवकरच तोडगा काढेल असे आश्वासन देण्यात आले आहे. गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेले फोन करो आंदोलनही उत्पादकांसाठी मोठे उपयुक्त ठरत आहे. गेल्या आठवड्यात विरोधी पक्षांनीही नाशिकमध्ये आक्रोश मोर्चा काढून सरकारला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु कांदा भावासाठी आणखी किती दिवस संघर्ष करावा लागेल असा सवाल उपस्थित केला जात आहे. डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र सरकारने कांद्यावर निर्यातबंदी केली होती. त्यावेळेसही राजकीय पक्षांनी दिल्लीत आवाज उठविला नाही. त्याऐवजी त्यांनी नाशिकच्या चांदवडमध्ये रास्ता रोको करून जाहीर सभा घेतली. त्या आंदोलनाचा राजकीय फायदा विरोधकांना लोकसभेत सहानुभूतीच्या रूपाने मिळाला, पण शेतकऱ्यांना काहीच हाती लागले नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत देखील दिंडोरी आणि धुळे मतदारसंघात सत्ताधारी भाजपच्या उमेदवारांना फटका बसला. मात्र निवडून आलेले खासदारही लक्ष देत नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा उपयोग फक्त निवडणुकांमध्ये मतं मिळवण्यासाठी केला जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शेतकऱ्यांचा राग आणि नाराजी भांडवल म्हणून वापरण्याचा विरोधी पक्षांचा डाव आहे, अशी भावना शेतकरी वर्गाकडून व्यक्त होत आहे.



कांद्याला भाव मिळत नसल्याची अनेक कारणे आहेत. त्यात प्रामुख्याने सन २०२४/२५ च्या कांदा हंगामात जादा लागवड झाल्यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली. केंद्राने डिसेंबर २०२३ ते मे २०२४ अशा ६ महिन्यांच्या कालावधीत कांदा निर्यात बंदी आणली. त्यामुळे भारताकडून चीन, पाकिस्तान, बांगलादेशसह इतर देशांची बाजारपेठ हातातून निसटून गेली. भारताकडून कांदा घेणाऱ्या या देशांनी स्वतःच्या देशात उत्पादन वाढविले तर काही प्रमाणात कांदा दुसऱ्या देशाकडून खरेदी केला. त्यानंतर बंदी उठवली खरी मात्र अतिरिक्त निर्यात शुल्क आकारण्यास प्रारंभ केला. निर्यात शुल्क कमी करण्यासाठी आंदोलन, पाठपुरावा करावा लागला. त्याचा परिमाण निर्यातीवर झाला, परिणामी देशातील कांद्याचे भाव घसरले. देशात कांदा विक्री व्यवस्था आणखी सक्षम करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. या विक्री व्यवस्थेवर सरकारचा अंकुश नसल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. सरकार हे कांद्याच्या बाबतीत ग्राहकांपेक्षा उत्पादकांच्या हिताला प्राधान्य देत असल्याचा आरोप शेतकरी आणि महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना करत आहे. त्यामुळे सरकारने आता कांदा भाव वाढीसाठी ठोस उपाययोजना करण्याची खरी गरज आहे. नाशिकची खरी ओळख कृषी प्रयोगशील जिल्हा म्हणून आहे. कांदा, द्राक्ष आणि डाळिंबसाठी नाशिक जगभरात प्रसिद्ध आहेत. अनेक देशाच्या बाजारपेठेत नाशिकचे द्राक्ष दरवर्षी प्रवेश करत आहेत, असे असतानाही कांद्याच्या बाबतीत मात्र शासन उदासीन आहे. कांद्याचे बी अहिल्यानगर येथून खरेदी करावे लागत आहेत. देशातील एकूण ९० टक्के कांदा उत्पादक नाशिक जिल्ह्याला बीसाठी दुसऱ्या जिल्ह्यावर अवलंबून राहावे लागत आहेत. नाशिकमध्ये बी निर्मिती प्रकिया सुरू करण्याची देखील अनेक दिवसांपासून मागणी आहे. त्याचबरोबर कांद्यापासून इतर खाद्य पदार्थ अर्थात प्रक्रिया उद्योगासाठी पुढील काळात प्रयत्न करण्याची खरी गरज निर्माण झाली आहे.

कांद्याला भाव मिळावा यासाठी सरकारकडूनदेखील दीर्घकालीन प्रक्रिया सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी लासलगाव येथे आण्विक तंत्रज्ञानाचा उपयोग करून किरणोत्सर्ग उपक्रम घेण्यात आला होता. विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमांतून कांदा चाळीसाठी अनुदान देखील मोठ्या प्रमाणात आले होते; परंतु पुढे ठोस उपाययोजनांचा अभाव दिसून आला. सरकारला देखील हा प्रश्न तत्काळ सोडवायचा नसल्याचे या क्षेत्रातील जाणकार सांगतात. निवडणुका आणि भाव गडगडल्यानंतर हा प्रश्न जास्त गाजतो. पुन्हा परिस्थितीत 'जैसे थी' होते. जिल्ह्यात कृषी पर्यटन वाढीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना अधिक गती दिल्यास बळीराजाबरोबरच नागरिकांनाही अच्छे दिन येतील, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करू या...!

**- धनंजय बोडके**

# 'मिशन मोड'वर कामे करून नागरिकांना सेवेचा लाभ द्यावा : जिल्हाधिकारी



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : आपले विहित कर्तव्य योग्यरीत्या बजावणे हीच खरी देशसेवा असते. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'सेवा पंधरवडा' उपक्रमात 'मिशन मोड'वर कामे करून अधिकाधिक नागरिकांना योजनांचा, तसेच महसुली सेवेचा लाभ मिळवून द्यावा. त्याचप्रमाणे मिशन उभारी अंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांपर्यंत जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेणे, शिक्षण, आरोग्य व इतर गरजांसाठी शासकीय योजनांचा लाभ मिळत आहे की नाही याची चौकशी करून त्यांच्या समस्या दूर करण्यावर भर दिला जाईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आज येथे केले.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून (१७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) संपूर्ण राज्यात 'सेवा पंधरवडा'राबवण्यात येत असून, त्याचा शुभारंभ आज झाला. त्यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

जिल्हाधिकारी श्री. मीना म्हणाले की, सेवा पंधरवड्यात सीएससी केंद्रांचे सशक्तीकरण करून ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ सहजपणे मिळावा. तसेच घरकुल योजनेतील लाभार्थ्यांसाठी वाळूची मागणी व पुरवठा यामधील समन्वय साधण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, जुनी वादग्रस्त प्रकरणे लोकअदालतीतून तडजोडीने निकाली काढणे, आदी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. ते म्हणाले की, आपण जी कामे करतो ती जनहिताप्रमाणेच आपल्या आत्मिक व प्रशासनिक विकासासाठीसुद्धा आहेत. आपली जबाबदारी आपण योग समजून पार पाडली, तर आपण खरे कर्मयोगी आहोत. देशभक्ती दाखवण्यासाठी सीमेवर जाण्याची गरज नाही, आपण प्रामाणिकपणे आपली कामे केली तरी तीच खरी देशसेवा ठरेल. सेवा पंधरवडा उपक्रमाच्या माध्यमातून महसूल प्रशासन लोकांच्या अजून अधिक जवळ जाईल व सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्कांच्या सेवांपर्यंत सुलभपणे पोहोचता येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी विकास मीना यांनी व्यक्त केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक बनवणे हा आहे. या पंधरवड्यात तीन टप्प्यांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात पाणंद रस्त्यांची मोहीम हाती घेण्यात येईल, ज्यात गावातील सर्व रस्त्यांची यादी तयार करून १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभेत ती अंतिम केली जाईल. अतिक्रमण झालेल्या रस्त्यांचे सीमांकन भूमी अभिलेख विभागाकडून करण्यात येईल आणि त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

# "गाडीवाला नाही आया पांढरकवडा कच-याच्या डोंगराखाली गाडला!"



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ – राज्यस्तरीय स्वच्छतेसाठी सलग दोनदा गौरवले गेलेले पांढरकवडा शहर आज कचऱ्याच्या डोंगराखाली गाडले गेले असून मलेरिया-डेंग्यूच्या साथीने नागरिक भयभीत झाले आहेत. नगरपरिषद प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी शहराची पाहणी करून उपरोधिक टीका केली. "गाडीवाला नाही आया, कचरा सिओ को खिलाओ," या गाण्याच्या ओळींचा आधार घेत त्यांनी थेट प्रशासन व सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

सफाई कामाचा ठेका खासदार संजय देशमुख यांच्या नातलगाकडे असून, ठेका संपल्यानंतरही मुदतवाढ दिली जात असल्याचा आरोप आहे. दरम्यान, सफाई कामगारांची संख्या १०२ वरून फक्त ३२ इतकी झाल्याने शहरभर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. ठेकेदाराकडून सत्ताधारी नेत्यांना नियमित 'कमिशन' दिले जात असल्याची चर्चा रंगली आहे. जूनपासून डेंग्यू-मलेरियाची साथ सुरू असून अधिकारी-कर्मचारी ते नागरिक सर्वजण आजारी पडले आहेत. स्थानिक दवाखाने रुग्णांनी फुल्ल झाले असून उपजिल्हा रुग्णालयातील घाणीवरूनही संताप व्यक्त केला जात आहे. किशोर तिवारींनी भाजपा आमदार राजू तोडसाम, भाजप नेते सोनूभाई बोरले तसेच पालकमंत्री संजय राठोड यांच्यावर कारवाई करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला. "कचऱ्याचा प्रश्न सोडविण्याऐवजी काही नेते सोशल मीडियावर फोटो काढण्यात व्यस्त आहेत," असा त्यांचा टोला होता. तिवारींची उपरोधिक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली असून नागरिकांनी प्रशासनाने तातडीने कचरा व्यवस्थापन सुधारावे अशी मागणी केली आहे.

# कर्तव्यदक्ष पोलिसांचा सन्मान : बिटरगाव पोलीस स्टेशनच्या पोलिसांना यवतमाळ येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव



जनमाध्यम प्रतिनिधी

ढाणकी – उमरखेड तालुक्यातील बिटरगाव पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी आपल्या प्रामाणिक व तत्पर सेवेमुळे संपूर्ण जिल्ह्यात कौतुकास पात्र ठरले आहेत. पोलिस दलात कार्यरत असताना नागरिकांचा विश्वास संपादन करणे आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे ही अत्यंत आव्हानात्मक जबाबदारी असते. तरीही बिटरगाव पोलीस स्टेशनमधील पोलिसांनी आपल्या निष्ठा, परिश्रम व कर्तव्यदक्षतेमुळे ही जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

नुकत्याच घडलेल्या गुन्ह्यात त्यांनी कलम 118(1) BNS अंतर्गत केवळ 24 तासांच्या आत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करून दाखवलेली तत्परता आणि बुलढाणा अर्बन मधील बहुचर्चित प्रकरणाचा तपास करत तब्बल 540 ग्रॅम सोने, किंमत तब्बल 55 लाख रुपये हस्तगत करून गुन्ह्याचा यशस्वी छडा लावणे हे त्यांच्या कार्यकौशल्याचे उत्तम उदाहरण ठरले आहे. अल्पावधीत केलेल्या या चौकशीतून त्यांच्या दक्षतेचा आणि तपास कौशल्याचा प्रत्यय आला. या उल्लेखनीय व अनुकरणीय कामगिरीबद्दल मा. पोलिस अधीक्षक साहेब, यवतमाळ यांच्या हस्ते बिटरगाव पोलीस स्टेशनमधील ठाणेदार पोलीस निरीक्षक पांडुरंग शिंदे ,पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार ,बीट जमदार रवी गीते, रोशन सरनाईक, पो ना मोहन चाटे, पो शि प्रवीण जाधव, रावसाहेब मस्के या कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे या प्रशस्तीपत्र वितरण सोहळ्यात कुमार चित्ता यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या सन्मानामुळे केवळ बिटरगाव पोलीस स्टेशनचाच नव्हे तर संपूर्ण उमरखेड तालुक्याचा मान उंचावला आहे. नागरिकांनीही या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले असून, "पोलीस दलाचे कार्य हे फक्त कायदा सुव्यवस्थेपुरते मर्यादित नसून, जनतेत विश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हे देखील महत्त्वाचे आहे. बिटरगाव पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी आपल्या कार्यातून ही भावना समाजात दृढ केली आहे," असे मत व्यक्त करण्यात आले. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, तत्परता आणि धैर्य यांचे उत्तम उदाहरण म्हणून या पोलिसांचा सन्मान इतर पोलिसांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास नागरिक तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. उमरखेड तालुक्यातील बिटरगाव पोलीस स्टेशनच्या या उल्लेखनीय कामगिरीचा अभिमान प्रत्येक तालुकावासीयास वाटत असून, भविष्यात देखील असेच उत्तम कार्य घडावे, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

# जवळा गावात नागरिकांचे चक्काजाम आंदोलन; प्रशासनाविरुद्ध संतापाचा उद्रेक



जनमाध्यम प्रतिनिधी

आर्णी – गेल्या चार वर्षांपासून जवळा गावात एसटी बसेस न थांबल्यामुळे तब्बल 36 गावातील प्रवाशांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. एसटी महामंडळाचे महाव्यवस्थापक आणि संबंधित विभागाकडून जवळा बसस्टॉपवर बसेस थांबवण्याचे परिपत्रक जारी झाले असतानाही काही चालक व वाहक जाणूनबुजून गावातील बसस्टॉप वगळून बायपास मार्गाने जातात. परिणामी नागरिक, शेतकरी, कामगार व विद्यार्थी यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर 36 गावांतील नागरिकांनी एकत्रितपणे ठाम भूमिका घेत नागपूर–तुळजापूर केंद्रीय महामार्गावर जवळा येथे तब्बल 30 मिनिटे चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनात हजारो महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.जवळा येथे कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करावी.तातडीने नवीन बसस्टॉपचे बांधकाम करण्यात यावे. या मागण्या लेखी स्वरूपात करण्यात आल्या. आंदोलनानंतर नागरिकांचे प्रतिनिधी मंडळ यवतमाळ येथील विभागीय नियंत्रक अधिकारी दराटे यांना निवेदन देण्यासाठी गेले. या निवेदनानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या मागण्या ग्राह्य धरत 15 दिवसांच्या आत सर्व मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले. यामुळे नागरिकांचा रोष थोड्या प्रमाणात निवळला असला तरी, दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी झाली नाही तर आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# पंचायत समिती पुसद अंतर्गत विनोबा ॲप कार्यशाळा संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - १६/०९/२०२५ रोजी पं.स पुसद येथे जिल्हा परिषद यवतमाळ व ओपन लिंक्स फाऊंडेशन यांच्या सामंजस्य करार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या विशेष पुढाकाराने जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या शाळामधील शिक्षणात नाविन्यता आणण्यासाठी तसेच शिक्षकांचे कार्य सुलभ होऊन सक्षमीकरण व संवाद स्थापित करण्यासाठी त्याचप्रमाणे शिक्षकांना शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी व शिक्षकांच्या चांगल्या कार्याचे कौतुक करून त्यांना प्रेरणा देण्यासाठी विना आर्थिक तत्त्वावर आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील तंत्र स्नेह शिक्षकांच्या कार्यशाळाचे आयोजन हाजी अख्तर खान नगरपरिषद उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स गढी वार्ड पुसद इथे संपन्न झाले सदर



कार्यशाळेस संजय कांबळे गटशिक्षण अधिकारी पं.स पुसद, कु. विश्रांती फोपसे विस्तार अधिकारी शिक्षण तथा समन्वयक, मो.जियाऊद्दीन मुख्याध्यापक हाजी अख्तर खान न.प उर्दू विद्यालय गढी वार्ड पुसद यांनी मार्गदर्शन केले तसेच सदर ॲपच्या बाबत रघुनाथ सर प्रोग्राम मॅनेजर अमरावती विभाग व कु.आशा मॅडम कार्यक्रम अधिकारी हिंगोली यांनी सखोल माहिती देऊन शंका निरसन केले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी बीआरसी पुसदचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बा.ना.अभियांत्रिकी विद्यार्थी शैक्षणिक सर्वेसाठी श्रीमती गंगाबाई नाईक धनसळ शाळेमध्ये

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - दिनांक १७ सप्टेंबर बुधवार रोजी इंजिनीअरिंग कॉलेज येथील विद्यार्थी शैक्षणिक सर्वे करीता श्रीमती गंगाबाई नाईक माध्यमिक शाळा धनसळ येथे आले, सदर सर्वेचा विषय होता डिजिटल इनपॉवरमेंट यातून त्यांनी विध्यार्थ्यांना डिजिटल अँप बद्दल माहिती पॉवर पॉईंट च्या माध्यमातून दिली यामध्ये डिजिटल पैसे आदन-प्रधान, कृषी विषयक पीक विमा अँप, दिक्षा अँप, फोन पे, गूगल पे,बायजूस, AI अभ्यासात टेकनॉलॉजी चा वापर सोबतच टेकनॉलॉजी फायदे तोटे या बद्दल माहिती दिली आणि डिजिटल फ्रॉड बद्दल सुद्धा माहिती दिली.

विद्यार्थ्यांना अनेक प्रश्न विचारून त्याच्या समस्या चे समाधान कारक उत्तर दिले विद्यार्थ्यां कडून प्रश्नावलीच्या माध्यमातून फीडबॅक घेतला आजच्या काळात पुस्तकी ज्ञान असून चालत नाही तर विध्यार्थीनी विविध स्टूल समजून घेणे शिकणे महत्वाचे आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गोपाल एम चव्हाण सर (मुख्याध्यापक ) हे होते. कार्यक्रमाचे संचालन श्री साखरे सर यांनी




केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कू प्राजक्ता दशरथ मोरे हिने केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय येथील बी ई द्वितीय वर्षाचे संकेत चव्हाण,शिवम तावडे, पवन अढाव,प्रशांत इंगळे, विवेक कांबळे, शिवानी पतंगराव, प्राजक्ता मोरे, वेदिका कुळे, सायली वाकोडे, अनुष्का धुपारते इत्यादी उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अमोल कांबळे सर यांनी केले तर शाळेचे मुख्याध्यापक गोपाल चव्हाण यांनी आलेल्या सर्व टीमचे आभार मानले.

# ज्ञप्ती हर्षे लोकनृत्य विभागातून राष्ट्रीयस्तरावर दुसरी

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नागपूर येथे श्रीकृष्ण सांस्कृतिक फाउंडेशन आणि श्रीकृष्ण नृत्यालयद्वारा 11 ते 14 सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या नृत्य आणि संगीताच्या समारंभात देशाच्या सात राज्यांतील कलाकारांनी आपल्या कलेचे सादरीकरण करून प्रेक्षकांना संमोहीत केले.

या स्पर्धेत यवतमाळ येथील ज्ञप्ती प्रवीण हर्षे हिला लोकनृत्य या विभागातून राष्ट्रीय स्तरावर दुसरा क्रमांक देण्यात आला. ज्ञप्ती प्रवीण हर्षे ही नादब्रम्ह डान्स अकॅडमीची विद्यार्थी आहे. ज्ञप्ती हर्षे हिला नादब्रम्ह डान्स अकॅडमीच्या शिक्षिका सौ पूनम हर्षे, अपर्णा हर्षे यांचे सहकार्य लाभले. ज्ञप्ती हर्षे ही येथील ॲड प्रवीण हर्षे यांची कन्या असून ती स्थानिक सुसंस्कार विद्या मंदिर येथे ८ व्या वर्गात शिकत आहे. उत्सवाचे आयोजन इव्हेंट संचालक, सचिव प्रमिला उन्नीकृष्णन आणि त्यांच्या समर्पित टीमने केले. यात आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, तामिळनाडु, छत्तीसगड आणि तेलंगणाच्या कलाकारांनी भाग घेतला. यावेळी भरतनाट्यम, कुचिपुडी, कथक, सत्तरिया, शास्त्रीय गायन, लोकनृत्य, लोकसंगीत, वाद्यसंगीत आणि अर्ध-शास्त्रीय संगीत व नृत्याचे अप्रतिम सादरीकरण झाले.

# राजकुमार भगत यांची आझाद समाज पार्टी युवा मोर्चा यवतमाळ जिल्हा अध्यक्षपदी निवड



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीच्या विविध उपक्रमांतून आपली वेगळी छाप सोडणारे राजकुमार भगत यांची आझाद समाज पार्टी युवा मोर्चा यवतमाळ जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीची घोषणा डॉ.राहुल दाभाडे महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख तथा विदर्भ प्रभारी आझाद समाज पार्टी युवा मोर्चा यांनी केली असून निवडपत्र भीम आर्मी यवतमाळ जिल्हा अध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आले. या नियुक्तीबाबत पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला असून, जिल्ह्यातील युवकांना संघटित करून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि समाजकारणात सक्रीय सहभागासाठी ही निवड मोलाची ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. राजकुमार भगत हे व्यसनमुक्ती चळवळ, पर्यावरण संवर्धन व शिक्षण या क्षेत्रात सातत्याने काम करत आहेत. विविध शिबिरे, जनजागृती मोहिमा व सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी युवकांना प्रेरित केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आझाद समाज पार्टी युवा मोर्चा नव्या जोमाने कामाला लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सर्पमित्राने दिले अजगराला जिवनदान



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - तालुक्यातील गुंज शिवारात समाधान बोबडे या शेतकऱ्याच्या शेतामध्ये सोयाबीनच्या पिकामध्ये दडून बसलेल्या अजगराला कोब्रा एडवेंचर अँड नेचर क्लब यवतमाळ शाखा गुंज येथील सर्पमित्राने जीवनदान दिले साप हा शेतकऱ्यांचा मित्र जरी असला तरी साप म्हटल्यानंतर अनेकांची घाबरगुंडी उडते आणि त्यातही अजगर जातीचा साप म्हटल्यावर बाप्परे.!

सध्या शेत शिवारामध्ये काम करत असताना वन्यजीव प्राण्यांपासून शेतकऱ्यांनी सावध राहण्याची गरज आहे तब्बल सात फूट व सात किलो वजन असलेला अजगर जातीचा साप सोयाबीन मध्ये दडून बसल्याचे शेतकरी समाधान बोबडे यांच्या निदर्शनात आल्यानंतर सदर शेतकऱ्यांनी तातडीने सर्पमित्र श्रीकांत डोरले यांना संपर्क केला कुठलाही विलंब न लावता सर्पमित्र सदर शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पोहोचले व आपल्या कौशल्याने सदर अजगराला पकडून जंगलामध्ये सोडून दिले यावेळी वनपाल संतोष बदकुले वनरक्षक धम्मपाल सावते सर्पमित्र आकाश पायघन आकाश आडेकर सहकारी मित्र रोहित तळणकर आदित्य जोतरकर शेख सोहेल शेख मुख्तार शेतकरी समाधान बोबडे गुलाब मते उपस्थित होते.

# शिवरामजी मोघे महाविद्यालय व होमगार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण



जनमाध्यम प्रतिनिधी

पांढरकवडा - पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत होमगार्ड विभाग व शिवरामजी मोघे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच होमगार्ड जवानांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध प्रकारच्या फळझाडे, सावलीदार व औषधी झाडांचे रोपण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले तसेच "एक विद्यार्थी – एक झाड" ही संकल्पना रुजवण्याचे आवाहन केले.

यावेळी होमगार्ड विभागाचे अधिकारी श्री. खान यांनी सांगितले की, "पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण हा सर्वोत्तम मार्ग आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे." महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही हा उपक्रम सामाजिक बांधिलकी म्हणून स्वीकारला व वृक्ष संवर्धनाची शपथ घेतली. या वृक्षारोपणामुळे महाविद्यालय परिसर हिरवागार होण्यास मदत तर होईलच, शिवाय पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यासही मोठी चालना मिळेल. या वृक्षारोपणा करिता राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रम अधिकारी डॉ. अमर वंजारी यांनी स्वयंसेवकासह परिश्रम घेतले.

# पेरियार जयंतीनिमित्त भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ – सामाजिक न्यायाचे प्रणेते, तर्कवादी विचारवंत रामासामी पेरियार नायकर यांच्या जयंतीनिमित्त पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक) तर्फे यवतमाळ येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष चंदन हातागडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी उपस्थितांना संविधानातील मूलभूत अधिकार, समानता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांची महत्त्वपूर्ण माहिती दिली.समाजात अजूनही जातीयता, अन्याय आणि विषमता अस्तित्वात असल्याचे नमूद करताना, पेरियारांच्या विचारांचा प्रसार व संविधानिक तत्त्वांची अंमलबजावणी हीच खरी त्यांना श्रद्धांजली असल्याचे ते म्हणाले.संविधानाची प्रत प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे, त्यातील हक्क आणि कर्तव्ये समजावून देणे ही काळाची गरज असल्याचेही हातागडे यांनी स्पष्ट केले. या उपक्रमामुळे युवकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाला पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# दारव्हा तालुक्यातील सर्व शासकीय कर्मचारी आपल्या कर्तव्यावर जात नसल्यामुळे नागरिकांमध्ये संताप

जनमाध्यम प्रतिनिधी

दारव्हा - तालुक्यातील शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांचा हम करो सा कायदा. कर्तव्यावर असलेल्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी अवलंबला आहे. मात्र आपल्या शासकीय कर्तव्याची शासन कायदा एक्टनुसार अपॉइंटमेंट अर्थात रुजू होते वेळेस कर्तव्याचे प्रतिज्ञापत्र देते वेळेस मी कर्तव्याची पूर्णपणे जबाबदारी घेऊन माझे मी कर्तव्य पूर्णपणे व्यवस्थितपणे नागरिकाच्या समस्या व अधिकाऱ्यांच्या नियमाची पूर्णपणे पालन करीन असे प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यानंतरही.

परंतु कर्मचारी मुख्यालय राहण्याचे बंधनकारक असतानाही. मुख्यालय राहत तर नाहीच. परंतु ड्युटीच्या कर्तव्यावर दांडी मारण्याचे काम शंभर टक्के पणे करीत आहे.असे नागरिकांमध् संताप व्यक्त केल्या जात आहे. ग्रामसेवक गावात येतच नाही. कोणत्याही लहानशा कामासाठी पंचायत समिती दारव्हा येथील जाऊन त्यांची स्वाक्षरी घ्यावा लागतो. तलाठी तर सोडूनच द्या. आपल्या घरी बसूनच सर्वेक्षण करण्याचे काम काम करतात कोणत्याच प्रकारची पाहणी किंवा स्वतः जाऊन सर्वे करणे हे त्यांची कर्तव्य असतानाही हलगर्जी पूर्ण करतात त्यामुळे नागरिकांची अपुरे काम राहत असल्यामुळे नागरिकांची मानसिक तणाव तथा आर्थिक मृदंड सहन करावा लागतो. त्या मागेच कृषी सहारांचीही अशीच स्थिती पाहण्यास मिळत आहे. एखाद्या शेतात पाणी शिरले तर शेतकऱ्याची शेती जर खरडून गेली तर. कृषी सहायक गावात हजार नसून थातूरमातूर घरी बसल्या सर्व करून अंशता पूर्णतः मध्ये टाकण्याकरिता शेतकऱ्यापासून आर्थिक देवाणघेवांची चर्चा करतात. आरोग्य विभागातील कर्मचारी आरोग्य केंद्रावर जाऊन फेरफटका मारतात खरे तर गावात फिरण्याची त्यांची ड्युटी असल्यानंतरही आरोग्य कर्मचारी लगेच आपल्या घरी निघतात अशी नागरिकांची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे. शिक्षकांचा विषय सोडूनच द्या. एखाद्या शाळेवर चार शिक्षक असले तर. दोन शिक्षक शाळा संभाळतात तर दोन आपल्या घरचे काम सांभाळतात.. तर दुसऱ्या दिवशी. हे दोन शिक्षक. आपले घर सांभाळतात. तर दोन शाळा सांभाळतात. अनेक वर्षापासून यांचं नाट्य चालू असून शासनाची दिशाभूल करीत आहे. तरीसुद्धा नागरिक सर्व त्यांचे नाट्य सहन करत असून. परंतु कामाच्या वेळेस कामा येणार या लालची पोटी नागरिक त्यांचा विरोध करण्यास टाळाटाळ करीत आहे.

## वेचक

### भारतीय जनता युवा मोर्चा घाटंजी (ग्रामीण) कार्यकारणी जाहीर



घाटंजी - १६ सप्टेंबर 2025 ला भारतीय जनता युवा मोर्चा तालुका अध्यक्ष महेश जाधव यांनी भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्ष विजय बैस यांच्या अध्यक्षतेत कार्यकारणी व पदवाटप कार्यक्रमाचे एल. एस डी. हॉल घाटंजी येथे आयोजन केले यावेळी 61 सदस्यांचीविशालअशी युवा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून त्यात 21 युवकांना पदांचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणातून विजयभैया बैस यांनी महेश जाधव यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर दिलेआणि पक्षाचे काम संपूर्ण तालुक्यात व ग्रामीण भागात पोहोचवण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले. सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून विजयभाऊ बैस तालुका अध्यक्ष, गजुभाऊ ढवळे शहराध्यक्ष, सुरेशजी डहाके सर भाजपा जिल्हा सचिव, संदीपजी माटे जिल्हा अध्यक्ष पदवीधर सेल, साधनाताई माडुरवार महिला शहराध्यक्ष, अनुपजी देठे युवा मोर्चा प्रभारी ,अभिजीत झाडे,बालूभाऊ खांडरे,कानतोडे सर, डोहळे सर, प्रभाकर चटूले, रितेश बोबडे,रोहिदास जाधव अमित मह्हले, देवीभाऊ आडे, अरविंद जाधव, गजू बिजेवार, राजू चापले, प्रकाश मोहिते, कबीर भाई शेख,मोहीन पठाण, सुभाषआडे, शक्तिकेंद्र प्रमुख,बूथ प्रमुख सर्व आघाडी, सेल व युवा मोर्चा चे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रहार जनशक्ती पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी संतोष दांडगे



यवतमाळ - भारताची प्रभुत्वसंपन्नता, एकता व अखंडता यावर ठाम विश्वास ठेवून कार्यरत राहण्याच्या निर्धारासह संतोष दांडगे यांची प्रहार जनशक्ती पक्षाच्या जिल्हा प्रमुखपदी (बाभूळगाव, कळंब, राळेगाव, मारेगाव) नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती मा. संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या आदेशाने करण्यात आली आहे. या कालावधीत दांडगे यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, रोजगार, आरोग्य, दिव्यांग कल्याण अशा विविध क्षेत्रातील कामांचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे आवश्यक राहणार असल्याचे नियुक्ती पत्रात म्हटले आहे. त्यांच्या कार्यकाळाची सुरुवात वृक्षारोपण व रक्तदान शिबीर आयोजित करून करण्यात येणार आहे. या नियुक्तीबद्दल प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्याध्यक्ष महेंद्र ऊर्फ बल्लू जवंजाळ, बिपीन चौधरी यांनी संतोष दांडगे यांचे अभिनंदन करत उज्ज्वल राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### पवन थोटे मित्र परिवारातर्फे करळगाव,कोपरा जा.येथे 'आयुष्मान' शिबिराचे आयोजन

यवतमाळ - गावातील प्रत्येक नागरिकाला ५ लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य विम्याचा लाभ मिळावा या उद्देशाने भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'आयुष्मान भारत' योजनेचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी पवन थोटे मित्र परिवारातर्फे विविध गावांमध्ये शिबिरे आयोजित केली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, शुक्रवार दि.१९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता बाभुळगाव तालुक्यातील करळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात व कोपरा जा.येथील प्राथमिक शाळेत दुपारी २ वाजता आयुष्मान भारत कार्ड काढण्याचे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. अनेक ग्रामीण भागातील नागरिकांकडे अजूनही आयुष्मान कार्ड नसल्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन,पवन थोटे मित्र परिवाराने पुढाकार घेत या शिबिरांचे आयोजन केले आहे. या शिबिराचा उद्देश जास्तीत जास्त नागरिकांना हे कार्ड काढून देऊन त्यांना आरोग्य विमा योजनेचा लाभ मिळवून देणे आहे. या शिबिराचा लाभ करळगाव व कोपरा जानकर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा,असे आवाहन पवन थोटे,सुरेंद्र इरपानवार,योगेश राऊत,आकाश वाळके,प्रफुल खेडकर,कुणाल गजभिये यांनी केले आहे.

### शेतकऱ्याची आत्महत्या



बाभुळगाव - १७ रोजी तालुक्यातील यरणगाव येथील रहिवासी दिलीप ज्ञानेश्वर घाटे, (३०) या युवा शेतकऱ्याने राहते घरी मोनोसिल नामक विषारी औषध प्राशन करून जीवनयात्रा संपविली. ही हृदयद्रावक घटना १७सप्टेंबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सायंकाळी दिलीप आपल्या खोलीत आराम करीत असल्याचे त्याच्या आईने पाहिले होते. मात्र थोड्याच वेळात त्याच्या तोंडातून फेस येऊ लागल्याने त्यांनी त्याच्या मित्रांच्या साहाय्याने ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र येथे येईपर्यंत दिलीपची प्राणज्योत मालवली होती.

# मेळघाटातील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी खावटी कर्ज अनुदान द्या-आ.काळे



**धारणी/वार्ताहर**

मेळघाट मतदारसंघातील आदिवासी शेतकरी बांधवांना चालू खरीप हंगामात आर्थिक मदत मिळावी व त्यांचे उपजीविकेचे संकट दूर व्हावे यासाठी मेळघाट क्षेत्राचे आमदार केवलराम काळे यांनी राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांसोबत मुंबई येथे महत्वपूर्ण बैठक घेतली.बैठकीमध्ये मेळघाटातील आदिवासी शेतकरी सोबतच मजूर वर्गाकरीता संबंधित विशेष चर्चा करून शासनापुढे प्रस्ताव पाठविण्यात आले आहे.

बैठकीदरम्यान मेळघाटातील आदिवासी बांधवांना दिवाळी सणाच्या आधी खावटी कर्जावर अनुदान देण्यात यावे, जेणेकरून शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेली बियाणे, खते व अन्य शेती विषयक साधन सहज उपलब्ध होतील, अशी ठोस मागणी आमदार काळे यांनी केली.बैठकीदरम्यान आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक उईके, आदिवासी विकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक बन्सोड ह्या उपस्थित होत्या. त्यांनी आमदार काळे यांच्याकडून मेळघाट परिसरातील शेतकरी आणि आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांची सविस्तर माहिती घेतली आणि संबंधित प्रस्ताव शासनपातळीवर विचारात घेण्याचे आश्वासन दिले.

**मक्का खरेदी केंद्र सुरु करण्याची मागणी**

मेळघाट परिसरात मोठ्या प्रमाणावर मका उत्पादन घेतले जाते. मात्र दरवर्षी बाजारभावातील चढउतारामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. या पार्श्वभूमीवर आमदार काळे आणि संचालक आदिवासी विकास महामंडळ यांनी येत्या दिवाळीपूर्वी मेळघाट परिसरात आदिवासी विकास महामंडळद्वारे मका खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी बैठकीत केली. शेतकऱ्यांचे मका उत्पादन शासकीय दराने खरेदी करून त्यांच्या हातात थेट रोख रक्कम देण्यात यावी, तसेच खरेदी प्रक्रियेसाठी पुरेसे मनुष्यबळ आणि वाहतूक सुविधा पुरवाव्यात, अशी मागणीही त्यांनी केली.

**सरकारने सकारात्मक भुमिका घेणे आवश्यक**

बैठकीदरम्यान आदिवासी विकास विभागाने या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून लवकरच संबंधित विभागांशी समन्वय साधून निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री डॉ अशोक उईके यांच्याकडून देण्यात आले. या बैठकीमुळे मेळघाटातील शेतकरी व आदिवासी समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांना गती मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## नवरात्री निर्माल्य व्यवस्थापनासाठी बैठक



**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार श्री. अंबादेवी व श्री. एकवीरा देवी मंदिर परिसरात शारदीय नवरात्री दरम्यान मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या निर्माल्याच्या व्यवस्थापनाबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

या बैठकीत निर्माल्य संकलनाचे योग्य नियोजन करून त्यापासून महानगरपालिका महिला बचत गटामार्फत अगरबत्ती/धूपबत्ती निर्मिती करण्याच्या उपक्रमावर चर्चा करण्यात आली. श्री. अंबादेवी व श्री. एकवीरा देवी संस्थानचे अध्यक्ष, सचिव व विश्वस्त यांनी या उपक्रमासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.सदर बैठकीसाठी एँश शहर समन्वयक श्वेता बोके, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक धनिराम कलोसे, रोहित हडाले, घ्ं टीमचे अनुप, पियुष, फीडबॅक फाउंडेशनचे इंद्रजित तसेच ऱ्ळथ्श महिला बचत गटातील महिला उपस्थित होत्या.उपक्रमामुळे पर्यावरणपूरक निर्माल्य व्यवस्थापन होणार असून महिलांच्या स्वावलंबनालाही चालना मिळणार आहे.

## घुसखोऱ्यांना देशात राहू देणार नाही-किरीट सोमैया

### बोगस प्रमाणपत्र बनविणाऱ्या १६०० जणांविरुद्ध चार्जशीट दाखल



**अचलपूर/वार्ताहर**

देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न असून बनावट कागदपत्राद्वारे अपात्र व बेकायदेशीर रित्या कोणाला भारत देशाचा नागरिक बनायचे असेल तर हे मी होऊ देणार नाही अशी प्रतिक्रिया आज शहरातील विविध शासकीय कार्यालयांना दिलेल्या भेटीनंतर भाजपा पक्षाचे नेते व माजी खासदार किरीट सोमैया यांनी दिली .यावेळी माजी खासदार किरीट सोमैया यांनी अचलपूर तहसील कार्यालय ,अचलपूर नगर परिषद कार्यालय ,अचलपूर पोलीस स्टेशनला भेट दिली .

यामध्ये आधार कार्ड व जन्म प्रमाणपत्र साठी वेगवेगळे बनावट कागदपत्र देणाऱ्या ची आज दिलेल्या यादीवर अचलपूर तहसील कार्यालय व पोलीस विभागाद्वारे येत्या ४८ तासात कारवाई होणार असल्याची माहिती भाजपा पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार डॉ. किरीट सोमैया यांनी दिली .यावेळी अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,अचलपूर चे तहसीलदार संजय गरकल,अचलपूर नगर परिषद प्रशासक धीरजकुमार गोहाड,अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार ,अचलपूर पोलीस स्टेशन चे ठाणेदार गजानन मेहत्रे,परतवाडा पोलीस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के आदी उपस्थितीत होते.यावेळी भाजपा पक्षाचे माजी खासदार डॉ . किरीट सोमैया यांनी पत्रकाराशी सवांद साधला.ते म्हणाले की,अचलपूर तहसील कार्यालामार्फत २६५६ मधून १६२९ जन्म प्रमाणपत्र चे वितरण करण्यात आले आहे .यातून ३०० जन्म दाखलेसाठी बनावट कागद पत्र दिल्याने येत्या एक आठवड्यात याचा पूर्ण तपास होणार आहे. गेल्या ८ महिन्यापासून माझा लढा सुरु असून २२ शहरात कारवाई झाली आहे. बनावट कागदपत्रांद्वारे जन्म प्रमाणपत्र बनविणाऱ्या १६०० जणांविरुद्ध चार्जशीट दाखल झाल्याची माहिती सुद्धा यावेळी यांनी दिली.यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष कुंदन यादव , शंकर मालखेडे,रुपेश ढेपे,शंकर भाषानी , राम महाराज चुलेट,सतीश शर्मा , कौस्तुभ मुंदे ,महेश देशमुख आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .तसेच वेगवेगळे तिन्ही कार्यालयातील संबंधित अधिकारी वर्गासह भाजप पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते .

## मालमत्ता कर संकलनात मनपा माघारली

**व्याजमाफी देऊन करवसुली वाढवण्याचे प्रयत्न**

सहा महिन्यांत, महानगरपालिकेच्या पाचही प्रादेशिक कार्यालयांमधून १२९.४ दशलक्ष (१२९.४ दशलक्ष) ३७,९५३ (१२९.४ दशलक्ष) मालमत्ता करवसुली झाली आहे. या वर्षी, ९२० दशलक्ष (९२० दशलक्ष) लक्ष्य आहे. हे लक्ष्य गाठण्यासाठी, विशेष शिबिरे आयोजित करून आणि मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर भरणाऱ्यांना व्याजमाफी देऊन करवसुली वाढवण्याचे उद्दिष्ट असेल.

**- नरेंद्र वानखडे, उपायुक्त, महानगरपालिका**

**अमरावती/का.प्र.**

मालमत्ता कर संकलन हा महानगरपालिकेचा उत्पन्नाचा प्राथमिक स्रोत आहे. तथापि, महानगरपालिकेने सातत्यपूर्ण आणि मजबूत मालमत्ता कर संकलन उपाययोजनांच्या अभावामुळे, गेल्या सहा महिन्यांत महानगरपालिकेने तिच्या पाच प्रादेशिक कार्यालयांअंतर्गत केवळ १२९.४ दशलक्ष (१२९.४ दशलक्ष) मालमत्ता कर गोळा केले आहेत. मालमत्ता कर वसूल करण्यासाठी सुट्टीच्या दिवशीही एक विशेष मोहीम राबविण्यात आली होती. ज्या दरम्यान महानगरपालिकेने दोन दिवसांत ४० लाख (४० लाख) रुपये वसूल केले. यावेळी महानगरपालिकेने मार्च अखेरपर्यंत ९२ कोटी (९२ कोटी) मालमत्ता कर वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महानगरपालिका सध्या या उद्दिष्टापेक्षा ८३ कोटी (८३ कोटी) कमी आहे.

महानगरपालिका निवडणुका येत आहेत आणि या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना त्यांच्या निवासस्थानांवर मालमत्ता कर भरावा लागेल हे लक्षात घेण्यासारखे आहे. सध्या, माजी नगरसेवक आणि गेल्या दोन वर्षांपासून निवडणुकीची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी मालमत्ता कर भरला आहे. परिणामी, महानगरपालिकेला निवडणुकीपूर्वी मालमत्ता कर वसुलीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर महानगरपालिका मालमत्ता कर वसुलीसाठी एक विशेष योजना तयार करेल आणि आपले लक्ष्य साध्य करण्यासाठी सुट्टीच्या काळात सर्व विभागांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करेल.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानागर्तत तालुकास्तरीय कार्यशाळा



**खल्लार/का.प्र.**

ग्रामविकास व पंचायतराज विभाग, जिल्हा परिषद अमरावती तथा पंचायत समिती दर्यापूर यांच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन कृषी भवन सभागृह दर्यापूर येथे नुकतेच करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी तालुक्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले, प्रमुख उपस्थिती गटविकास अधिकारी सि.जे.ढवक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीकृष्ण कराळे, चिखलदऱ्याचे विस्तार अधिकारी विठ्ठल जाधव यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.सदर कार्यक्रमाची सुरुवात, छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर गटविकास अधिकारी सि. जे. ढवक यांनी सदर अभियानाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, विविध घटक, अभियानाचा कालावधी तसेच अभियान दरम्यान ग्रामपंचायती व संबंधित यंत्रणांनी पार पाडवयाच्या भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेला ग्रामपंचायत अधिकारी सुरज भोपसे, संजय चव्हाण यांनीही शासन निर्णयाबद्दल मार्गदर्शन केले.त्यानंतर सदर अभियांना विषयी संखोल माहिती उपस्थित असलेले सर्व सरपंच ,उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी, रोजगार सेवक यांना देण्यात आली. कार्यक्रमा यशस्वी पार पाडण्यासाठी संदीप देशमुख, राजकुमार चांदुरकर, सागर कराळे, शिवाजी ठाकरे, जोत्सना खवले, सतिश पाटील, विजय काकड, दिनेश टोळे, सचिन कोरडे, आशिष गवई, विलास यादव, विकास घाटे, पंकज नागे, प्रविण पाचघरे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचालन सुनिल स्वर्गीय यांनी तर आभार प्रदर्शन संजय भांडे यांनी केले.

## प्लास्टिकबंदी जनजागृती मोहीम

**अमरावती/का.प्र**

यंग मार्वल सर्विसेस एलएलपीच्या पुढाकाराने आणि अमरावती महानगरपालिकेच्या सहकार्याने शहरातील प्रमुख व गर्दीच्या ठिकाणी 'प्लास्टिकबंदी जनजागृती' मोहीम राबविण्यात आली.



एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता नागरिकांमध्ये थेट संवाद साधून जागरूकता निर्माण करणे हा या मोहिमेचा उद्देश होता. या अंतर्गत यंग मार्वल सर्विसेस एलएलपीचे सदस्य, महानगरपालिका अधिकारी व स्थानिक स्वयंसेवकांनी मिळून दुकानदार, फेरीवाले, ग्राहक आणि नागरिकांशी संवाद साधला. त्यांना प्लास्टिकच्या वापरावर बंदी, कापडी पिशव्यांचा व पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर याबाबत माहिती देण्यात आली. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करून प्लास्टिकमुक्त अमरावतीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या मोहिमेची संपूर्ण कल्पना, आयोजन, समन्वय व अंमलबजावणी यंग मार्वल सर्विसेस एलएलपीकडून करण्यात आली. संस्थेच्या प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी ठरला आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचला.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना

### सेवा पर्वात महावितरणतर्फे विशेष अभियान

**अमरावती/का.प्र.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वात महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. वीज ग्राहकांनी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा पर्वातील उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वीज ग्राहकांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या या योजनेला प्राधान्य देण्यास त्यांनी सांगितले आहे.प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना आहे. या योजनेमध्ये छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी वीज ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला साठ हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हाउसिंग सोसायट्यांनाही ५०० किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते.

एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिना अंदाजे १२० युनिट वीजनिर्मिती होते. वीज ग्राहकाच्या गरजेपेक्षा अधिक वीज सौर ऊर्जा प्रकल्पातून तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळविता येते.राज्यात महावितरणच्या २,८४,२४५ वीज ग्राहकांना योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांनी बसविलेल्या सौर वीजनिर्मिती प्रकल्पांची एकूण क्षमता १०८७ मेगावॅट झाली आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी वीज ग्राहकांनी https://pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर घरबसल्या ऑनलाईन नोंदणी करावी. वीज ग्राहकांना आपल्या पसंतीचा पुरवठादार निवडता येतो. महावितरणने योजनेचा लाभ घेण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. सेवा पर्वात योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणच्या सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आल्या असून या योजनेसाठीच्या अर्जांना प्राधान्य देण्यास सांगण्यात आले आहे. महावितरणच्या जवळच्या कार्यालयातही या योजनेबद्दल चौकशी करता येईल.

## संक्षिप्त

### तालुकास्तरीय स्पर्धेत मिलिंद विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांचे सुयश



**खल्लार**-जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,अमरावती यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय ४०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत दर्यापूर तालुक्यातून मिलिंद विद्यालय गौरखेडा( चांदई )येथिल विद्यार्थी लकी अरविंद खंडारे यांने प्रथम क्रमांक व अर्णव सुनिल नाईक यांने द्वितीय क्रमांक पटकाविला तसेच गोळा फेक स्पर्धेत लकी अरविंद खंडारे यांने दुसरा क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. त्याचबरोबर ६०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत लकी अरविंद खंडारे यांने दुसरा क्रमांक पटकावलेला आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर,अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर संस्थेच्या संचालिका शुभांगी अभ्यंकर शाळेचे मुख्याध्यापक ए.बी. वानखडे,क्रीडा शिक्षक दिपक कावरे व विद्यालयातील सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

### 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' परीक्षा रविवारा

**अमरावती**-'उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत अमरावती जिल्ह्यात रविवार, २१ सप्टेंबर रोजी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा घेतली जाणार आहे.या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या निरक्षर व्यक्तींनी आपापल्या परीक्षा केंद्रांवर वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.या परीक्षेचा मुख्य उद्देश १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या निरक्षर व्यक्तींना मूलभूत साक्षरता कौशल्ये प्रदान करणे हा आहे. यात वाचन, लेखन आणि गणितीय कौशल्ये तपासली जातील. केंद्र शासनाच्या 'उल्लास' या कार्यक्रमाअंतर्गत ही परीक्षा घेण्यात येत आहे, ज्यामध्ये निरक्षर व्यक्तींना केवळ साक्षर बनवणेच नाही तर त्यांना जीवनोपयोगी कौशल्ये, जसे की आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता आणि आरोग्यविषयक माहिती देणे हे देखील समाविष्ट आहे.परीक्षेसाठी, उमेदवारांनी आपला नोंदणी क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच, ओळखपत्र म्हणून मूळ आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा बँक पासबुक यापैकी कोणतेही एक कागदपत्र सोबत बाळगणे अनिवार्य आहे. परीक्षा केंद्र हे त्याच शाळेत असेल जिथे उमेदवारांनी नोंदणी केली आहे. परीक्षा सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार असून, दिव्यांगांसाठी ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. ही परीक्षा मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तेलुगू, तामिळ, बंगाली आणि उर्दू या माध्यमांमध्ये देता येईल. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना केंद्र सरकारकडून प्रमाणपत्र दिले जाईल.

### रेवसा आश्रमशाळेत गोवर-रुबेला लसीकरण मोहिम



**अमरावती** - आयुष्मान भारतअंतर्गत, आयुष्मान आरोग्य मंदिर, रेवसा येथे जिल्हास्तरीय गोवर-रुबेला विशेष लसीकरण अभियान मोहिमेचे उद्घाटन नुकतेच पार पडले.कार्यक्रम चतुरजी उके अनुदानित आश्रमशाळा, रेवसा येथे आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले यांच्या हस्ते झाले.निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप हेडाऊ,जिल्हा प्रजनन व बालआरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण पारिसे आदी उपस्थित होते.यावेळी गोवर-रुबेला या आजारांविषयी सविस्तर माहिती देत,लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.गोवर आणि रुबेला निर्मूलनासाठी प्रत्येक मुलापर्यंत लसीकरण पोहोचणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.डॉ.सुरेश असोले यांनी गोवर व रुबेला हे संसर्गजन्य आजारमुलांसाठी अत्यंत घातक असल्याचे सांगितले.५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी 'एम.आर. विशेष अभियान' महत्त्वाचे आहे, आणि आदिवासी आश्रमशाळांमधीलमुलांपर्यंत लसीकरण पोहोचणे ही खरी गरज आहे, असे ते म्हणाले.डॉ.प्रवीण पारिसे यांनी गोवर-रुबेला लसीकरण पूर्णपणे होणेहीच प्राथमिकता असल्याचे नमूद केले.प्रत्येक मुलाला लस मिळालीच पाहिजे, असा आरोग्य विभागाचादृढनिश्चय असल्याचेही त्यांनी सांगितले.डॉ. संदीप हेडाऊ यांनी आदिवासी आश्रमशाळांमधील मुलांचेआरोग्य ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे म्हटले.

### जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे जयंती

**अमरावती**-महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनरुत्थानात मोलाचे योगदान देणारे विचारवंत, झुंझार पत्रकार आणि साहित्यिक प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात आज साजरी करण्यात आली.निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अधिक्षक निलेश खटके, तहसिलदार विजय लोखंडे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनीही प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

### रोजगार मेळाव्यात १२८ तरुणांचा सहभाग

**अमरावती**-जिल्ह्यातील सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या 'प्लेसमेंट ड्राईव्ह' ला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अमरावती शहर आणि परिसरातील विविध तालुक्यांमधून तब्बल १२८ उमेदवारांनी मेळाव्यात सहभाग घेतला.या मेळाव्यात दहावी, बारावी, पदविकाधारक, पदवीधर तसेच तांत्रिक शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार संधी मिळावी यासाठी पाच नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. यामध्ये कोल्ब्रो ग्रुप, सहयोग मल्टी बँक, कोअर प्रोजेक्ट, स्विगी आणि जाधव गियर्स या कंपन्यांचा समावेश होता. या कंपन्यांनी ८२ विविध पदांसाठी मुलाखती घेतल्या. उपस्थित १२५ उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन जागेवरच निवड प्रक्रिया राबविण्यात आली. यातून ३८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून, ४ उमेदवारांची अंतिम निवड लगेचच जाहीर करण्यात आली. त्यामुळे तरुणांना कंपन्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

# महाराष्ट्र हे चळवळीचे माहेरघर !

**भारताच्या जवळील नेपाळ, बांगलादेश, फ्रान्स, पाकिस्तानमध्ये आक्रोशाची आग पेटलेली दिसत आहे. त्यामुळे येथील राजकीय पुढा-यांनी याबाबत विशेष लक्ष देऊन सामान्य जनता, शेतकरी यांचे प्रश्न सोडविण्याकरीता प्राधान्य द्यावे...**

महाराष्ट्रात शेतकरी शेतमजुराच्या शोषणाच्या कथा, कविता व लेख लिहिल्या गेल्या. शरद जोशी यांनी भाषणातून भूमिका याबाबत विषद केली.मात्र त्याचा कोणताही परिणाम या महाराष्ट्रातील सत्ताधीशांवर राज्यकर्त्यांवर झाला नाही. आता तर महाराष्ट्रातील सर्व कायदे धाब्यावर बसवून गुंडाराज तयार झाले. प्रत्येक व्यवस्थेला सुप्रीम कोर्टात आव्हान देऊन न्याय मिळविण्यासाठी धाव घ्यावी लागते. निकाल येईपर्यंत चुकीचा पायंडा पाडून सत्ता भोगत बसणे,शेवटी सत्तेपुढे कोणाचे शहाणपण चालत नाही हेच सिध्द करणे.इतके महाराष्ट्रासारखे 'निर्लज्जम सदासुखी' राज्य भारतात दुसरे कोणतेच नसेल. राज्यात अनेक क्रांतिकारक चळवळी उभ्या झाल्या.त्या सर्व चळवळीचे श्रेय श्रीसंत ज्ञानेश्वर,संत नामदेव, चक्रधर स्वामी, जगद्गुरु तुकाराम महाराज, दास कबीर,शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर,महात्मा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे ,विनोबा भावे, संत गुलाबराव महाराज,संत गाडगेबाबा,कर्मयोगी डॉ. पंजाबराव देशमुख, शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील, शाहीर अण्णा भाऊ साठे,यशवंतराव चव्हाण,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, युगात्मा शरद जोशी व इतर असे मान्यवरांनी महाराष्ट्रात चळवळी उभ्या केल्या. म्हणूनच महाराष्ट्र हे चळवळीचे माहेरघर बनले.राज्यकर्त्यांच्या तमासखोरीमुळे, आता तर लुटलेल्या तिजोरीतून फक्त राजकीय चळवळी सुरू झाल्यात.

गेल्या कित्येक वर्षापासून, राज्यकर्त्यांनी व सत्ताधीशांनी सत्तेचे भूत डोक्यात घालून या चळवळीचे तुकडे पाडणे सुरू झाले. या चळवळीचे फायदे मात्र स्वतः सत्ताधीश होण्यासाठी वापरल्या गेलेत, त्यामुळे संत महात्मे, राष्ट्रसंत ,जगद्गुरु यांचे विचार मागे पडले. आणि सत्ता मिळवण्यासाठी शेतकरी - कष्टकरी लोकांची लूट करून स्वतःची घराणेशाही वाढवण्यासाठी जनतेचा उपयोग करून घेण्यात आला. आणि या व्यवस्थेत सत्तेच्या लालचीचे निमित्याने महाराष्ट्रातील जनता बळी पडली. त्यात स्थानिक पातळीवर याचे चुकीचे शासन प्रणालीत ग्रामीण भागातील जनता मात्र सतत झुलवत ठेवली व त्यांना पदाधिकारी करून ग्रामीण शेतकरी - शेतमजुरांचा 'गरिबी हटाव'च्यो नावावर बट्ट्याबोळ केला.

'सरकार क्या समस्या सुलजाये, सरकार यही समस्या है'-शरद जोशी.सत्ता व शासन तिजोरी चोरण्यासाठी राजकीय दलाल,सौदेबाज तयार करण्यात आले व त्यांना जनतेत प्रचार करण्यासाठी ही कबुतरे सोडण्यात आली. या राजकीय दलालांची जनता लाचार व गुलाम बनली. त्यामुळे 'देरे हरी, खाटेवरी' अशी अवस्था आणून ठेवली. जनता निस्तब्ध होऊन, दिवसेंदिवस सर्व चळवळीचा बट्ट्याबोळ चालू झाला.सत्तेच्या स्वार्थासाठी चळवळीचे अतोनात नुकसान केले. त्यात प्रामुख्याने, वारकरी चळवळ, रिपब्लिकन चळवळ, हिंदूंची चळवळ, श्री गुरुदेव चळवळ, सत्यशोधक चळवळ,शेतकरी चळवळ, कम्युनिष्ठाची शेतमजूर चळवळ, या सर्व चळवळीचे तुकडे पाडून, सत्ताधीश, राज्यकर्ते सरकारच्या तिजोरीवर फणा काढून नागोबा बनले. तिजोऱ्या लुटून भारत देशातून परदेशात पसार झाले.याचाच फायदा सत्ताधीश व राज्यकर्ते घेतात. त्यासाठी ते शासनाच्या लुटलेल्या तिजोरीतून पैसा सुद्धा उपलब्ध करून देतात.



आमदार - खासदार चा[illegible]चो आर्थिक धोरणे व निर्णय घेऊन महाराष्ट्र कर्जबाजारी होऊन, पुरुष व महिला व कुटुंबासहित सतत शेतकरी आत्महत्या वाढवून, हा देश महासत्तेचे स्वप्न पाहत आहेत. 'राज्यकर्त्यांनो अजून कितीक वर्ष जनतेला बेवकुब बनवाल?, आयुष्यभर सत्तेत राहणाऱ्या सत्ताधीशांना जर शेतकरी आत्महत्याची राष्ट्रीय आपत्ती कळत नसेल, किंवा समजत नसेल तर आता यांनाच पुन्हा - पुन्हा कां निवडून द्यावे?.' असा समाजासमोर गंभीर प्रश्न तयार झाला.नुसतं नेत्यांनी जाहीर सभा घेऊन, आश्वासनांची खैरात वाटावी, आणि सत्तेत जावे. अन् भ्रष्टाचार करून जनतेच्या उरावर नाचावे. बोगस जाहीरनामे छापून,कृती मात्र शून्य करावी, हा एकच गोरखधंदा सध्या महाराष्ट्रातच नव्हेतर देशात चालू आहे. शहरीकरणावर भर देऊन ग्रामीण जनता व तेथील बेरोजगारांना मातीत घालण्याचे काम देशात घडत आहे.

सत्ताधीशांचे सोईसाठी गेल्या ७५ वर्षात ७५ वेळा पुन्हा - पुन्हा घटना दुरुस्ती करून, मूळ संविधानाचे धिंडवडे करण्यात आले,असे पंतप्रधान मोदींनी जाहीर भाषणात सांगितले. विधानसभा निवडणूक काळात स्वतः पंतप्रधान मोदी व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी येवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सोयाबीनचे ३००० भाव परवडत नाही म्हणून आमचे सरकार आले तर ६००० व ७००० हजार करण्यात येईल, फक्त घोषणांचा पाऊस पडत आहे.आता तर आत्महत्या रोखण्यायासाठी व सत्तेचे, परिवर्तन करण्यासाठी, जुने सत्ताधीश, राज्यकर्ते मातीत घातल्याशिवाय परिवर्तन होऊ शकत नाही.

संपूर्ण भारतात ईव्हीएम मशीनद्वारे व्होट चोरीचे घोटाळे उघडकीस येत आहे. नुकतेच धुळे येथे रेस्टहाऊस वर माजी आमदार श्री अनिल अण्णा गोटे यांनी रात्रभर ठाणे मांडून नोटा पकडून भांडाफोड केला होता, आणि आता पुन्हा त्याच शहरात ४५००० मते चोरीचे प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालय, व निवडणूक आयोगाकडे, पोलीस स्टेशन व अनेक ठिकाणी तक्रारी दाखल करून मत चोरीचा पुन्हा त्यांनीच भांडाफोड केला. लाडकी बहीण व इतर योजना वापरून मते मिळवण्यासाठी, उघड भ्रष्टाचार करून सरकारचे तिजोरीचा खुल्याने वापर केल्या जात आहे.म्हणजेच महाराष्ट्र हे लोकशाहीला पायदळी तुडविण्याची केंद्रस्थान बनले. यासर्व बाबीचा विचार करावा लागेल. भारताच्या जवळील नेपाळ, बांगलादेश, फ्रान्स,पाकिस्तानमध्ये आक्रोशाची आग पेटलेली दिसत आहे. महाराष्ट्रात संत विचारधारा व संस्कृतीची परंपरा असल्यामुळे हे राज्य मात्र अजूनही शांत आहे. परंतु असाच जर अंत पाहण्याचा दृष्टिकोन ठेवला तर हा सुद्धा वणवा पेटायला उशीर लागणार नाही. त्यासाठी पुन्हा जनता जनार्दनाला सामाजिक क्रांतीची ज्योतच पेटवावी लागेल.

**धनंजय काकडे**
मो.९८९०३६८०५८

# पर्यावरणाचा मुख्य आधार बिजारोपण नसलेले वड आणि पिंपळ

संपूर्ण पर्यावरणाला आपल्या सामर्थ्याने जीवित ठेवणारे दोनच वृक्ष वड आणि पिंपळ हे नोंद घेण्यासारखे आहेत. इतर वृक्षाप्रमाणे वड आणि पिंपळ या दोन्ही वृक्षांची प्रत्यक्ष बीजनिर्मिती नाही.पर्यावरणातील सर्व वृक्षांची बीजनिर्मिती आहे किंवा वनस्पती शास्त्रातून केली जाते पण वड आणि पिंपळ या दोन्ही वृक्षांची लागवड नैसर्गिकरित्या कावळा या पक्षाच्या माध्यमातून होत असल्याचा दाखला विज्ञानातून मिळालेला आहे.पर्यावरणात वड आणि पिंपळ ह्या दोन्ही वृक्षांचे अत्यंत महत्वपूर्ण स्थान व अन्यन्यसाधारण उपयोगीता आहे. हे दोन्ही वृक्ष सृष्टीतील सर्व वृक्षांपेक्षा जास्त मात्रेमध्ये ऑक्सिजन जनरेट करतात. सृष्टीतील सर्व सजीव मानवजात, पशू-पक्षी यांना प्राणवायूचे उत्सर्जन करुन जीवंत ठेवण्याची किमया या दोन्ही वृक्षांकडून पार पाडली जाते.



गणपती उत्सव संपल्याबरोबर पितृपक्ष प्रारंभ होतो. या पितृपक्षातील काळात आपले स्वर्गस्थ झालेले पूर्वज आई, वडील, आजोबा, आजी, भाऊ जे कुणी असतील त्यांच्या प्रत्यर्थ त्या त्या तिथीला आपण श्राद्ध व पिंडदान करतो.अशी प्रथा पुर्वापार विधीशास्त्राप्रमाणे आहे. कितीतरी युगांचा या विधीला वारसा आहे.या श्राध्दपक्षात कावळा या पक्षाचे आध्यात्मिक महत्व जरी असले तरी त्यापेक्षा अधिक शास्त्रीय महत्त्व पर्यावरण निर्मितीसाठी सुध्दा आहे ते कसे ? तर जाणून घेऊया..... आपल्या पितरांच्या नैवेद्याचा (खाद्यान्नाचा) घास गोव-या पेटवून आपण त्यावर अग्निला व नंतर कावळा या पक्षाला खाऊ घालतो. श्राद्ध पक्षात कावळा पक्षाचे स्थान महत्वाचे जसे आहे त्यापेक्षाही या पक्षाचे महत्वाचे स्थान सर्वात जास्त ऑक्सिजन जनरेट करणा-या वड आणि पिंपळ वृक्ष निर्मितीमध्ये आहे.

वड आणि पिंपळ या वृक्षांची लागवड कावळ्याच्या विष्टेतूनच होते हे वनस्पती शास्त्रज्ञांनी सिध्द केले आहे. वड आणि पिंपळ या दोनच वृक्षांची प्रत्यक्ष बीज निर्मिती नाही. या दोन्ही झाडांची कोमल अंकुर स्वरूपातील फळं जेव्हा फक्त 'कावळे' खातात, केवळ कावळेच इतर कोणताही पक्षी नाही. तेव्हा त्यांच्या 'पोटातच' ही प्रक्रिया सुरु होते आणि ते जेथे 'विष्ठा' करतात तेथेच 'वड' किंवा 'पिंपळ' हे वृक्ष येतात.या कावळ्यांशिवाय ही झाडे टिकणार नाहीत व कावळ्यांचे अंडी घालणे म्हणजेच त्यांची प्रजनन क्रिया ही फक्त 'भाद्रपद' महिन्यातच होते. त्यामुळे त्यांना पोषक आहार दिल्यास पर्यावरणाचे सृष्टीचक्र व्यवस्थित चालेल हे पशुशास्त्राच्या तज्ञ अभ्यासकांना स्पष्ट केले आहे.

भारतभूमी ऋषी मुनींची तपस्वी भूमी आहे. भारतीय संस्कृतीतील 'ऋषि-मुनि' हे अत्यंत तपस्वी व शास्त्राचे जाणकार होते. माणसांच्या आरोग्यासाठी ही वड आणि पिंपळ ही दोनच झाडे अत्यंत उपयोगी व आवश्यक आहेत म्हणून या वृक्षांचे संवर्धन होण्यासाठीच पोषक आहार 'कावळ्यांना' देण्याची प्रथा सुरु करण्यात आली.आपली पूर्वापार चालत आलेली जीवनशैली ही पर्यावरणपुरक आणि शास्त्रावर आधारलेली आहे. फक्त ती समजून घ्यायची आपली बौध्दिक क्षमता व कल्पनाशक्ती कमी पडते.वड, पिंपळ आणि कावळा ह्या तिघांचा परस्परपूरक संबंध असून एक सजीव दुस-या सजीवांचे जैविक रक्षण करतो हे कावळा पक्षामुळे प्रत्ययास येते म्हणून प्राण्यांवर प्रेम करणे म्हणजे भूतदया होय. कावळा पक्षाचे सजीवांवर किती उपकार आहे हे सिद्ध होते.

मुळात एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे आणि ती म्हणजे वड आणि पिंपळ हे दोन्ही वृक्ष दिर्घकाल टिकणारे व कधी नाश न पावणारे वृक्ष आहेत. या दोन्ही वृक्षांचे संगोपन व निगा राखणे ही मानवाची नैतिक जबाबदारी आहे. या धर्तीवर पुढील हजारो वर्षात सृष्टीचे अस्तित्व जीवंत ठेवायचे असेल आणि सजीवांचे जीवीत अबाधित राखायचे असेल तर एक व्यक्ती एक वृक्ष लागवड हा संकल्प प्रत्येकाने करावा व त्या संकल्पनेचा प्रचार व प्रसार सुध्दा सर्वांनी करावा.झाडे लावा झाडे जगवा ही राष्ट्रीय मोहीम संवर्धित झाली पाहिजे. वृक्ष हे आपले रक्षक व जीवनदाते आहेत. म्हणून पशुपक्षांसह झाडांवरही प्रेम करा. आपल्या देशाचे सरकार वृक्ष लागवड, जतन व पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करते तो निधी सार्थकी लागला पाहिजे. जो ही बाब अंतःर्मनाने जाणून पर्यावरण वाचवेल तीच त्याची पितृपक्षातील खरी आदरांजली आपल्या पितरांना होईल.



**रजनी आमले,** अमरावती
मो.९४२०१२५६५२

# नवरात्रातील नऊ रंगः शास्त्र, अपसमज की मार्केटिंग फंडे!



आई जगदंबेचे नवरात्र पुढच्या आठवड्यापासून सुरू होते आहे. नवरात्रात भावभक्तीचा जागर, घरोघरी, मंदिरात घटस्थापना,पूजार्चना, सप्तशती पाठ, भजन ,कुमारिका पूजन,गोंधळ, घागरी फुंकणे आणि हल्ली मोठ्या प्रमाणात होत असलेले गरबे आणि दांडिया असे या नवरात्राचे स्वरूप असते.शक्तीचे रूप असलेल्या महिलांचा भक्तिभाव आणि उत्साह यावेळी बघण्यासारखा असतो.पण याच भक्तिभावाचा, उत्साहाचा फायदा काही मार्केटिंग कंपन्या कशा करून घेतात याची प्रचिती याच उत्साहात प्रकर्षाने जाणवते.गेल्या काही वर्षांपासून एक वेगळीच परंपरा किंवा वेगळाच विचार प्रवाह या नवरात्रात आढळून येतो. तो म्हणजे नवरात्रात नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या परिधान करणे, प्रत्येक दिवशीचा रंग हा ठरलेला असतो. महिलावर्गाला याचे प्रचंड आकर्षण आहे. अगदी विशिष्ट रंगाची साडी नसेल तर ती आवर्जून विकत घेतली जाते. आणि त्याच बरोबर त्यावरील अलंकारही मॅचिंग घेतले जातात.त्यासाठी इतरही स्त्रियांना प्रवृत्त केले जाते. गेल्या दोन-तीन वर्षांपासून तर पुरुष सुद्धा त्या रंगाचे वस्त्र प्रधान करू लागले आहे.

पण देवीच्या नवरात्रात नऊ रंगांच्या साडी नेसण्याला काहीही शास्त्रीय आधार नाही. देवीच्या साड्यांचे रंग काही ठिकाणी वारानुसार, काही तिथीनुसार ठरलेले असतात.परंतु त्या रंगाचे वस्त्र भक्तांनी परिधान करावे असे कुठेही वेद, उपवेद,शास्त्रे,अठरा पुराणे,रामायण, महाभारत यापैकी कुठल्याही ग्रंथात असे दिलेले नाही. मग हे रंगांचे खूळ नवरात्रात आले कसे? आपल्या सणांमध्ये काहीतरी नाविन्यपूर्ण भन्नाट कल्पना आणून त्याद्वारे आपले आर्थिक उद्योग,व्यवसाय वाढवायचे अशी जणू स्पर्धाच आता मार्केटिंग कंपन्यांमध्ये सुरू झाली आहे. त्यातूनच हे नऊ रंगांचे खूळ जन्माला आले.

परिणामी नवरात्रात शाळा-कॉलेजात,मंदिरात,भजनात नऊ रंगांच्या साड्या दिसू लागल्या.नवरात्राच्या काळात नऊ रंगांच्या साड्या आणि मॅचिंग करण्यात तन-मन- धन, बुद्धी खर्च करण्यापेक्षा नवविधा भक्ती करणे,आपल्यातील नऊ दोष दूर करून, नऊ गुणांची वृद्धी करणे.असे प्रयत्न केले तर केवळ नऊ दिवसांच्या या उपासनेने आपले आणि आपल्या कुटुंबाचे नक्कीच कल्याण होईल.

नवरात्र हा मातृशक्तीचा उत्सव आहे हे पुढच्या पिढ्यांवर बिंबवण्यासाठी पारंपारिक पद्धतीने, भक्ती भावाने तो साजरा केला पाहिजे. अन्यथा पुढच्या पिढ्यांना तो मनोरंजनात्मक फॅशन शो वाटेल. आणि त्याच पद्धतीने ते साजरा करतील. हा धोका टाळायचा असेल तर आत्ताच आपण याबाबतीत जागृत झालं पाहिजे. या सगळ्या प्रकाराला कुठलाही शास्त्रीय आधार नाही. तेव्हा महिलावर्गाने त्याच्या आहारी न जाता सुज्ञपणे ,भावभक्तीने नवरात्र उत्सव साजरा करावा.

देवीने चंड- मुंड,शुंभनिशुंभ ,रक्तबीज अशा राक्षसांना मारून जगदंबेने जी विश्रांती घेतली तो काळ म्हणजे नवरात्र.नवरात्रात महाकाली,महालक्ष्मी, महासरस्वती या तिन्ही रूपातील देवींची उपासना करावी.धनधान्य, सुबत्ते करिता महालक्ष्मीची उपासना करावी,शत्रु संहार करण्यासाठी, सामर्थ्य प्राप्तीसाठी महाकालीची उपासना करावी. तसेच मुलांकडून सरस्वती देवीची, विद्या आणि बुद्धी याकरता उपासना करून घ्यावी. नवरात्र काळात सप्तशती पाठ करणे, आपल्या कुलदेवतेचा जास्तीत जास्त नामजप करणे, ओटी भरणे, भावपूर्ण भजन पूजन करणे यामुळे निश्चितच जगदंबेचे आशीर्वाद सर्वांना मिळतील.

**माधवी पत्की,** नागपूर

# मूर्ती कला एक जबाबदारी

काही दिवसांनी दुर्गा देवीचे नवरात्र सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर श्री दुर्गादेवीच्या मूर्तीची निर्मिती अंतिम टप्प्यावर आहे. मध्य प्रदेशातील भोपाळ येथे श्री दुर्गादेवीच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात बनवल्या जातात. गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक गणपती उत्सव व नवरात्र उत्सव यातील मूर्ती विविध रूपाच्या व आकाराच्या असतात.यावर्षी कृत्रिम बुद्धिमत्ते द्वारे बनविलेल्या श्री दुर्गादेवीच्या रूपानुसार बालिकेप्रमाणे दिसणाऱ्या देवीच्या मूर्तींना विशेष मागणी असल्याने मूर्तिकारांनी तशाच पद्धती च्या मूर्ती बनवण्याला प्राधान्य दिले आहे. हे बनवत असताना देवीच्या मूळ स्वरूपातच पालट करण्यात आला आहे. गणपती किंवा श्री दुर्गा देवी ह्या असुरांचा संहार करणाऱ्या देवता असल्याने मूळ स्वरूपाच्या मूर्ती बनवणे योग्य आहे. महिषासुराचे मर्दन करणारी, उग्र भाव असलेली श्री दुर्गा मातेची मूर्ती जितकी मारक तितकीच सज्जनांना अश्वस्त करणारी असते पण कलेच्या नावाखाली मूर्तीच्या मूळ स्वरूपात बदल करून देवीला



शस्त्रहीन किंवा बालिकेच्या रूपात दाखविणे हे त्या देवतेचा अपमान करण्यासारखेच आहे.

दहा हातात दहा शस्त्र घेतलेली श्री दुर्गादेवीची मूर्ती ही धर्मरक्षण, शक्ती आणि दृष्टांचा नाश यांचे प्रतीक आहे अशी मूर्ती पाहणाऱ्याच्या मनात संकटांशी सामना करण्याची शक्ती मिळते पण अन्य रुपात, वेशभूषेत असणारी, शस्त्रहीन मूर्ति ह्या कार्टून प्रमाणे वाटतात व त्यांचा तसा प्रभाव देखील नसतो. डिजिटल माध्यमाद्वारे बनवलेल्या अशा देवतांच्या चित्रांना डिजिटल अवतार असे म्हटले जाते. ही चित्रे सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात वायरल ही होतात त्यामुळे त्यांची मागणी वाढते.रशिया,अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान या देशात श्री दुर्गादेवीच्या मूर्तीची मोठी मागणी असते.यंदा ए आयच्या माध्यमातून बनवलेले गेलेल्या चित्रानुसार बालिका रूपात बनवलेल्या मूर्ती च्या विक्रीत दुप्पट,तिप्पटीने वाढ झाली आहे.

कोणतीही कला असो मग ती चित्रकलाअसो,मूर्ती कला असो, या द्वारे जे सादर केले जाते त्यात असणाऱ्या देवदेवतांचे तत्व तिथे कार्यरत होऊन ते बनवणाऱ्याला जसे मदत करते तसेच ते पाहणार्यालाही मदत करते त्यामुळे मूर्तीचे किंवा चित्रातल्या देवदेवतांचे मूळ स्वरूप दाखवणे किंवा घडविणे हे जवाबदारीचे व जिकिरीचे काम आहे.ज्या कलेतून देवाची स्पंदने तुमच्या कडे येतात, देव तुमच्या कडे येतो तीच खरी कला आहे.

**लीना गाडगीळ**

# शॉर्टकटचा नाद अन् संदर्भाचा वाद

टेक्नॉलॉजीच्या या युगात इंग्रजी पूर्वीपेक्षा फारच फ्रेंडली भाषा झाली आहे. पण आजही इंग्रजीमधील काही शब्द वापरताना आपण गलती करतो.अनेक इंग्रजी शब्द तर आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग झाले आहेत. पण ते सुद्धा आपण चुकीच्या संदर्भातून वापरतो असे तुम्हाला सांगितल्यास आश्चर्य वाटेल. पण हे खरं..!

आपण दैनंदिन वापरामध्ये अनेक शब्द एकमेकांना पर्यायी आणि पूरक शब्द म्हणून वापरतो. तसेच प्रत्येक भाषेतील काही शब्दांची काही ना काही गंमत असते.त्यापैकीच इंग्रजीतील थँक्स आणि थँक यू या दोन शब्दांची देखील एक गोष्ट आहे. आपल्यातले जवळपास सर्वचजण थँक्स हा थँक यू चा शॉर्टकट असल्याचे समजतात. अख्खा थँक यू शब्द बोलण्याऐवजी थँक्स बोलून अनेकजण मोकळे होतात. मात्र, हे दोन शब्द उच्चारायला सारखेच असले तरी त्यांचा अर्थ वेगवेगळा असून तो संदर्भाप्रमाणे बदलतो. अर्थात भाषेतील हे बारकावे आपण दैनंदिन वापरात फारसे मनावर घेत नाही. मात्र,त्यांचा मूळ अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. तुम्ही सुद्धा थँक्स आणि थँक यू हे दोन शब्द यापूर्वी अनेकदा वापरले असतील. मात्र,हे दोन्ही शब्द सारख्याच अर्थाचे नाही असे सांगितल्यास तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटेल, पण हे खरे आहे.




थँक यू कधी वापरतात?आता,ज्याप्रमाणे थँक्स हा जवळच्या लोकांसाठी वापरतात त्याचप्रमाणे थँक यू हा शब्द क्वचित भेटणा-या, वयाने मोठ्या, औपचारिक संवादादरम्यान वापरला जातो. म्हणजेच अधिकारी, शिक्षक, अनोळखी व्यक्ती, वयस्कर माणसे, प्रवासात भेटणारे लोक यांच्याशी बोलताना थँक यू वापरणे योग्य ठरते. औपचारिक संवादादरम्यान आभार व्यक्त करण्यासाठी थँक यू शब्द वापरतात. अनोळखी व्यक्तीचे आभार मानताना थँक यू वापरल्यास समोरच्या व्यक्तीला त्याने केलेल्या कामासाठी आपण त्याचे आभार असल्याचा संदेश पोहचतो. हा शब्द सामान्यपणे जवळीक दर्शवण्याऐवजी आदर, नम्रपणा दर्शवतो.

मात्र, हे दोन शब्द एकमेकांना पुरक वापरले तरी हरकत नाही. कारण थँक यू म्हणून जसा आदर व्यक्त होतो तसाच थँक्स मधूनही होतो फक्त तो अनौपचारिक (इनफॉर्मल) शब्द आहे. दोन्ही शब्द हे आदरार्थीच आहेत. फक्त ते कुठे आणि कसे वापरावेत हे आपण कोणाशी बोलतो यावर अवलंबून असते.

थँक्स आणि थँक यू या शब्दांचा अर्थ एकच आहे का? असा प्रश्न जर पुढे येत असतील तर त्याचे उत्तर निश्चितच नाही. थँक्स आणि थँक यू यांचा अर्थ समान असला तरी त्यांचा वापर संदर्भानुसार बदलतो. ब-याच इंग्रजी भाषिकांनाही थँक्स आणि थँक यू मधील फरकाबद्दल गोंधळ झाला आहे. सोप्या इंग्रजीत दोन्ही शब्दांच्या अर्थामध्ये थँक्स हे अनौपचारिक आहे, तर थँक यू हे अधिक औपचारिक आणि आदर दर्शवणारा शब्द आहे. हे अधिक सभ्य मानले जाते.

औपचारिक म्हणजे सामाजिक नियम, शिष्टाचार आणि परंपरांचे पालन करून एका विशिष्ट पद्धतीने वागणे किंवा लिहिणे.हे अनौपचारिक या शब्दाच्या विरुद्ध आहे, जो अधिक आरामशीर आणि व्यक्तिगत असतो.औपचारिकतेमध्ये योग्य शब्द निवडणे,आदरपूर्वक आणि संक्षिप्त भाषेत संवाद साधणे तसेच शिस्तबद्ध रचना राखणे समाविष्ट आहे.थोडक्यात, औपचारिक म्हणजे कोणत्याही गोष्टीमध्ये एक प्रकारची शिस्त, पद्धतशीरपणा आणि नियमांचे पालन करणे होय.

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

## दिवाळी विशेषांक-२०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही 'जनमाध्यम'दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक 'जनमाध्यम' तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सअॅप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार 'जनमाध्यम'कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टों.२०२५ पर्यत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**

# तलाठी निलंबित : विभागीय चौकशीचे आदेश

## उमरा परिसरातील सर्वेक्षणात घोळ उघड




■ प्रतिनिधी | खेट्री ■

उमरा परिसरातील पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात गंभीर घोळ करणाऱ्या तलाठी एस. पी. लठाड यांना बाळापूरचे उपविभागीय अधिकारी निखिल खेमनर यांनी १७ सप्टेंबर रोजी निलंबित केल्याची माहिती समोर आली आहे.

तलाठी लठाड यांनी उमरा येथे रुजू झाल्यापासूनच दलालामार्फत शेतकऱ्यांकडून पैशांची उकळी करून सर्वेक्षण करण्याचे प्रकार सुरु केले होते. ग्राम पंचायतला विश्वासात न घेणे, सर्वेक्षण यादी कार्यालयावर न लावणे, सरपंचाच्या खोट्या स्वाक्षऱ्या करून तहसील कार्यालयात यादी सादर करणे, पैसे न देणाऱ्या शेतकऱ्यांना यादीतून वगळणे, तर धरण पाण्यात बुडालेल्या जमिनींसाठी अनधिकृतपणे सर्वेक्षण दाखल करणे, तसेच खासदारांनी पाहणी केलेल्या शेतकऱ्यांची नावे यादीतून काढून टाकणे आदी गंभीर आरोप ग्राम पंचायतचे सरपंच किशोर सुडोकार, उपसरपंच रुपाली हरमकार, ग्राम पंचायत सदस्य व शेतकरी यांनी तक्रारीतून केले होते.

या तक्रारींनंतर तहसीलदारांनी १२ सप्टेंबर रोजी पथकातील तलाठी एस. पी. लठाड, सचिव जयेश तायडे आणि कृषी सहाय्यक विजय भगत यांना निलंबित करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांनी तलाठी लठाड यांच्यावर कारवाई केली असून सचिव व कृषी सहाय्यकांवरील कारवाईकडेही लक्ष लागले आहे.

**शासकीय कामात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा :** उपविभागीय अधिकारी निखिल खेमनर यांनी निलंबन आदेशात नमूद केले आहे की, तलाठी एस. पी. लठाड यांनी शासकीय कामात जाणीवपूर्वक हलगर्जीपणा करून शेतकऱ्यांना नुकसानीच्या मदतीपासून वंचित ठेवले. त्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर मानली जाऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात आली.

**एका गावातून बदली, दुसऱ्या गावात निलंबन! :** तलाठी लठाड यांची वादग्रस्त कारकीर्द यापूर्वीही चर्चेत राहिली आहे. २०२४ मध्ये खेट्री येथेही त्यांनी सर्वेक्षणात शेतकऱ्यांची लूट केल्याचा आरोप झाला होता. हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या शेतकऱ्यांना थेट फोनवरून फौजदारीच्या धमक्या दिल्याचेही समोर आले होते. परिणामी सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांची बदली करून हकालपट्टी करण्यात आली होती. आता उमरा गावातही त्यांनी तशाच प्रकारचे गैरप्रकार करून निलंबन ओढवून घेतले आहे.

# निलेश देव यांच्या मागणीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांची दखल

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्रात प्लास्टिक कचऱ्याचा शाश्वत निपटारा आणि पुनर्वापर उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन पुढील दोन महिन्यांत नवे धोरण जाहीर करणार आहे. ही महत्त्वपूर्ण घोषणा उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांनी केली असून, विकास आयुक्त कार्यालयाने याबाबत औपचारिक माहिती दिली आहे.

'स्वच्छ अकोला, सुंदर अकोला' या उपक्रमाअंतर्गत पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेले समाजसेवक तथा वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक निलेश देव यांनी ५ जून २०२५ (जागतिक पर्यावरण दिन) रोजी उद्योगमंत्र्यांकडे प्लास्टिक पुनर्वापर उद्योग धोरणाची मागणी केली होती. त्यांच्या मागणीत सबसिडी, करसवलती, परवाना प्रक्रिया सुलभता, वीजबिल सवलत, जिल्हास्तरावर निधी वितरण समिती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून उत्पादने खरेदीला प्रोत्साहन अशा मुद्द्यांचा समावेश होता.

देव यांच्या या मागणीची दखल घेत उद्योगमंत्री सामंत यांनी विकास आयुक्तांना तातडीने अभ्यास सुरू करण्याचे आदेश दिले. सध्या प्राथमिक तांत्रिक व प्रशासकीय अभ्यास सुरू असून, दोन महिन्यांत धोरणाचा मसुदा राज्य मंत्रिमंडळापुढे ठेवला जाणार आहे. या धोरणामुळे पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य, टाईल्स, कुड (ईंटा), इंधन व इतर उपयुक्त वस्तू तयार करणाऱ्या उद्योगांना चालना मिळेल. ग्रामीण व शहरी भागात रोजगारनिर्मिती, पर्यावरण संवर्धन आणि स्थानिक विकासाचा मार्ग मोकळा होईल.

तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे महाराष्ट्र प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर क्षेत्रात देशासाठी आदर्श निर्माण करेल.

### दोन महिन्यांत येणार प्लास्टिक पुनर्वापर उद्योग धोरण



'प्लास्टिक कचरा हे पर्यावरणासमोरील मोठे संकट आहे. त्याचा वैज्ञानिक पुनर्वापर करून उद्योग व रोजगाराशी जोडले, तर तो समस्या न राहता संधी ठरू शकतो. शासनाने आमच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने चळवळीला बळ मिळाले असल्याचे समाधान आहे'

**निलेश देव,** अकोला

### विकास आयुक्त कार्यालयाच्या माहितीनुसार अभ्यासात असलेले मुद्दे

- प्लास्टिक पुनर्वापर उद्योगांना प्रोत्साहनपर सबसिडी योजना
- यंत्रसामग्री खरेदीवरील करसवलती
- ऊर्जा वापरावरील शुल्क सवलत
- उद्योग नोंदणी व उद्य सर्टिफिकेट प्रक्रियेत वेग
- जिल्हास्तरीय समित्यांमार्फत पारदर्शक निधी वितरण
- स्थानिक स्वराज्य संस्थांना पुनर्वापर उत्पादने खरेदीस प्रोत्साहन

# आमरण उपोषणातील तिघांची प्रकृती खालावली; एक रुग्णालयात भरती

### पाचव्या दिवशी आमदार साजिद खान पठाण यांची उपोषण मंडपाला भेट



■ प्रतिनिधी | अकोला ■

ओबीसी आरक्षणावर अन्याय होत असल्याच्या निषेधार्थ अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाचवा दिवस असून तिघा उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. यामध्ये उपोषणकर्ते राजेश माणिकराव ढोमणे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून जनार्दन हिरळकर व शंकर बापूराव पारेकर यांनी औषधोपचार घेण्यास नकार दिल्याने समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सोमवार, १५ सप्टेंबरपासून ओबीसी समाजाच्या वतीने जनार्दन हिरळकर, शंकर बापूराव पारेकर, पुष्पाताई गुलवाडे, राजेश माणिकराव ढोमणे आणि अ‍ॅड. भाऊसाहेब विठ्ठलराव मेडशिकर यांनी आमरण उपोषणाला प्रारंभ केला होता. मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्यासाठी हैद्राबाद गॅझेटियर लागू करण्यात आल्याचा आरोप करत हे उपोषण सुरू झाले असून, हा प्रकार ओबीसी समाजावर अन्याय करणारा असल्याचा उपोषणकर्त्यांचा आरोप आहे.

आज पाचव्या दिवशी आमदार साजिद खान पठाण यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन उपोषणकर्त्यांची प्रकृती विचारली. दरम्यान, अनेक संघटना व सामाजिक नेत्यांनी या आंदोलनाला भेट देऊन समर्थन दर्शविले. ओबीसी समाजाच्या विविध जातींना न्याय मिळावा यासाठी हे उपोषण सुरु असून, जिल्हास्तरावरून ते राज्य सरकारपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गुरुवारी अकोला जिल्हा सकल ओबीसी समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना उपोषणाच्या समर्थनार्थ निवेदन सादर करण्यात आले. यावेळी माजी आमदार हरिदास भदे, माजी आमदार बळीराम सिरस्कार, माजी आमदार नारायण गव्हाणकर, प्रा. डॉ. संतोष हुशे, विजय कौशल, अमोल पाथरकार, आत्मराम म्हात्रे, परशराम बंड, श्रीकांत ढगेकर, संतोष सरोदे, गोविंद इंगोले, सुभाष सातव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# खेट्री शाळेत शिक्षकांची कमतरता

### नियुक्ती न झाल्यास शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत रिक्त असलेल्या दोन शिक्षकांची तात्काळ नियुक्ती करावी, अन्यथा शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा पालक व शाळा समितीने दिला आहे.

१७ सप्टेंबर रोजी शाळा समिती अध्यक्ष राष्ट्रपाल तिडके यांच्या नेतृत्वाखाली पालक व सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी तसेच पातूर गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर केले.

नुकत्याच झालेल्या शिक्षकांच्या बदल्यांमध्ये खेट्री शाळेतील दोन शिक्षक कमी मिळाल्याने वर्ग १ ते ७ पर्यंत केवळ तीनच शिक्षक कार्यरत आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे पालकांनी नमूद केले. या निवेदनावर शाळा समिती सदस्य कल्पना अडकणे, विजया तिडके, रामा जाधव, दिपाली पदमने, छाया मेसरे, स्वाती पजई, रेखा मोकळकार, सुरेश लांडे, दिगंबर ताले, ग्रामपंचायत सदस्य माधुरी लांडे आदींसह पालक संदीप लांडे, संकेत गावंडे, गोपाल लांडे, गजानन ताले, योगेश ताले, सिद्धार्थ तिडके, सचिन डहाळे, केशव झोडपे, नारायण कांबळे, रामा डोलारे, किशोर शेलार, सागर वानखडे, संदीप वानखडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. पालक व शाळा समितीने स्पष्ट केले की, शिक्षकांची तात्काळ नियुक्ती न झाल्यास शाळेला कुलूप ठोकून आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल.

# अखेर त्या ठेकेदारावर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

### पत्रकाराला गंभीर धमक्या, अश्लील शिवीगाळ प्रकरणाचा तपास आयपीएस अधिकाऱ्याकडे



■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

प्रामाणिकपणे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकाराला वारंवार गंभीर धमक्या देणे व अश्लील शिवीगाळ करण्याच्या प्रकरणी हिवरखेड येथील मुजोर ठेकेदार राजेश देशमुख याच्यावर अखेर पत्रकार संरक्षण कायद्यासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास आता थेट आयपीएस अधिकारी निखिल पाटील करणार असल्याचे समजते. अकोट-तेल्हारा उपविभागात व हिवरखेड पोलीस ठाण्याअंतर्गत पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत दाखल झालेला हा पहिलाच गुन्हा असल्याची चर्चा आहे.

माहितीनुसार, अकोट–हिवरखेड–जळगाव जामोद राज्य मार्गावर देशमुख याने दोन पुलांचे काम हाती घेतले होते. परंतु दिलेल्या मुदतीत काम पूर्ण केले नाही. मुदतवाढ मिळूनही पुलाचे काम वेळेत न झाल्याने प्रवाशांना प्रचंड हाल सोसावे लागत होते. याबाबत प्रामाणिकपणे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकाराने पुलाच्या साईटवर जाऊन छायाचित्रे व व्हिडिओ घेण्याचा प्रयत्न केला असता, ठेकेदाराने संतापून त्याला 'हातपाय तोडून टाकीन, कुटुंबासह जिवे मारून टाकीन, खोट्या गुन्ह्यात अडकवीन' अशा गंभीर धमक्या दिल्या. त्याचप्रमाणे फोनवर व प्रत्यक्ष अनेक वेळा शिवीगाळ करून पत्रकार आणि त्याच्या कुटुंबियांमध्ये दहशत निर्माण केली.

या पार्श्वभूमीवर पत्रकाराने हिवरखेड पोलिसांत तक्रार नोंदवली. त्यानुसार ठेकेदार राजेश देशमुख याच्यावर भा.दं.वि. कलम २९६, कलम ३५१(२) व ३५१(३) ॅए तसेच महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी प्रतिबंध) अधिनियम २०१७ मधील कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हे दाखल झाले आहेत.

या गुन्ह्याचा तपास आयपीएस अधिकारी निखिल पाटील स्वतः करीत असून, त्यांनी नुकतीच हिवरखेड येथे भेट देऊन प्रकरणाचे गांभीर्य जाणून घेतले. तपास कार्यात हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड, पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, श्रीराम जाधव आदी अधिकारी व पोलीस कर्मचारी सहकार्य करीत आहेत.

# सिंचन विहिरीतील कामात भ्रष्टाचार; चौकशीची मागणी



### संदीप पाटील यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांचे पालकमंत्री ना. फुंडकर यांना निवेदन

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतून होत असलेल्या सिंचन विहिरींच्या कामामध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांना निवेदन सादर केले. हे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसचे अकोला लोकसभा समन्वयक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, रोजगार हमी योजनेतून सुरू असलेल्या सिंचन विहिरींच्या कामामध्ये संबंधित अधिकारी काही दलालांच्या संगनमताने शेतकऱ्यांची आर्थिक लूट करत आहेत. दलालांच्या आर्थिक मागण्या पूर्ण न झाल्यास शेतकऱ्यांना विनाकारण त्रास दिला जातो, अशी तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देताना राजेश नळकांडे, मुरलीधर फुरंगे, अवचित नळकांडे, शुभम ढाकरे, अमोल नळकांडे, दादाराव पांडे, भाऊराव हिवराळे, गणेश इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# मूर्तिजापूर शहरातील अपार्टमेंट्सची सहकार निबंधक कार्यालयात नोंद नाही

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरातील कोणत्याही अपार्टमेंटची सहकार निबंधक कार्यालयामध्ये नोंद नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट अ‍ॅक्ट (मोफा) १९६३ च्या कलम १० आणि १९६४ च्या कलम ८ नुसार, फ्लॅटचा ताबा घेतल्यापासून चार महिन्यांच्या आत सोसायटी नोंदणीचा अर्ज करणे बंधनकारक आहे. मात्र, वास्तवात या तरतुदींकडे बिल्डर्स आणि फ्लॅटधारकांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

राज्यात एक कोटीपेक्षा जास्त गृहनिर्माण सोसायट्या अस्तित्वात असून त्यामध्ये राहणारे कुटुंब या कायद्याबाबत अनभिज्ञ असल्याचा फायदा बांधकाम व्यावसायिक घेत आहेत. मूर्तिजापूर तालुक्यात अनेक गृहनिर्माण संस्था असूनही, एखाद्या अपार्टमेंटची सोसायटी म्हणून नोंदणी झाली आहे; उर्वरित अपार्टमेंट्सची नोंदणी झालेली नाही. शासनाने यापूर्वी मान्य अभिहस्तांतरणासाठी विशेष मोहीम राबवली होती, मात्र बिल्डर्स व फ्लॅट ओनर्स यांनी या मोहिमेकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे बिल्डर्सकडून होणारी फसवणूक आणि फ्लॅटधारकांच्या समस्यांकडे लक्ष देण्यासाठी सरकारने सहकार विभागामार्फत समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत सोसायटी स्थापनेसाठी पुढाकार घेण्याचे आदेश सहकार निबंध कार्यालयाने देणे आवश्यक आहे. कायद्यानुसार, बिल्डरने सोसायटी नोंदणी केली नाही तरी संबंधित इमारतीतील किमान ६० टक्के गाळेधारक एकत्र येऊन गृहनिर्माण सोसायटी स्थापन करू शकतात. याकरिता फ्लॅटधारकांनी तालुका सहकारी निबंध कार्यालयाशी संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रे बिल्डरकडून उपलब्ध न झाल्यास, केवळ करारनाम्याची प्रत दाखल करूनही सोसायटी नोंदणी होऊ शकते.


## अल्पसंख्यांक मुलींच्या वसतीगृह प्रवेशाबाबत सुचना

अकोला जिल्हयातील अल्पसंख्यांक समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अल्पसंख्यांक वसतीगृह योजनेअंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे मुलींचे वसतीगृहात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरजु व पात्र मुलींकडुन वसतीगृह प्रवेशाकरीता आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत. सदर आवेदनपत्राचा नमुना तसेच वसतीगृहात प्रवेशाबाबतच्या इतर माहिती व सुचना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला चे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी वेबसाईट वरुन आवेदनपत्राचा नमुना डाउनलोड करुन त्यातील संपुर्ण माहिती भरुन आवश्यक कागदपत्रासह अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी) कृषि अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे दि. २९.०९.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हस्तपोच अथवा पोस्टाने पाठवावेत. पोस्टने पाठविलेले आवेदनपत्र उशीरा मिळाल्यास प्रवेश गृहीत धरण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी आवेदकाची राहील.

**आदेशान्वये**
**अधिष्ठाता**
कृषि अभियांत्रिकी विद्याशाखा
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

विमाका/अम/जाही/४८०/२०२५-२०२६



**Civil Judge Sr.Dn. Akola**
**IN THE COURT OF Shri S.A. Mulik**
**9th Jt Civil Judge Sr.Dn. Akola, Akola, Akola.**

SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES
(0.5, R. 1, 5.)

Spl.C.S./133/2025
Vaishali Nitesh Khandare And 2 Vs Vandana Kamal Pande
NEXT DATE: 23-09-2025

To,
**Vandana Kamal Pande,** R/o. Shriram Tower, Geeta Nagar, Akola, Tq. Dist. Akola., AKOLA, MAHARASHTRA

Whereas **Vaishali Nitesh Khandare And 2** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 23-09-2025 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set- off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court; this 04-09-2025

**Asstt. Supdt.**
Civil Judge
9th Jt Civil Judge Sr.Dn. Akola



**APPENDIX IV**
**[Rule 8 (1)]**
**POSSESSION NOTICE**
**(For Immovable Property)**

Whereas

The undersigned being the authorized officer of the Sanmitra Urban Co-op Bank Ltd., Akola, under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest (Second) Ordinance, 2002 (Ord.3 of 2002) and in exercise of powers conferred under section 13 (12) read with rule 9 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issue demand notice dated 10/07/2025 calling upon the borrower/surety Naresh Premsingh Rathod and Savita Premsingh Rathod R/o. Bhagyashri Nagar, Gudadhi Tq. & Dist. Akola in L.A.I.P. Account No. 179/3000041 Rs. 17,41,784/- to repay the amount mentioned in the notice being within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrowers/surety having failed to repay the amount, notice is hereby given to the borrowers/ surety and the public in general that the undersigned has taken symbolic possession of the property described herein below in exercise of powers conferred on him/her under section 13(4) of the said Ordinance read with rule 9 of the said Rules on this 15th day of September of the year 2025.

The borrowers in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the Sanmitra Urban Co-operative Bank Ltd., Akola. for an amount Rs. 17,41,784/ along with interest thereon from dt. 30/06/2025.

**DESCRIPTION OF THE IMMOVABLE PROPERTY**

The property situated at Mouje - Gudadhi, Akola, Tq. & Dist. Akola within the jurisdiction of Sub-Registrar Office, Akola, bearing Field Survey No. 66/2 & Gat No. 83/1 converted into non-agriculture purpose vide in rev. case no. NAP/34/Gudadhi/56/2004-2005 D.O. 05/12/2005 on the file of S.D.O. Akola, in which Layout Plot No. 32 admeasuring 150.00 Sq. Mtr. [ 1614 Sq. Ft.] on its constructed scheme under the name and style of "ANAND VIHAR 2" in which Flat No. 101 on First Floor built up area 664 Sq. Ft.[61.71 Sq. Mtr.] along with undivided share in land 16.06% i.e. 259.11 Sq. Ft. which is bounded as under.

Towards the East : Layout Road, Towards the West : Flat No. 102, Towards the North : Plot No. 31, Towards the South : Plot No. 33

Akola
Date 15/09/2025

**Authorized Officer**
Sanmitra Urban Co-op Bank Ltd, Akola



**जाहीर नोटीस**

**०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३२/२०२५ — प्रोसेस नं. १४५६७/२०२५
चौ.ता. ०६/१०/२०२५ — दिनांक : ३०/०८/२०२५

**अर्जदार :** १. कैलास अंबादास तायडे २. यमुनाबाई दत्त गायकवाड अर्जदार क. १ व २ रा. सिद्धार्थ नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अंबादास पन्नु तायडे
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अंबादास पन्नु तायडे यांचे दि. १३/०७/२०१६ रोजी मोठी उमरी, अकोला ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०६/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०३/२०२५ — प्रोसेस नं. १९७९/२०२५
चौ.ता. १५/०३/२०२५ — दिनांक : ०३/०२/२०२५

**अर्जदार :** (१) मनिषा कैलास बोयनुस्कर, (२) आर्या कैलास बोयनूरकर, अ. पा अर्जदार क्र. २ करीता आई दोघेही रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, ता. जि. अकोला,

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलास बालचंद्र बोयनूरकर,
**पत्ता :-** रा. शेलार फैल, देशमुख फल, अकोला, ता. जि. अकोला. ह. मु. विठ्ठल नगर, मोठी उमरी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार ह्यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, कैलास बालचंद्र बोयनूरकर यांचे दि. १४/०१/२०२४ रोजी शेलार फैल देशमुख फैल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारानी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिन्ज्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २९२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# आंदोलनाचा ज्वालामुखी उसळेल शेतकऱ्यांचा सवाल टाळता येणार नाही-टिकैत

**वर्धा/जनमाध्यम**

देशाला अन्नधान्य देणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी सुरू केले आहे. जमिनींचे भाव आभाळाला भिडले, पण शेतमालांचे दर मात्र तळाला गेले. शेतकऱ्यांचा घाम पुसायचा सोडाच, त्यांचे अस्तित्वच संपवून मजुरांचा देश तयार करण्याचा बेत आखला गेला आहे. दिल्लीच्या गादीवर बसलेल्यांना केवळ भांडवलदारांचे सुख महत्त्वाचे वाटते. अशा राक्षसी नीतीचा एकमेव इलाज म्हणजे आंदोलनाचा ज्वालामुखी, असे घणाघाती उद्गार शेतकरी नेते




राकेश टिकैत यांनी वर्ध्यातील शेतकरी न्याय हक्क परिषदेत काढले.

**भांडवलशाहीचा फास**

बियाण्यापासून पाणीपर्यंत खाजगी कंपन्यांचे वर्चस्व बसवले गेले. शिक्षणाचे खाजगीकरण करून सामान्य जनतेला अज्ञानाच्या खाईत ढकलले जात आहे. एमएसपीची कायदेशीर हमी देण्याची सत्ता नाकारणारी सरकारे स्वतःची दलाली कंपन्यांच्या खांद्यावर टाकून बसली आहेत. हा फास शेतकऱ्यांच्या गळ्यात आहे आणि सरकार त्याचा दोर घट्ट ओढत आहे.


धर्माच्या नावाने विषारी खेळ

आज देशात धर्माच्या नावाने कलह पेटवला जात आहे. हिंदू-मुस्लिमांत भांडणे लावून, ओबीसी-एससीमध्ये फूट पाडून सत्तेचा ईंधन भरले जात आहे. अगदी शेतकरी आंदोलन नावाच्या पर्वतातही तडा देण्याचे षड्यंत्र रचले गेले, पण शेतकऱ्यांचा आत्मा अजून जिवंत आहे.

**लढ्याची हाक**

सरकारची नीती शेतकऱ्यांच्या जमिनी भांडवलदाराच्या तिजोरीत घालण्याची आहे. चर्चा, बैठक, निवेदने या खेळण्यांनी काही होणार नाही. आता आंदोलनाचा भडका उडालाच पाहिजे' असा स्फोटक इशारा टिकैत यांनी दिला. त्यांनी दर महिन्याला शेतकरी दिवस साजरा करण्याचा निश्चय व्यक्त करत, पत्र-निवेदनांचा मारा आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे रस्त्यावर उतरून सत्ता हादरवण्याचा मार्गच शिल्लक असल्याचे ठासून सांगितले. शेतकरी महासंग्रामाची चाहूल या परिषदेत पंजाब, हरियाणा, केरळ ते महाराष्ट्रापर्यंतच्या शेतकरी नेत्यांची हजेरी होती. विजय जावंधीया, डॉ. अजित नवले, डॉ. अशोक ढवळे यांच्यासह असंख्य कणखर आवाज मंचावरून घुमले.

## चाहूल नवरात्रौत्सवाची...



२२ सप्टेंबरला घटस्थापना देवी येतेय घरोघरी!मूर्तिकारांचे हात वेगाला लागले, मातीच्या मूर्तींना गावोगावी भारी मागणी.नवरात्रोत्सवाच्या स्वागताला भक्तांची लगबग सुरूच जय माता दी!

### 'स्वस्थ नारी सशक्त परिवार'अभियानातून

# आरोग्य सेवा गावांपर्यंत पोहोचणार-पालकमंत्री

**वर्धा/जनमाध्यम**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसानिमित्त देशभर जनकल्याणाचे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नरेंद्र मोदी यांनी देशाचे प्रधानमंत्री म्हणून सुरुवात केल्यानंतर देशात लोककल्याणकारी अनेक योजना सुरु करण्यात आल्या. 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' या योजनेतून आरोग्य सेवा, सुविधा गावे आणि गावातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचणार असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देशभर 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियान सुरु करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य



अधिकारी डॉ.स्वप्नील बेले आदी उपस्थित होते.गेल्या अकरा वर्षात केवळ योजनाच सुरु झाल्या नाही तर या योजनांची प्रभावी अंमलबजावणी देखील करण्यात आली. यातील अनेक योजना महिलांसाठी उपयुक्त ठरल्या आहे. महिला सशक्तीकरणाची चळवळ देशभर मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. केवळ शहरातच नाही तर ग्रामीण भागात देखील महिला खंबीरपणे आपल्या पायावर उभ्या झाल्या असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले.स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान जिल्ह्यात प्रभाविपणे राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३२ प्राथमिक आरोग्य केंद्र, १८३ आरोग्य उपकेंद्राच्या माध्यमातून आरोग्य सेवा गावकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येतील. गावपातळीवर विविध प्रकारची आरोग्य शिबिरे घेतली जाणार आहे. याचा ग्रामीण, शहरी भागातील नागरिकांना फायदा होईल. केंद्र शासनाने प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजना सुरु केली आहे. या योजनेतून विनामूल्य सर्व प्रकारचे उपचार, शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे पुढे बोलतांना पालकमंत्री म्हणाले. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, रुग्णांना दिलासा देण्यासाठी मोतीबिंदू विरहित वर्धा अभियान आपण राबविले. या अभियानाच्या तालुकास्तरावर आयोजित शिबिरांतून डोळ्याच्या आजारांसह इतरही आजारांची तपासणी करण्यात आली. ३२ हजारांवर नागरिकांना शिबिराचा लाभ झाला. यात मोतीबिंदू आढळून आलेल्या ४ हजार रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जात आहे. आतापर्यंत १ हजार २३५ रुग्णांवर शस्त्रक्रिया देखील करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ यांनी केले. स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाच्या अंमल बजावणीची माहिती त्यांनी यावेळी दिली. सदर अभियान १७ सप्टेंबर पासून २ ऑक्टोंबर पर्यंत राबविण्यात येत आहे.

अभियानांतर्गत प्रत्येक गाव तसेच प्रत्येक आरोग्य संस्थेत विविध प्रकारची आरोग्य शिबिरे, तपासण्यांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्र मास सर्व आरोग्य अधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोगस शालार्थ आयडी घोटाळा

### वर्धेतील ३१८ शाळांचे प्रस्ताव डिजिटलाईजसाठी सादर

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात गाजत असलेल्या बोगस शालार्थ आयडी प्रकरणात वर्धा जिल्ह्यातील तपासणी प्रक्रिया वेग घेऊ लागली आहे. जिल्ह्यातील तब्बल ३१८ शाळांचे प्रस्ताव वेतन पथकाकडे प्राप्त झाले असून या शाळांतील ३०५८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मूळ कागदपत्रे डिजिटलाईज प्रक्रियेतून तपासली जाणार आहेत. डिजिटलाईजेशनमुळे जिल्ह्यात बोगस शालार्थ आयडी तयार झालेत का याची स्पष्ट माहिती विभागाला मिळणार आहे.

संशयितांवर चौकशी सुरू-शालार्थ आयडी घोटाळ्यावर गठीत करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडून (एघ्ऊ) राज्यभरात कारवाई सुरू आहे. यामध्ये संशयित म्हणून अडकलेल्या एकूण ६३२ शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालकांची सुनावणी १६ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे.

पडताळणीची प्रक्रिया-वेतन




पथकाकडे प्राप्त झालेले प्रस्ताव पुढील तीन टप्प्यांतून तपासले जाणार आहेत,प्रथम टप्प्यात शाळास्तरावर मुख्याध्यापकांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मूळ कागदपत्रे जमा करून प्रस्ताव तयार केले आहेत.दुसऱ्या टप्प्यात वेतन पथकातील अधिकारी कागदपत्रांची छाननी करीत आहेत.तिसऱ्या टप्प्यात शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून अंतिम पडताळणी केली जाणार आहे.

तांत्रिक अडथळे-शिक्षणाधिकारी स्तरावरील युजर-आयडी व पासवर्ड अद्याप उपलब्ध न झाल्याने ऑनलाईन तपासणीची प्रक्रिया पूर्ण क्षमतेने सुरू होऊ शकलेली नाही. तथापि, काही फाईलांची तपासणी ऑफलाईन पद्धतीने करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

आदेशांविषयी प्रश्नचिन्ह-या प्रक्रियेसाठी काही अधिकारी कामाला लागले असले तरी त्यांना शिक्षणाधिकाऱ्यांकडून औपचारिक लेखी आदेश देण्यात आलेले नसल्याचे समजते. दरम्यान, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जयश्री राऊत यांच्याकडे अमरावती विभागाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने समन्वयात काही अडचणी येत असल्याचे सांगण्यात येते. संबंधित प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत २० सप्टेंबर आहे.

त्यानंतर सर्व कागदपत्रे डिजिटलाईज करून एकत्रित पडताळणी होणार असून यातून जिल्ह्यात बोगस शालार्थ आयडी आढळल्यास त्यावरील पुढील कारवाईस गती मिळेल, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

## संशयितास अटक

**देवळी** -अंधारात चोरीच्या उद्देशाने लपून असलेल्या युवकास पोलिसांनी अटक केली. ही कारवाई स्थानिक अशपाक कॅन्टीग परिसरात करण्यात आली. संघर्ष गाडगे रा. आंबेडकरनगर असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याला अंधारात लपून बसल्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. पोलिसांनी त्याला अटक करून गुन्हा नोंद केला आहे.

## निखिल कवरे यांचे निधन



**विरुळ-** निखिल निळकंठ कवरे (वय ३०) यांचे अल्पशा आजाराने सेवाग्राम रूग्णालयात निधन झाले. निखिल हे स्थानिक ग्रामपंचायत सदस्य मंदाताई कवरे यांचे पुत्र होते. त्यांच्या निधनाने परिसरात मोठा हळहळ व्यक्त केली जात आहे.निखिल यांच्या मागे एक मोठा आप्त परिवार आहे. स्थानिक मोक्षधामवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जिल्ह्यातील सहा न. प.व चार न.पं. नमो उद्याण योजनेत समावेश

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य शासनाच्या नगराविकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या नमो उद्याण योजनेत वर्धा जिल्ह्यातील सहा नगर परिषद व चार नगर पंचायतांचा समावेश करण्यात आला आहे. या अंतर्गत प्रत्येक शहरात उद्यान निर्मितीसाठी राज्य सरकारकडून १ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती वर्धा-भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

या योजनेत वर्धा व हिंगणघाट (अ वर्ग), आर्वी (ब वर्ग), पुलगाव, देवळी, सिंदी रेलवे (क वर्ग) या नगर परिषदांसह समुद्रपूर, सेलू, कारंजा व आष्टी या नगर पंचायतांचा समावेश आहे.योजनेअंतर्गत विकसित होणाऱ्या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार असून, प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या नप/नपं ला ५ कोटी, द्वितीय क्रमांकांना ३ कोटी तर तृतीय क्रमांकांना २ कोटींची अतिरिक्त मदत मिळणार आहे.नगर परिषद व नगर पंचायतांच्या मर्यादेत अनेक ठिकाणी उद्यानांसाठी जागा असूनही निधीअभावी विकास ठप्प होता. मात्र नमो उद्याण योजनेमुळे आता नागरिकांना सुंदर, आकर्षक आणि सुविधा-संपन्न उद्यानांचा लाभ मिळणार आहे.यात बालकांसाठी खेळण्यांची साधने, ज्येष्ठांसाठी व्यायाम व फिरण्यासाठी मार्ग तसेच सर्वसामान्यांसाठी उपयुक्त सुविधा उपलब्ध असणार आहेत.प्रत्येक क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार कटिबद्ध असून, नमो उद्याण योजना ही त्याचाच एक भाग असल्याचे डॉ. पंकज भोयर यांनी नमूद केले.

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात


# तीन दिवसीय खरीप शिवार फेरा

**वर्धा/अकोला/जनमाध्यम**

जागतिक हवामान बदल आणि व्यावसायिक स्पर्धेच्या या युगात शेतकऱ्यांनी अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान, कृषीमाल प्रक्रिया आणि मार्केटिंगची दिशा आत्मसात करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या वतीने कृषी विभाग महाराष्ट्र शासन व संलग्न संस्थांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय खरीप शिवार फेरीचे आयोजन २०, २१ व २२ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांसाठी खुले शिवार**

या फेरीदरम्यान



विद्यापीठाचे संपूर्ण संशोधन प्रक्षेत्र शेतकरी बांधवांसाठी खुले ठेवण्यात येणार आहे. प्रगत तंत्रज्ञानासह पीकनिहाय आणि तंत्रज्ञाननिहाय माहिती देण्यासाठी संशोधक शास्त्रज्ञ उपस्थित राहणार असून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात येणार आहे.

या शिवार फेरीत सूर्यफूल, भुईमूग, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी, मका, कुटकी, राळं अशा पिकांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना पाहायला मिळणार आहे. याशिवाय आंबा, संत्रा, मोसंबी, लिंबू, ड्रॅगन फ्रूट, पेरू, अंजीर, जांभूळ, सीताफळ अशा फळपिकांसह वांगी, कांदा, लसूण, हळद यांसारख्या भाजीपाला पिकांचेही अत्याधुनिक तंत्रज्ञान दाखविण्यात येणार आहे. गुलाब, शेवंती, निशिगंधा यांसारख्या फुलपिकांची विभागवार माहिती उपलब्ध असेल.

जातिवंत गोवंश संवर्धन, आधुनिक गोठा पद्धती, चारा पिके, व्यावसायिक शेळीपालन, कुक्कुटपालन, रेशीम शेती, सुगंधी व औषधी वनस्पतींचे उद्यान, तसेच गांडूळखत व सेंद्रिय शेतीचे प्रकल्प हे या फेरीचे खास आकर्षण असणार आहे.

गहू संशोधन विभागाच्या २० एकर प्रक्षेत्रावर ३०० हून अधिक जिवंत प्रात्यक्षिके उभारण्यात आली आहेत. विविध विद्यापीठे व खाजगी संस्थांनी विकसित केलेल्या आधुनिक वाणांसह नवी लागवड तंत्रे एकाच छताखाली शेतकऱ्यांना पाहता येणार आहेत.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कुलगुरू डॉ. शरद गडाख, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदीरवाडे, संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने, तसेच कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तयारी सुरू आहे.

## हिंगणघाट नगरपरिषदेला नवी शववाहिका सुपूर्द

### आ.समीर कुणावार यांच्या प्रयत्नांना यश



**हिंगणघाट/जनमाध्यम**

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे अंत्य संस्काराच्या वेळी मृतदेह वाहतुकीची वाढती गरज लक्षात घेऊन हिंगणघाटकरांसाठी आणखी एक नवी शववाहिका उपलब्ध झाली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ही शववाहिका जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते नगरपरिषदेला सुपूर्द करण्यात आली.या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. नवीन शववाहिका उपलब्ध झाल्याने अंत्य संस्काराच्या प्रवासात अडचणी टळून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे नागरिकांनी नमूद केले.या उपयुक्त सेवेसाठी आमदार समीर कुणावार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आभार मानले. नगर परिषदेतर्फे ही शववाहिका आता कायम स्वरूपी नागरि कांच्या सेवेसाठी उपलब्ध राहणार असून वाढत्या लोक संख्येच्या पार्श्वभू मीवर ही सुविधा नागरिकांसाठी दिलासादायी ठरणार आहे.

# पावसाला थांबण्यासाठी शेतकऱ्यांचे देवाला साकडे

### परिसरात सततच्या पावसामुळे तूर-कपाशी पिके धोक्यात, मदत व सर्वेक्षणाची प्रतीक्षा

**साहूर/जनमाध्यम**

परिसरात मागील महिन्याभरापासून सुरू असलेल्या सततच्या व मुसळधार पावसामुळे तूर, कपाशी तसेच सोयाबीन पिके मोठ्या संकटात सापडली आहेत. ऐन दिवाळी जवळ येत असताना पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव होऊन हिरवीगार पिके लाल-पिवळसर पडली आहेत. त्यामुळे यावर्षीही शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

जून महिन्यातील पेरणीच्या वेळी दुष्काळी स्थिती असल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकट ओढवले होते. त्यावेळी पावसासाठी देवाला साकडे घालणारे शेतकरी आता अतिरेकी पावसामुळे पिके वाचविण्यासाठी आणि पाऊस थांबावा म्हणून देवाला साकडे घालण्याची वेळ आली आहे.ऑगस्टच्या ११-१२ तारखेपासून परिसरात सुरू झालेल्या पावसाचा जोर



अजूनही कमी झालेला नाही. रुद्रापूर व जामगाव शिवार पूर्णपणे पाण्याखाली असल्याने शेतांना तळी पडल्याचे स्वरूप आले आहे. पिकांवर मर रोगासह इतर आजारांचा प्रादुर्भाव झाल्याने तूर व कपाशी पिके वाळू लागली आहेत.दरम्यान, आतापर्यंत प्रशासनाने कोणताही सर्वेक्षण केलेले नाही वा मदत जाहीर केलेली नाही. शेतकरी ई-पीक पेरा नोंदणीमध्येही अडकले आहेत. अनेकांकडे अँड्रॉइड मोबाईल नसल्याने किंवा तांत्रिक ज्ञानाचा अभाव असल्याने पीक नोंदणी होत नसून शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीप्रमाणे ऑफलाइन नोंदणी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे प्रमुख स्रोत असलेली कपाशी पिके अति पावसामुळे नष्ट होत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक भिस्त ढासळली आहे. परिणामी यंदाची दिवाळीही शेतकऱ्यांसाठी अधिक अंधारात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष -१३ अंक २९२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ऑनलाइन सोफा विक्रीत तरुणाची फसवणुक

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर सोफा विक्रीसाठी जाहिरात देणे, वरुड येथील एका तरुणाला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने बोलण्यात गुंगवून त्याच्याकडून तब्बल ८ हजार ३०० रुपये उकळले. याप्रकरणी जय चंद्रशेखर गणोरकर (वय २२, रा. अष्टविनायक सभागृह परिसर, वरुड) यांनी वरुड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे.

तक्रारीनुसार, जय गणोरकर यांनी ओएलएक्सवर सोफा विक्रीसाठी खाते तयार केले होते. त्यावरून एका अज्ञात व्यक्तीने संपर्क साधत सोफा ३५ हजार रुपयांना खरेदी करण्याचे मान्य केले. व्यवहारासाठी त्या व्यक्तीने जयला प्रथम १ रुपया ऑनलाइन पाठविण्याची अट घातली. जयने ते पैसे पाठवल्यानंतर आरोपीने तत्काळ ते परत पाठवले. यानंतर 'स्वाइप कार्ड प्रक्रियेनुसार पैसे पाठवावे लागतील' असे सांगत आरोपीने जयकडून प्रथम २,३०० रुपये व नंतर आणखी ६ हजार रुपये पाठवून घेतले. मात्र हे पैसे परत न केल्याने जयला फसवणुकीचा संशय आला व त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# ब्रिजलाल बियाणी सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांची कृष्णा डिजिटल लॅबला सदिच्छा भेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा NEP को - कोरीकोलम(CC) च्या माध्यमातून अमरावती येथील ब्रिजलाल बियाणी सायन्स कॉलेज येथील फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी याचे प्रशिक्षण कॉलेजमध्ये सुरू आहे. यामध्ये या विषयाचे प्रशिक्षक उदय चाकोते यांच्या माध्यमातून फोटोग्राफी विषयी वेगवेगळे विषय शिकवल्या जाते.




प्राचार्य दीपक धोटे यांचे अध्यक्षतेखाली प्राध्यापक श्यामला कटके मॅडम यांचे मार्गदर्शनात यांचे माध्यमातून वेडिंग फोटोग्राफी, बर्थडे फोटोग्राफी, ऑफिशियल फोटोग्राफी, मॉडलिंग फोटोग्राफी, किड्स फोटोग्राफी, नेचर फोटोग्राफी, किड्स फोटोग्राफी, शासकीय फोटोग्राफी या सोबतच स्टुडिओ विषयी व नवीन टेक्नॉलॉजी फोटोग्राफी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रॅक्टिकल करून घेण्यात येत आहे. यातलाच एक भाग म्हणून अमरावती शहरातील सुप्रसिद्ध कृष्णा डिजिटल लॅब येथे नुकतीच सदिच्छा भेट देण्यात आली.

यामध्ये कॅमेरा, मोबाईल यामधून काढलेले फोटो प्रिंट कसे करायचे या संदर्भात शिकविण्यात आले. या सदिच्छा भेटीदरम्यान कृष्णा डिजिटल लॅब चे संचालक जय केचे यांचा सर्व विद्यार्थ्यांकडून पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व एक सामूहिक ग्रुप फोटो सुद्धा काढण्यात आला.

जय केचे यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांना ग्रुप फोटोच्या प्रिंट निशुल्क देण्यात आल्या. या सदिच्छा भेटीमध्ये मानसी कोचलकर, जानवी यादव, मनस्वी देशमुख, अलिना फातिमा, धनश्री खंडेलवाल, महक बत्रा, पलक कवना, अपेक्षा मेश्राम, जानवी ढवळे, सिद्धी पुणेवार, साक्षी ढाकुलवार, एकता साहू, पूजा राऊत, अनुश्री खंडेलवाल, सायमा खान, समृद्धी लिंगतकर, गौरी तिडके, मोनल राजोरे, तेजस्विनी डरोली, ज्ञानेश्वरी मुंडे, स्नेहल बोबडे, अश्विनी इंगळे, जानवी धवड, समृद्धी कडू, श्वेता वसु, खुशी निंभोरकर हे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कुमारी मोनल राजोरे, जानवी ढवळे, गावा तिडके यांनी यांनी आभार प्रदर्शन केले.

---

## जाहीरनामा

**श्रीमती रोहिणी वि. मनोरे, दिवाणी न्यायाधिश (क.स्तर.) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी.क्र.१६७/२०२५ — ने.ता.१८.०८.२०२५

अर्जदार -
१. **पुंडलिक नामदेवराव कांडलकर,** वय ७१ वर्षे, धंदा - शेती, रा.गुरुकुंज नगर, मोझरी, ता.तिवसा,जि.अमरावती
२. **शारदा दत्तदास खेरडे,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम, रा.व-हा, ता.तिवसा, जि.अमरावती
३. **सुनिता गणेश कांडलकर,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम, रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
४. **अंकुश गणेशराव कांडलकर,** वय ३३ वर्षे, धंदा - मजुरी, रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. **अक्षय गणेश कांडलकर,** वय ३१ वर्षे, धंदा - मजुरी, रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निल

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **पुंडलिक नामदेवराव कांडलकर व इतर** यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तिवसा यांचे न्यायालयात कायदेशिर वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **नामदेव बलीरामजी कांडलकर** यांचा मृत्यू दिनांक **२८/११/२००५** रोजी तिवसा मुक्कामी अमरावती येथे राहते घरी झालेला आहे. **वत्सलाबाई नामदेवराव कांडलकर** यांचा मृत्यू दिनांक **२१/०३/२०१३** रोजी झालेला आहे. गणेशराव नामदेवराव कांडलकर यांचा मृत्यू दिनांक ०८/०५/२०२१ रोजी मोर्शी येथे झालेला आहे. धनराज नामदेवराव कांडलकर यांचा मृत्यू दिनांक १८/०७/२०१५ रोजी झालेला आहे.अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदहू **नामदेव बलीरामजी कांडलकर व वत्सलाबाई नामदेवराव कांडलकर** मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **१७ माहे जुलै २०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार,
**प्र. सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, तिवसा

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.५८५/२०२५ — ने.ता.०३.११.२०२५

अर्जदार :
१. **नंदकिशोर दयाराम निमकर,** वय ६४ वर्षे, धंदा - शेती
२. **अनिल दयाराम निमकर,** वय ६२ वर्षे, धंदा - शेती
अर्जदार क्र.१ रा.जामोद, ता.जळगाव, जि.बुलढाणा
अर्जदार क्र.२ रा.देउरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार :
१. **विलास दयारामजी निमकर,** वय ७० वर्षे, धंदा - शेती, रा.देउरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. **सुनंदा मधुकरराव साठे,** वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम, रा.लोणी बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती
३. **सुरेखा सुधाकरराव चिरडे,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम, रा.कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती
४. **सुनिता कमलाकरराव दारोकार,** वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार व गैरअर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक दयाराम गणपतराव निमकर यांचा मृत्यू दि.२२/०८/२०२५** रोजी रा.देउरवाडा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. **तसेच मृतक शांताबाई दयाराम निमकर हिचा मृत्यू दि.२८/११/२०१७** रोजी रा.देउरवाडा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार व गैरअर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार व गैरअर्जदारास व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदार व गैरअर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.५८५/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१९४३/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१५/०९/२०२५

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.३५५/२०२५ — ने.ता.१७.१०.२०२५

अर्जदार -
१. **सरस्वती विनायक गाळे,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम, रा.सामदा, ता.दर्यापुर, जि.अमरावती
२. **संगीता हरिदास भोंडे,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम, रा.पातोंडा, ता.अकोट, जि.अकोला
३. **निता पांडुरंग मंडासे,** वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम, रा.सांगळुद बु.ता.जि.अकोला
४. **अनिता संतोष भोंडे,** वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम, रा.पातोंडा, ता.अकोट, जि.अकोला
५. **उषा गणेश रामाघरे,** वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम, रा.नांदेड खु.ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **विनायक यशवंत गाडे (गाळे)** हे दिनांक **१०.०२.२०१७ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१५.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८३२/२०२५
**कमला -वि- निरंक**
पुढील ता.२३.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. **कमला भाऊराव आसोले वय ६७ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा.काणजी हाऊस जवळ, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती**
२. **अभय भाऊराव आसोले, वय ४२ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा.गोविंद नगर, ओल्ड कॅटल जवळ पाऊंड राजापेठ, अमरावती**
३. **अजय भाऊराव आसोले, वय ३९ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा.कोडवाडा जवळ, गोविंद नगर, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भाऊराव झिंगुजी आसोले** हे दिनांक 26.12.2024 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कमला भाऊराव आसोले व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कमला भाऊराव आसोले व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -१६९८/२०२५**
**वात्सल विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २५.०९.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **वत्सल श्रीरंग गजबे,** वय ७० वर्षे, धंदा - निरंक, रा.प्लॉट नं. ४८,वैभव कॉलनी, जुना बायपास रोड, दस्तुर नगर, अमरावती
२. **धनश्री प्रकाश गजबे,** वय ४६ वर्षे, धंदा - खाजगी
३. **निधी प्रकाश गजबे,** वय १३ वर्ष, धंदा - विदयार्थी
क्र.२ व ३ रा.आकोटफेल पोलीस स्टेशन समोर, अकोला, ता.जि.अकोला

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत प्रकाश श्रीरंग गजबे हे दि.१०.१०.२०२२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार वत्सला श्रीरंग गजबे व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वत्सला श्रीरंग गजबे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०३.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## श्री.एन.एल.पाटील, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) दारव्हा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ

**जाहीर समन्स**

नियमित दिवाणी दावा क्र.१८३२/२०२५
**समिना खान पठान -वि- जावेद खान पठान**
ने.ता.२६.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. समिना परविन जावेद खान पठान, वय ३१ वर्षे, धंदा - गृहिणी, रा.अत्तारपुरा दारव्हा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ

-- विरुध्द --

गैरअर्जदार : १. जावेद खान नुरखान पठान, वय ३८ वर्षे, धंदा - चालक, रा.रोशनी फंक्शन हॉल जवळ, जुनी वस्ती, बडनेरा, जि.अमरावती

ज्याअर्थी **समिना परवीन जावेद खान पठाण** यांनी तुमच्या विरुध्द दावा दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी २६.०९.२०२५ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे. आणि उक्त दिवशी तुमच्या बजावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा बजावटची हक्कमागणी किंवा ज्यांच्यावर आधारलेली असे तुमच्या कब्जास किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे.

यापुर्वी नमुद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज दिनांक २६.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दारव्हा
दिनांक ३०.०८.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
(एस.आर.शेख)
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दारव्हा

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०८९/२०२५
**असरार -वि- निरंक**
पुढील ता.०७.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. असरार अहमद अब्दुल सत्तार, वय ३७ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा.अवकले एआय सयद किराणा शॉप, जमील कॉलनी, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अब्दुल सत्तार मोहम्मद शरिफ** हे दिनांक 17.04.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **असरार अहमद अब्दुल सत्तार** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **असरार अहमद अब्दुल सत्तार** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९७४/२०२५
**श्री देविदास -वि- निरंक**
पुढील ता.०३.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Devidas Sampatrao Dandge, Age 84 Yrs. Occu.: Nil, R/o Behind Ritesh Medical, Amba Gate, Amravati, Tq.Dist.Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **किसनाबाई @ कृष्णी देविदास दांडगे** हे दिनांक 01.10.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **देविदास विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **देविदास विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

Sipna Shikshan Prasarak Mandal, Amravati's
**ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, CHIKHALDARA, Dist. Amravati-444807**
Contact No. 07220-230309, 9423126066
NAAC Reaccredited 4th Cycle with CGPA 3.22 at grade "A" (2023-2028)
Permanent Affiliated to Sant Gadge Baba Amravati University,
Email: ascc163@sgbau.ac.in

**WANTED**

Application are invited for appointment of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under :-

**Vacancies for grant in aid courses / programmes on Contributory (CHB) basis**

| Sr.No. | Subject/Course | Total No.of vacant contributory Post |
|---|---|---|
| 1 | Physics | 02 |
| 2 | Computer Science | 01 |
| 3 | Botany | 02 |

**Vacancies for Permanent Non-Grant courses/programmes on Adhoc basis**

| Sr.No. | Subject/Course | Total No.of vacant contributory Post |
|---|---|---|
| 1 | Petrochemical Science | 02 |
| 2 | Apiculture | 05 |
| 3 | M.Sc.Environmental Science | 09 |

**Eligibility :** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No.08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. **संकीर्ण**-2018/(185/18)**मशि**-3, Dt.14.11.2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**Note :** Application on plain paper along with bio-data and attested copies of certificates, testimonials, should reach to Principal's Office on or before 29/09/2025.

**(Shri Jagdish M.Gupta)** — **President.**
**(Dr.Rajesh S.Jaipurkar)** — **Principal**

---

Vidarbha Youth Welfare Society, Amravati
**Mahila Arts Commerce College, Chandur Rly., Dist. Amravati.**

**WALK-IN-INTERVIEW**

(FOR ASSISTANT PROFESSOR ON CLOCK HOUR BASIS)
**Session 2025-2026**

Applications are invited for the post of Assistant Professor(s) on Clock Hour Basis as under. Academic qualification and remuneration shall be as per UGC & State Govt. Rules.

The qualified candidates can submit their Application on plain paper along with the necessary document by 27/09/2025 (12.00 PM) to the **Principal, Mahila Arts Commerce College, Chandur Rly., Dist. Amravati.**

The candidates should appear for an interview at their own cost on Thursday, 29/09/2025 at 10.00 A.M. in the Office of **Vidarbha Youth Welfare Society, "Chaitanya Building", Oposite Telephone Tower, University Road, Camp, Amravati.**

**UNDER GRADUATE GRANTED SUBJECT CHB POST**

| Sr.No. | Subject | No.of Post |
|---|---|---|
| 1 | Geography | 1 |

**Dr.N.R.Dhande**, President, V.Y.W.Society, Amravati
**Shri Y.V.Choudhary**, Secretary, V.Y.W.Society, Amravati
**Dr.Tushar R.Deshmukh**, Principal, Mahila Arts Commerce College, Chandur Rly.

---

# उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा
# ई-निविदा सुचना क्रमांक 8 (सन 2025-26)

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा (दुरध्वनी क्रमांक 07220-230229) यांचे वतीने खालील कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडून कडून ऑनलाईन प्रनालीव्दारे खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे**

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकील रक्कम रु. (आकस्मिक खर्च वगळून) | बयाना रक्कम रु | काम करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किमत रु. | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Construction of Residential Quarter Type-1 (S.U.) (Framed Structure) for Zendiamm Forest Guard at Kund in Kund Beat in CN 772 in Tarubanda Range in Gugamal Wildlife Division Chikhaldara | २५४९६२४ | २६००० | करारनाम्याचे दिनांकापासून १५० दिवसाचे आत | ५९०/- | अमरावती जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 2 | Construction of Residentil Quarter Type-1 (S.U.) (Framed Structure) for Suklibhura Forest Guard at Kund in Kund Beat in CN 772 in Tarubanda Range in Gugamal Wildlife Division Chikhaidara | २५४९६२४ | २६००० | करारनाम्याचे दिनांकापासून १५० दिवसाचे आत | ५९०/- | अमरावती जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता |

**ई-निविदा वेळापत्रक..**

1. ऑनलाईन निविदा विक्री करणे व स्विकृत दिनांक 19-09-2025 सकाळी 11.00 वा. ते दिनांक 25/09/2025 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत राहील,
2. ऑनलाईन तांत्रीक निविदा उघडणे दिनांक 26-09-2025 रोजी दुपारी 12.00 वा (शक्य झाल्यास)

**टिप-**

1. ई-निविदा ही कार्यप्रणाली प्रमाणे दिनांक 19-09-2025 सकाळी 11.00 वा. ते दिनांक 25-09-2025 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत भरता येतील.
2. तांत्रिक निविदा शक्य झाल्यास दिनांक 26-09-2025 रोजी दुपारी 12.00 वाजता उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल, तथापि निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा, यांनी राखून ठेवला आहे.
3. कोणतेही कारण न देता एक किवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा, यांनी राखून ठेवला आहे. व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.
4. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in व वनविभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in वर दिनांक 19-09-2025 ला सकाळी 11.00 वाजेपासुन पहावयास मिळेल.

विमाका/अम/जाही/४७७/२०२५-२६

**उपवनसंरक्षक,**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प,**
**गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कार्यशाळा

**खल्लार**-ग्रामविकास व पंचायतराज विभाग, जिल्हा परिषद अमरावती तथा पंचायत समिती दर्यापूर यांच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन कृषी भवन सभागृह दर्यापूर येथे नुकतेच करण्यात आले होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी तालुक्याचे पावत्व तथा मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले होते. प्रमुख उपस्थिती गटविकास अधिकारी सि. जे.ढवक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीकृष्ण कराळे, चिखलदऱ्याचे विस्तार अधिकारी विठ्ठल जाधव यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.सदर कार्यक्रमाची सुरुवात , छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर गटविकास अधिकारी सि. जे. ढवक यांनी सदर अभियानाची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, विविध घटक, अभियानाचा कालावधी तसेच अभियान दरम्यान ग्रामपंचायती व संबंधित यंत्रणांनी पार पाडावयाच्या भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेला ग्रामपंचायत अधिकारी सुरज भोपसे, संजय चव्हाण यांनीही शासन निर्णयाबद्दल मार्गदर्शन केले.त्यानंतर सदर अभियांना विषयी संखोल माहिती उपस्थित असलेले सर्व सरपंच ,उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी, रोजगार सेवक यांना देण्यात आली. कार्यक्रमा यशस्वी पार पाडण्यासाठी संदीप देशमुख, राजकुमार चांदुरकर, सागर कराळे, शिवाजी ठाकरे, जोत्सना खवले, सतिश पाटील, विजय काकड, दिनेश टोळे, सचिन कोरडे, आशिष गवई, विलास यादव, विकास घाटे, पंकज नागे, प्रविण पाचघरे यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे संचालन सुनिल स्वर्गीय यांनी तर आभार प्रदर्शन संजय भांडे यांनी केले.

## संत गुणवंत महाराज जयंती उत्सव

**टाकरखेडा संभू**-लसणापूर श्री संत गुणवंत महाराज यांच्या ११ व्या जयंती उत्सवानिमित्त गावात मोठ्या उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.१९ सप्टेंबर २०२५ रोजी हा सोहळा पार पडणार असून सकाळपासूनच भक्तगणांची गर्दी होणार आहे. दुपारी १२ ते सायं ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गावात भक्तीमय वातावरण निर्माण होणार आहे.विशेष आकर्षण म्हणून सत्यपाल महाराज यांचे शिष्य तथा सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संदीपपाल महाराज यांचे भव्य कीर्तन सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत होणार आहे. या कीर्तनासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे.गावातील समस्त गावकरी मंडळी, लसणापूर यांनी या जयंती सोहळ्यासाठी पुढाकार घेतला असून भक्तांना मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## 'हर घर पढणे की फिजा' उपक्रम

**खल्लार**-जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळा धामोरी, येथिल शिक्षिका समिना शेख यांच्या कल्पकतेतून 'हर घर पढणे की फिजा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसह विद्यार्थ्यांच्या पालकांचाही सहभाग असून संपूर्ण गावांमध्ये वाचन लोक चळवळ स्वरूपामध्ये उभी होत आहे.समिना शेख, शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांकरिता शालेय ग्रंथालयाची सुरुवात केली होती. मात्र त्याला विद्यार्थ्यांचा अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होत नव्हता. या समस्येवर उपाय शोधण्याकरिता त्यांनी विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी याकरिता पालकांचा सहभाग घेण्याचे निर्धारित केले. त्याप्रमाणे त्यांनी पालक सभा आयोजित करून सर्व पालकांना या उपक्रमाची माहिती दिली व पालकांनी आनंदाने या उपक्रमाला स्वीकारलेले दिसून येते. 'हर घर पढणे की फिजा' उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी स्वतः अवांतर वाचनाकरिता शालेय ग्रंथालयातून पुस्तके घेतात तसेच पालकांकरिता ही अवांतर वाचनाची पुस्तके नेतात. घरोघरी संध्याकाळी एक तास हा वेळ अवांतर वाचनाचा म्हणून राखून ठेवण्यात येत असलेला दिसून येत आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यांना पालकांसह वाचनाची आवड निर्माण झालेली आहे.

## खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी मोफत प्रशिक्षण

**अमरावती**-महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी दोन महत्त्वपूर्ण मोफत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश नवउद्योजक, सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती आणि महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रेरित करणे आहे. पहिला कार्यक्रम १८ दिवसांचा अन्न व फळ प्रक्रिया निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण असून, दुसरा ३० दिवसांचा AI तंत्रज्ञानावर आधारित तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम आहे. या दोन्ही प्रशिक्षणांमध्ये मोफत शिक्षण, अनुदान, आर्थिक सहाय्य आणि उद्योजकता विकासासाठी मार्गदर्शन पुरवले जाईल. याव्यतिरिक्त, 'अमृत' व्याज परतावा योजनेबाबतही सखोल माहिती दिली जाईल. प्रशिक्षणासाठी १८ ते ६० वयोगटातील उमेदवार पात्र आहेत. विशेषतः ब्राह्मण, कायस्थ, ठाकूर, मारवाडी, गुजराती, जाट, राजपूत यांसारख्या अमृत लक्षित गटातील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाईल. या संदर्भात एक दिवसीय परिचय मेळावा आणि मुलाखत २६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १२ ते ३ या वेळेत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, पहिला माळा, टांक चेंबर्स बिल्डिंग, गाडगेनगर, अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह (टी.सी., मार्कशीट, पॅन कार्ड, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, डोमिसाइल, फोटो इत्यादी) मुलाखतीस उपस्थित राहावे. नोंदणी करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर, २०२५ आहे. अधिक माहितीसाठी स्वप्नील इसळ (८७८८६०४२२६), राजेश सुने (९१६८६६७१५४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ही योजना रोजगार व स्वयंरोजगारासाठी फायदेशीर ठरेल.



गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान होत असून टाकरखेडा संभू परिसरातील शेती पाण्याखाली आल्यामुळे सोयाबीन, तूर, कपाशी सडण्याच्या मार्गावर आहे. (छाया- संतोष शेडे, टाकरखेडा संभू)

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त युवक काँग्रेसतर्फे राष्ट्रीय बेरोजगार दिन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र युवक काँग्रेस तर्फे राष्ट्रीय बेरोजगार दिन आंदोलनात्मक पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नेतृत्व महाराष्ट्र युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांनी केले.

या आंदोलनात मोठ्या संख्येने युवकांनी सहभाग घेतला व बेरोजगारीविरोधात घोषणा देत केंद्र सरकारच्या अपयशी रोजगार धोरणांचा तीव्र निषेध व्यक्त केला.केंद्र सरकारने प्रत्येक वर्षी २ कोटी रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु वास्तवात बेरोजगारी सर्वाधिक पातळीवर पोहोचली आहे. 'कौशल्य विकास' व 'स्टार्ट-अप इंडिया' यांसारख्या योजना फसव्या ठरल्याचा आरोप युवक काँग्रेसने या आंदोलनातून केला.या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष व आ.मा. विरेंद्र भाऊ जगताप यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की– मोदी सरकारने युवकांना रोजगाराऐवजी बेरोजगारीची झोळी



दिली, शिक्षण घेऊनही हाताला काम नाही, खोट्या जाहिराती व घोषणांनी देशातील तरुणांची फसवणूक केली आहे.युवक काँग्रेस महासचिव परीक्षित जगताप यांनी देशातील करोडो युवक बेरोजगार आहेत, महागाईने कंबर मोडली आहे आणि आश्वासनं पूर्ण करण्याऐवजी मोदी सरकार जनतेची फसवणूक करत आहे. म्हणूनच मोदींच्या वाढदिवशी युवक काँग्रेस राष्ट्रीय बेरोजगार दिन साजरा करत आहे. या कार्यक्रमाला असं कर युवक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. अमोल होले तालुका अध्यक्ष काँग्रेस, शिट्टी दादा सूर्यवंशी माजी नगराध्यक्ष, देवानंद खुणे माजी उपाध्यक्ष, श्रीनिवास सूर्यवंशी शहराध्यक्ष, रुपेश पुडके शहराध्यक्ष युवक काँग्रेस, हर्षल वाघ, प्रफुल कोकाटे, शामरावजी शिरसाट, सारंग देशमुख, सनी सावंत, भावेश देशमुख, पंकज मेश्राम, सतीश देशमुख, शरद घासले, संकेत जगताप, अजिंक्य आरेकर, अंकित गाढवे, बंटी माकोडे, अर्पित चौधरी, अवी खुणे, अर्पित देशमुख, अतुल मकेश्वर, मनोज गोलाईत, अथर्व पोलाद, अजिंक्य सोमवंशी, रोशन गोलाईत, शैजाज सौदागर विलास मोटघरे, भीमराव पवार, अजय देसाई, इम्रान सौदागर, गोपाल अविनाशे,गजू चोरे, सक्षम वानखडे, सुमित सरदार, हर्षल चुकेकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## युवा महोत्सव प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढ

**अमरावती**-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवासाठी प्रवेश अर्ज तसेच विविध योजनांची आवेदनपत्रे भरण्यास कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी मुदतवाढ दिली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत आपले आवेदनपत्रे विद्यार्थी विकास विभागाकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरीता आवेदनपत्रे तसेच संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, शुध्द पेयजल योजना, आणि संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनांची आवेदनपत्रे सादर करण्यास यापूर्वी ११ सप्टेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती,परंतु काही महाविद्यालयांच्या मागणीनुसार सदर योजनांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून, ती आता २४ सप्टेंबर, २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. यासंदर्भात विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, अधिकारी, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, विभागाचे प्रशासकीय केंद्र यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून, सर्वसंबंधितांनी याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे.

अधिक माहितीकरिता विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांचेशी ८८५५०८३९६४ यावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# अभियानाचा उपयोग गावाच्या विकासासाठी करावा-आयुक्त

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनातर्फे गावाच्या विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या प्रामुख्याने ग्रामस्तरावरील आत्मनिर्भरता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. यात नागरिकांचा सक्रीय सहभाग राहणार असल्याने या अभियानाचा उपयोग गावाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा विभागीयस्तराचा शुभारंत उत्तमसरा, ता. भातकुली येथे आज पार पडला. तसेच स्वच्छताही सेवा उपक्रम, राष्ट्रीय पोषण माह, सेवा पंधरवडा या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र,



परिविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, उपायुक्त राजीव फडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, गटविकास अधिकारी तुषार दांडगे, सुनिल राणा, सरपंच धमेंद्र मेहरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी अभियानात निश्चित केलेल्या मानकानुसार कार्य केल्यास अभियानात बक्षीस जिंकण्याची संधी आहे. राजस्व अभियानात शेतरस्ते, घरकुल, सातबारा आदी क्षेत्रात कार्य करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सामान्य महसुली बाबी आणि भटक्या विमुक्तांसाठी विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानात राज्यभरातील चांगल्या ग्रामपंचायतीशी स्पर्धा होणार आहे. त्यामुळे गावाने एकत्रित प्रयत्नांनी उत्साहात या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी, अभियान राबविण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. प्रत्येकाने अभियानात योगदान दिल्यास राज्यस्तरावर यश मिळणे शक्य होईल. महिलांसाठी पोषण अभियान राबविण्यात येत असले तरी यात पुरूषांनी सहभागी व्हावे. तसेच स्वच्छताही सेवा आणि स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानात महिलांनी आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले.यावेळी फुलंब्री, जि. छत्रपती संभाजी नगर येथील राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. तसेच उमेदच्या २७ बचतगटांना दिड कोटी रूपयांचा धनादेश वितरीत करण्यात आला. तसेच सातबारा, शिधापत्रिका, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सरपंच धमेंद्र मेहरे यांनी प्रास्ताविक केले.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात ओझोन दिवसानिमित्त व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे जागतिक ओझोन दिनाचे औचित्य साधून तज्ञ मार्गदर्शक प्रा.डॉ ओमप्रकाश मुंदे भूगोल विभाग प्रमुख, नारायणराव राणा कला व वाणिज्य महाविद्यालय बडनेरा यांचे अतिथी व्याख्यान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. डॉ. दीपक आंबोरे ,भूगोल विभाग प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

याप्रसंगी भूगोल विभागाच्या अभ्यास मंडळ कार्यकारिणीचे गठन करण्यात येऊन कार्यकारणीतील सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. भूगोल विषयाचे व्यासंगी व गाढे अभ्यासक प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे यांनी वातावरणात ओझोनची भूमिका आणि महत्त्व विशद करून ओझोन थर कमी होण्याची कारणे व त्यासंबंधीची उपाय योजना यावर प्रकाश टाकला.सुसंस्कृत समाजापेक्षा आदिवासी जमात निसर्गावर प्रेम करते आणि निसर्ग वाचविण्याचा प्रयत्न करते. म्हणून निसर्ग वाचविण्यासाठी अशिक्षित समजापेक्षा सुसंस्कृत माणसाला आज जागवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

अध्यक्षिय मनोगतातून प्राचार्य डॉ मीनल भोंडे यांनी स्पष्ट वक्ते आणि परखडपणे मत मांडणारे प्रा. डॉ. ओमप्रकाश मुंदे त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मानवाची निसर्ग प्रतीची कृतज्ञता केवळ ओझोन दिवसापूरती मर्यादित न ठेवता दैनंदिन




व्यवहारात दररोजच्या लहान लहान कृतीतून ती करावी असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. निसर्गाशी आपुलकीने वागा आणि निसर्गाचे संरक्षण करा आणि उत्कृष्ट नागरिक असल्याची जवाबदारी पार पाडा असा संदेशही त्यांनी याप्रसंगी दिला.भूगोल विभागाच्या अभ्यास मंडळ कार्यकारिणीचे अध्यक्ष अंकुश पाचांगे तर उपाध्यक्ष म्हणून कू पूजा जवंजाल व इतर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.डॉ. स्वाती गिरासे,भूगोल विभाग,यांनी तर आभार प्रदर्शन प्रा डॉ.दीपक अंबोरे यांनी केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वन कर्मचाऱ्यांचे घंटानाद व डमरू बजाओ आंदोलन

**मोर्शी/वार्ताहर**

शिवाजी मैत्री संघटनेच्या वतीने शासन प्रशासनाला जागे करण्यासाठी घंटानाद व डमरू बजाओ आंदोलन छेडण्यात येणार असून संघटनेचे कार्यकर्ते व शेतमजूर मोर्चाद्वारे सामाजिक वनीकरण कार्यालयात धडकणार आहे. सदर मोर्चाचे आयोजन रामजीबाबा मंदिर येथून करण्यात आले असून हा मोर्चा थेट सामाजिक वनीकरण कार्यालयात पोहोचणार आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांच्या काही साईड बंद अवस्थेत असल्यामुळे मजुरांवर उपासमारीची पाळी येऊन ठेपली आहे.या गंभीर समस्येची दखल घेत सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या शिवाजी मैत्री संस्थेचे अध्यक्ष श्रणीत राऊत यांच्या नेतृत्वात




दोनवेळा लेखी निवेदन उपविभागीय अधिकारी व सामाजिक वनीकरणाच्या अधिकारी यांना देण्यात आले.परंतु अद्यापही कोणत्याही प्रकारचा तोडगा काढण्यात आला नाही.सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मजुरांच्या हाताला नियमित काम मिळत असते.मात्र कित्येक दिवसापासून ग्रामीण भागातील रोजगार हमी अंतर्गत सुरू असलेल्या कामांची काही गावांमधील साईड बंद करण्यात आली आहे.

त्यामुळे मजूर वर्ग आर्थिक विवंचनेत सापडला असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. या गंभीर समस्येची दखल घेण्यात यावी यासाठी या घंटानाद व डमरू बजाओ आंदोलन छेडण्यात येणार आहे. या आंदोलनात शिवाजी मैत्री संस्थेचे अध्यक्ष श्रणीत राऊत,राजू वानखडे,बाळू आठवले,गोपाल ठाकरे,गणेश गाडे, नंदू गावंडे, गंगाधर वानखडे, रमेश सरदार, नाना वानखडे,ईश्वरदास वानखडे, गणेश वानखडे, वैभव लुंगे, रामेश्वर शहाणे, ज्ञानेश्वर वाघ, विनोदराव मुंदाफळे, अरविंद ढोमणे, गुड्डू वानखडे यासह बंडूभाऊ साउथ, सौरभ कुकडे, अमोल निस्वादे, विनीत उबाळे सुभाष पुसाम, अमोल निस्वादे, नितेश गोडबोले, सौरभ कुकडे, रोशन अंकुलनेरकर, कमलेश कडू, ऋत्विक राऊत, मित्र परिवार व शेकडो कष्टकरी मजूरवर्ग मंडळी सहभागी राहणार आहे.

# मराठी चित्रपट असोसिएशनमध्ये ॲड.चंद्रकांत कराळे विदर्भ अध्यक्ष

**मुंबई**-मराठी चित्रपट असोसिएशनच्या वतीने आयोजित विशेष कार्यकारिणी बैठकीत संस्थेच्या भविष्यातील कामकाजावर चर्चा करून नव्या विभागीय अध्यक्षांची निवड करण्यात आली. मराठी चित्रपट, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देणाऱ्या आणि त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीत पुढील मान्यवरांची विभागीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाला. यात तुषार भैसने-खानदेश अध्यक्ष, ॲड. चंद्रकांत कराळे-विदर्भ अध्यक्ष, धनंजय यमपुरे-मराठवाडा अध्यक्ष, शिरीष राणे-कोकण अध्यक्ष. या नियुक्त्यांबाबत चर्चा करताना संस्थेचे मुंबई अध्यक्ष चंद्रकांत विसपुते, राष्ट्रीय अध्यक्ष नितीन धवणे पाटील, प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील तसेच संस्थापक अध्यक्ष प्रशांत मानकर आणि सर्व संचालक मंडळ यांचा सखोल विचारविनिमय झाला. निवड घोषणेच्या एकमुखी निर्णयानंतर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत मानकर यांनी नव्या विभागीय अध्यक्षांची घोषणा केली.

संस्थेच्या वाटचालीत हे चारही विभागीय अध्यक्ष महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.




# नवरात्र उत्सव : शहरातील वाहतुकीत बदल

## २१ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत वाहतूक मर्यादा लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील ऐतिहासिक अंबादेवी व एकविरा देवी संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सव व अंबादेवी यात्रा महोत्सवाचे आयोजन होत आहे. दिनांक २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत होणाऱ्या उत्सवात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित असल्याने कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी पोलिसांनी विशेष वाहतूक नियमन योजना आखली आहे.

या संदर्भात पोलीस उपायुक्त (मुख्यालय) भी.शा.



घुगे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ व मोटार वाहन कायदा १९८८ अंतर्गत अधिसूचना जारी केली असून, २१ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपासून ते २ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ही अंमलात राहणार आहे.

**जड वाहनांना प्रवेशबंदी-** टोंगावाडाव ते सावनपुरा पोलीस चौकीमार्गे प्रभात चौक हा मार्ग अरुंद असल्याने येथे जड वाहनांना प्रवेशबंदी राहील.

### ■ पोलीसांचे आवाहन

वाहतूक निर्बंधाचे काटेकोरपणे पालन करावे.नियोजित पार्किंग स्थळाचाच वापर करावा. गर्दीत सोनसाखळी, मोबाईल चोरीसारख्या घटना घडू शकतात, त्यामुळे भाविकांनी मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्यावी. अग्निशमन, रुग्णवाहिका व कायदा अंमलबजावणीसाठी असलेल्या वाहनांना मात्र या निर्बंधातून सूट असेल.

### ■ वाहतुकीस बंद असलेले मार्ग-

१.राजकमल चौक – अंबागेट मार्ग
२.सावनपुरा खिडगी – गांधी चौक
३.ओसवाल भवन – गांधी चौक
४.डॉ. धवड दवाखाना – गांधी चौक
५.मुख्य पोस्ट ऑफिस रोड – पंचशील लॉंड्री/गांधी चौक
६.मुतेम्बर चौक – गांधी चौक
७.नमुना परिसरातून अंबादेवी मंदिराकडे जाणारे सर्व लहान रस्ते
८.सक्करसाथ – भाजीबाजार जैन मंदिर मार्ग
९.अंबागेट ते औरंगपुरा मार्ग

तसेच जड व हलक्या मालवाहतुकीच्या वाहनांवर शहरात प्रवेशबंदीबाबतची १७ नोव्हेंबर २०२० ची अधिसूचना लागू राहील.

**पर्यायी मार्ग-** मालवाहतूक वाहनांनी अकोला Y-पॉईंट, सुपर हायवे, कोंडेश्वर टी-पॉईंट, जुना बायपास☞(पान २ वर)

# शहरात ४९२ दुर्गादेवी, १०२ शारदादेवी मंडळे

## ६५ ठिकाणी गरबा आयोजन

## नवरात्रौत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिसांची तयारी



**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दि.२२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत श्री दुर्गादेवी व श्री शारदादेवी नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यंदा एकूण ४९२ दुर्गादेवी, १०२ शारदादेवींची स्थापना तसेच ६५ ठिकाणी गरबा कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याची माहिती देण्यात आली.

या पार्श्वभूमीवर १७ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्तालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस महानगरपालिका, अग्निशमन विभाग, महावितरण, सामान्य रुग्णालय, प्रादेशिक परिवहन विभाग, बाजार परवाना विभाग, अन्न व औषधी प्रशासन, तसेच विविध दुर्गा-शारदा व गरबा मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत झाडांच्या फांद्या छाटणे, विद्युत वायर दुरुस्ती, स्ट्रीटलाईट सुधारणे याबाबत सूचना देण्यात आल्या. मंडळांनी रस्त्यावर मंडप न टाकणे, मंडपाचा आकार मर्यादित ठेवणे, मंडळांतर्फे स्वयंसेवक नेमणे, कार्यक्रमस्थळी☞(पान २ वर)

# युवक कॉंग्रेसच्या ठिय्या आंदोलनामुळे अखेर मनपा प्रशासन नमले

## अवमानकारक पद्धतीने लागलेले शिवरायांचे पोस्टर्स रंगविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात मुतारी,स्मशानभूमी, दारू दुकाने, कचऱ्याची ढिगारे व सर्विस गल्ल्यांच्या भिंतींसारख्या आक्षेपार्ह ठिकाणी लावण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोस्टर्स विरोधात युवक कॉंग्रेसने दोन दिवसांपूर्वी तीव्र आंदोलन करून ही पोस्टर्स झाकली होती. तसेच यासंबंधी सिटी कोतवाली पोलीस स्टेशनला युवक कॉंग्रेसने पोलीस तक्रार



सुद्धा दाखल केली होती. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल अमरावती दौऱ्यावर असताना यासंबंधी कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्त यांच्याशी फोनवर चर्चा सुद्धा केली होती. मात्र तरीही ही प्रशासनाकडून या पोस्टर्स संबंधी कुठलीही कारवाई करण्यात आली नव्हती.

अशातच आज शिवरायांच्या या पोस्टर शेजारी लघुशंका करणाऱ्या व्यक्तींचा फोटो सोशल मीडिया द्वारे युवक कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना☞(पान २ वर)

# टीईटी निर्णयाविरुद्ध शिक्षक महासंघाची सुप्रीम कोर्टात धाव

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण झाल्याशिवाय माध्यमिक शाळांतील शिक्षकांना सेवा देता येणार नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अलीकडील निर्णय जाहीर झाल्यानंतर संपूर्ण शिक्षक समाजामध्ये तीव्र अस्वस्थता व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाविरुद्ध दिलासा मिळावा याकरिता शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी आज थेट



सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांच्यासोबत प्रकरणात मार्गदर्शन करणारे वकिलांमध्ये ॲड. डॉ. भूपेश पांडे, ॲड. डॉ. विनोद कुमार तिवारी,ॲड. कनिष्क, ॲड.प्रियांका तोमर, ॲड. वारीश अली,ॲड. अनंत गुप्ता यांचा समावेश होता. २०१३ पासून टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आली होती. आता न्यायालयाने ठरवले आहे की २०१३ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षकांना देखील टीईटी उत्तीर्ण करणे बंधनकारक असेल. ज्यांच्याकडे निवृत्तीला ५ वर्षांपेक्षा कमी सेवा शिल्लक आहे त्यांना अंशतः सवलत असून ते सेवा सुरू ठेवू शकतात, मात्र त्यांना पदोन्नतीची संधी मिळणार नाही. ज्यांच्याकडे ५ वर्षांपेक्षा जास्त सेवा उरलेली आहे, त्यांनी २ वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण न केल्यास त्यांना सक्तीची निवृत्ती स्वीकारावी लागेल. चंद्रशेखर भोयर (संस्थापक अध्यक्ष, शिक्षक महासंघ) यांनी स्पष्ट केले की, २०१३ पूर्वी नियमित नियमांनुसार ☞(पान २ वर)

# बनावट जन्म दाखला प्रकरणी १४९ लाभार्थ्यांवर गुन्हे दाखल करा

## किरीट सोमय्या यांची मागणी

अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः- तहसीलदारांच्या नावाने बनावट आदेश बनवून येथील नगरपालिकेतून बनावट जन्म प्रमाणपत्रे प्राप्त करणाऱ्या सर्व १४९ लाभार्थ्यांची यादी पुराव्यासह दिली असून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी येथे केली आहे.

याच ठिकाणी जन्म होऊन सुद्धा एकही कागदपत्रे जवळ



नसने आणि आधार कार्डवर वेगळी जन्म तारीख तर अर्जावर वेगळी तारीख करणे हा देशाच्या सुरक्षेशी खेळण्याचा प्रयत्न असल्याने अशा व्यक्तीवर कारवाई होणार आहे.

अंजनगाव शहरातील दोन मुख्याध्यापकांनी दोन बोगस दाखले दिले असल्याने त्यांच्यावर सुद्धा लवकरच गुन्हे दाखल करून अटक होणार असल्याचे किरीट सोमय्या☞(पान २ वर)

# अट्टल दुचाकी चोरटा जेरबंद

## ११ दुचाक्या जप्त; २३ गुन्ह्यांचा पर्दाफाश



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीत वाहनधारकांची डोकेदुखी ठरलेला अट्टल दुचाकी चोर अखेर गजाआड झाला आहे. गुन्हे शाखेच्या धडक कारवाईत तब्बल अकरा चोरीच्या दुचाक्या जप्त करण्यात आल्या असून आरोपीकडून तेवीस गुन्ह्यांचा पर्दाफाश झाला आहे. तब्बल पाच लाखांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला आहे.

मागील काही महिन्यांपासून शहरात दुचाकी चोरीचे सत्र सुरु होते. घरासमोर उभ्या असलेल्या गाड्या गायब होत होत्या. वाहनमालकांचा विश्वास ढळला होता. याच मालिकेत १५ सप्टेंबर रोजी शहजादखाँ शब्बीरखाँ यांची बुलेट क्लासिक ३५० वलगावातून ☞(पान २ वर)

# पूर्वा गोडबोले आचार्य पदवीने सन्मानित

**अमरावती/प्रतिनिधीः-** सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयातील व्यवस्थापन विभागात कार्यरत प्राध्यापक पूर्वा गोडबोले यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे व्यवसाय प्रशासन आणि व्यवसाय व्यवस्थापन या विभागाच्या, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखेतील आचार्य (पीएचडी) पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. अमरावती शहरातील वैद्यकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व स्व. डॉ. रमेश गोडबोले यांच्या त्या स्नुषा आहेत.



'भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (LIC) अमरावती विभागातील प्रभावी कर्मचारी सहभाग आणि संघटनात्मक यश' हा त्यांच्या शोधनिबंधाचा विषय होता. धनवटे नॅशनल महाविद्यालय, नागपूर या संशोधन स्थळावरून त्यांनी संशोधन केले असून याच महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. कविता पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

भारताच्या विमा क्षेत्रामध्ये कार्यरत भारतीय आयुर्विमा महामंडळाचा कामाचा आणि कार्याचा विस्तार करण्यामध्ये कर्मचाऱ्यांचा प्रभावी सहभाग आणि त्यामुळे मिळालेले संघटनात्मक यश त्यांनी आपल्या संशोधनातून सिद्ध केली आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शिका प्रा. डॉ. कविता पाटील यांना दिले आहे. त्यांना आपल्या संशोधन कार्यामध्ये सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश गुप्ता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खेरडे, विभाग प्रमुख प्रा.डॉ. जाधव आणि सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ.विदुला गोडबोले, प्रा. मोहन काटे आणि परिवारातील इतर सदस्यांनी तसेच बडनेरा- अमरावती शहरातील गणमान्य व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्यांनो आत्महत्येचा मार्ग सोडून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक द्या

## संयुक्त शेतकरी मोर्चाचे राकेश टिकैत यांचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः- देशातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याचे केंद्र विदर्भ आहे. शेतकरी आत्महत्याचे सत्र येथे नियमित सुरू आहे. यावर संयुक्त किसान मोर्चाचे राकेश टिकैत यांनी आज गुरुवार १८ सप्टेंबर रोजी आयोजित एका पत्रकार परिषद मध्ये खंत व्यक्त केली आहे. त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, आजच आत्महत्येचा विचार सोडून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी




कार्यालयावर कुटुंबासह धडक देऊन आपल्या मागण्यांसाठी संघर्ष करा आणि शासनाला मागण्या पूर्ण करण्यासाठी भाग पाडा. शेतकऱ्यांच्या घराला तोडून आणि त्यांच्या जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न करण्यात आला तर त्याचे उत्तर ट्रॅक्टरने दिले जाणार ☞(पान २ वर)

# मनी लॉन्ड्रींगच्या गुन्हयामध्ये अडकल्याची बतावणी

## सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्याला ३१.५० लाखाने फसविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** एका निवृत्त बँक अधिकाऱ्याला अश्लील संदेश आणि मनी लॉंड्रिंगच्या बनावट गुन्ह्यांमध्ये अडकवून तब्बल ३१ लाख ५० हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आल्याची घटना नवी बस्ती बडनेरा येथील अलंकार पार्क मध्ये समोर आली आहे. संजय तुकाराम मेश्राम (वय ६०, रा. नवी वस्ती, बडनेरा) असे फसवणुक झालेल्या वृद्धाचे नाव आहेत.

१७ सप्टेंबर रोजी संजय मेश्राम यांच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख पोलीस अधिकारी म्हणून दिली. त्यानंतर त्याने मेश्राम यांना धक्का देणारी माहिती दिली. 'तुमच्यावर बंगळूर मधील गांधीनगर पोलीस ठाण्यात एका महिलेला अश्लील संदेश पाठवल्या बद्दल गुन्हा दाखल आहे,' असे सांगून त्याने मेश्राम




यांना घाबरवून सोडले.हा तोतया पोलीस अधिकारी केवळ अश्लील मेसेजचा आरोप करून थांबला नाही, तर त्याने आणखी एक गंभीर आरोप जोडला. 'तुमच्या बँक खात्यातून एकूण १५५ अवैध व्यवहार झाले आहेत आणि त्यात मोठ्या प्रमाणावर मनी लॉंड्रिंग झाल्याचा संशय आहे. या प्रकरणी तुमच्यावर सीबीआय आणि आरबीआय यांचीही नजर आहे,' अशी भीती त्याने घातली.बनावट गुन्ह्यांमधून सुटका करण्याचा एकमात्र मार्ग म्हणून, त्याने संजय मेश्राम यांना 'डिजिटल अरेस्ट' केल्याचे जाहीर केले. याचा अर्थ असा की, मेश्राम यांनी त्यांच्या घरातच राहावे, कोणत्याही परिस्थितीत ☞(पान २ वर)

# गोठ्यातील वासरांवर बिबट्याचा हल्ला

## -एक ठार तर एक गंभीर, -तिवसा तालुक्यात दुसरी घटना





**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यात बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातला असून दोन दिवसांपूर्वी जावरा फत्तेपुर गावातील गोठ्यात असलेल्या वासराची शिकार केल्यानंतर आज पुन्हा एकदा तालुक्यातील कवाडगव्हाण गावानजीक असलेल्या शेतातील गोठ्यात बिबट्याने हल्ला चढवून त्यातील एका वासराचा जीव घेतला तर एक वासरू गंभीर जखमी झाले आहे. तालुक्यातील कवाडगव्हाण गावाजवळ संतोष काशिनाथ चौधरी यांचे शेत आहे.त्यांच्या शेतात असलेल्या गोठ्यात वासरू हे खुंट्याला बांधून असतात.बुधवारी रात्रीच्या सुमारास ☞(पान २ वर)

# राजकमलचा रेल्वे पूल भाविकांसाठी उपलब्ध करुन द्या

## हिंदू हुँकार संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

### नवरात्रौत्सव काळात दररोज ४ तास पायदळ भाविक घेतील दर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवरात्रौत्सव काळात नऊही दिवस सकाळी ४ वाजता राजकमल चौकातील रेल्वे पुलाच्या पलिकडील भाविक आई अंबा व आई एकवीरा मातेचे दर्शन पायदळ दर्शन घेतात. पण सध्या सदर रेल्वे पूल बंद असल्या



कारणाने भाविकांना मंदिरात दर्शनासाठी येण्यास खूप लांबचा पल्ला गाठावा लागणार आहे. भाविकांना दर्शन सुकर होण्यासाठी प्रशासनाने नवरात्रौत्सव काळात ☞(पान २ वर)

# मुलाकडून आईवर अत्याचार

# न्यायालयाने दिली जन्मठेपेची शिक्षा

**पांढरकवडा/प्रतिनिधीः-** मानवी संवेदना आणि नात्यांचा गडद विश्वास चिरडणारी हृदयद्रावक घटना वणी तालुक्यात घडली होती. आई–मुलाच्या पवित्र नात्याला काळीमा फासणाऱ्या २६ वर्षीय मुलाने स्वतःच्या जन्मदात्या आईवर अमानुष अत्याचार केला. या दुष्कृत्याने समाजमन सुन्न झाले असून, सत्र न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची कठोर शिक्षा ठोठावली आहे.

राकेश दत्तू काळे (वय २६, रा. वणी तालुका) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव



आहे. पीडित आई मुलीला भेटण्यासाठी गावात आली असता, आरोपीने तिला दोन दिवस सतत छळले. २३ जुलै २०२१ रोजी रात्री दारूच्या नशेत घरी परतलेल्या आरोपीने पट्ट्याने मारहाण केली. त्यानंतर तिला जीवघेणी धमकी देत अश्लील व्हिडीओ दाखवून जबरदस्तीने बलात्कार केला. या अमानुष ☞(पान २ वर)